M53 एम. ए. (लोकप्रशासन)
सेमिस्टर I
COURSE CODE : PAD102
BOOK CODE : PAD 1023

मुखपृष्ठ रचना : अविनाश उमाकांत भरणे / प्र. नि. केंद्र / यचमपु विद्यापीठ / AF21-96

**PAD 102**

## भारतीय संविधान व प्रशासन

पुस्तक 3

# संवैधानिक व वैधानिक मंडळे

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

**PAD 102**
**भारतीय संविधान आणि प्रशासन**
**Book Code : PAD1023**

**पुस्तक ३**

# संवैधानिक आणि वैधानिक मंडळे

**लेखक : डॉ. पंडित नलावडे**


| | |
|---|---|
| घटक १ : संवैधानिक व वैधानिक मंडळाची पार्श्वभुमी | १ |
| घटक २ : संवैधानिक मंडळे – भाग १ | ८ |
| घटक ३ : संवैधानिक मंडळे – भाग २ | १६ |
| घटक ४ : वैधानिक मंडळे – भाग १ | २६ |
| घटक ५ : वैधानिक मंडळे – भाग २ | ३७ |
| घटक ६ : संवैधानिक व वैधानिक मंडळाची उपयोगिता आणि मर्यादा | ५२ |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## कुलगुरू : प्रा. ई. वायुनंदन

### मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषद

**डॉ. प्रवीण घोडेस्वार**
प्र. संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**नागार्जुन वाडेकर**
सहयोगी प्राध्यापक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. हेमंत राजगुरू**
सहयोगी प्राध्यापक
शैक्षणिक सेवा विभाग
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. विजया पाटील**
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**माधव पळशीकर**
सहयोगी प्राध्यापक
संगणकशास्त्र विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. मोहन काशीकर**
प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर

**डॉ. सतीश बडवे**
प्राध्यापक
मराठी भाषा आणि साहित्य विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. लतिका अजबानी**
सहायक प्राध्यापक
वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ
नाशिक

**डॉ. सुरेश कानडे**
प्राध्यापक
हिंदी विभाग
एस.एम.आर.के. महिला महाविद्यालय
नाशिक

**डॉ. मधुकर शेवाळे**
उप ग्रंथपाल
य.च.म. मुक्त विद्यापीठ
नाशिक

**डॉ. विनायक देशपांडे**
प्राध्यापक व माजी विभागप्रमुख
व्यवसाय व्यवस्थापन विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर

### अभ्यासक्रम समिती

**डॉ. श्याम शिरसाठ**
प्र. कुलगुरू
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. बालाजी कत्तूरवार**
प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड

**डॉ. वासंती रासम**
प्रमुख
राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. भारत गोरे**
सहयोगी प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
विवेकानंद महाविद्यालय
औरंगाबाद

**डॉ. जितेंद्र वासनिक**
सहयोगी प्राध्यापक
लोकप्रशासन व स्थानिक स्वराज शासन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ
नागपूर

**डॉ. प्रीती पोहेकर**
प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
राजर्षि शाहू महाविद्यालय
लातूर

**डॉ. अशोक नाईकवाडे**
प्राचार्य
पंडीत जवाहरलाल नेहरू महाविद्यालय
औरंगाबाद

**डॉ. अभिजित पिलखाने**
सहयोगी प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग
चेतना शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
कला वरिष्ठ महाविद्यालय, औरंगाबाद

**Course Code : PAD102 Book Code : PAD1023 : संवैधानिक आणि वैधानिक मंडळे**

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**कुलगुरू : प्रा. ई. वायुनंदन**

**प्र. संचालक : डॉ. प्रवीण घोडेस्वार, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**

**लेखक**

**डॉ. पंडित नलावडे**
सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
पंडित नेहरू महाविद्यालय
औरंगाबाद

**संपादक**

**डॉ. अशोक नाईकवाडे**
प्राचार्य
पंडित नेहरू महाविद्यालय
औरंगाबाद

**अनुदेशन-तंत्र-संपादक**

**राजेंद्र सोरमारे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**भाषा संपादक**

**डॉ. सुनील गावंडे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**शिक्षणक्रम संयोजक**

**डॉ. सुनील गावंडे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**डॉ. सुशील कांबळे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**राजेंद्र सोरमारे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**निर्मिती**

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

*First Edition developed under DEC development grant.*

- **प्रथम आवृत्ती** : ऑगस्ट २०२१ **प्रकाशन क्रमांक** : २३०९
- **मुखपृष्ठ रेखाटन** : श्री. अविनाश भरणे
- **अक्षरजुळणी** : परफेक्ट कॉम्प्युटर, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक - ८
- **मुद्रक तथा प्रकाशक** :डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**ISBN 978-93-91514-99-0**

**B18-19-37**

## एम.ए. (लोकप्रशासन) पदव्युत्तर शिक्षणक्रम (M53)

## अभ्यासक्रम

## भारतीय संविधान आणि प्रशासन (PAD102)

### पुस्तक १ :भारतीय संविधान तत्त्वज्ञान आणि प्रणाली

घटक १ : संविधानाचे तत्त्वज्ञान व मुल्ये
घटक २ : संविधानवाद
घटक ३ : संविधान विषयक ऐतिहासिक न्यायालयीन निर्णय
घटक ४ : राजकीय संस्कृती, पक्ष, दबावगट आणि प्रसारमाध्यमे
घटक ५ : संविधान आणि शिक्षण
घटक ६ : निवडणूकप्रक्रिया

### पुस्तक २ : भारतीय संविधानाची संरचना

घटक १ : भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया
घटक २ : संविधान परिचर्चा
घटक ३ : संविधानाची रूपरेखा
घटक ४ : संविधानातील महत्त्वाच्या संकल्पना
घटक ५ : संसदीय समित्या आणि आयुधे
घटक ६ : महत्वाच्या घटनादुरुस्त्या

### पुस्तक ३ : संवैधानिक आणि वैधानिक मंडळे

घटक १ : संवैधानिक व वैधानिक मंडळाची पार्श्वभुमी
घटक २ : संवैधानिक मंडळे – भाग १
घटक ३ : संवैधानिक मंडळे – भाग २
घटक ४ : वैधानिक मंडळे – भाग १
घटक ५ : वैधानिक मंडळे – भाग २
घटक ६ : संवैधानिक व वैधानिक मंडळाची उपयोगिता आणि मर्यादा

### पुस्तक ४ : भारतीय संविधान आणि लोकप्रशासन संबंध

घटक १ : भारतीय संविधानाची ठळक वैशिष्ट्ये
घटक २ : भारतीय प्रशासनाचे स्वरूप व संरचना
घटक ३ : भारतातील लोकसेवा
घटक ४ : घटनात्मक संस्था
घटक ५ : कल्याणकारी प्रशासन
घटक ६ : भारतातील न्यायव्यवस्था

# पुस्तक तिसरे : संवैधानिक आणि वैधानिक मंडळे

## प्रास्ताविक

भारतीय संविधान आणि प्रशासन या अभ्यासक्रमातील हे पुस्तक तिसरे आहे. ह्या पुस्तकामध्ये एकूण सहा घटक आहेत. थोडक्यात हे घटक खालीलप्रमाणे -

**घटक १ : संवैधानिक आणि वैधानिक मंडळाची पार्श्वभूमी :** ह्या घटकात सवैधानिक व वैधानिक मंडळे म्हणजे काय, त्यांच्या निर्मितीची पार्श्वभूमी, त्यांच्या निर्मितीमागील फायदे-तोटे, भारतीय प्रशासन व्यवस्थेमध्ये त्यांची भुमिका ह्या मुद्यांची चर्चा केली आहे.

**घटक २ :संवैधानिक मंडळे-भाग १ :** ह्या घटकात भारताचा महान्यायवादी या पदाची ओळख व त्यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे. तसेच भारताचा नियंत्रक व महालेखा परिक्षक या पदाची नियुक्ती अधिकार व कार्ये, तसेच हे पद भारताच्या वित्तीय व्यवस्थेत कसे महत्त्वाचे आहे हे लक्षात येते. त्यानंतर भारतीय प्रशासनात निवडणूका नि:पक्षपातीपणे पार पाडण्यासाठी निवडणूक आयोग कशाप्रकारे महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतो या मुद्याचा अभ्यास केला आहे.

**घटक ३ : संवैधानिक मंडळे-भाग २ :** ह्या घटकात केंद्रिय लोकसेवा आयोगाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, रचना, अधिकार व कार्ये तसेच राष्ट्रीय अनुसूचित जाती, जमाती आयोग आणि राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग यांची रचना व कार्ये यांचा अभ्यास केला आहे.

**घटक ४ : वैधानिक मंडळे-भाग १ :** ह्या घटकात मानवाधिकार ही संकल्पना समजून घेऊन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची रचना, अधिकार व कार्ये, मानवाधिकार व मुलभूत अधिकार यांच्यातील परस्परसंबंध यांचा आढावा घेतला आहे. त्याचबरोबर राज्य मानवाधिकार आयोगाविषयी आणि राष्ट्रीय महिला आयोगाची रचना व कार्याविषयी उहापोह केला आहे.

**घटक ५ : वैधानिक मंडळे-भाग २ :** ह्या घटकात राष्ट्रीय विकास परिषदेची रचना व कार्याची माहिती घेतली आहे. त्याचबरोबर राज्यघटना पुनर्विलोकन आयोगाचे महत्त्व व आयोगाने सुचविलेल्या शिफारशी आणि त्यांच्या कार्याची चर्चा केली आहे, शेवटी केंद्रिय माहिती आयोग प्रशासनाच्या दृष्टीने किती महत्त्वाचा आहे याची माहिती घेतली आहे.

**घटक ६ : संवैधानिक व वैधानिक मंडळाची उपयोगिता आणि मर्यादा :** ह्या घटकात संवैधानिक मंडळ व वैधानिक मंडळाच्या उपयुक्तता आणि मर्यादा यांची माहिती घेतली आहे.

ज्ञानगंगा घरोघरी

# घटक १ : संवैधानिक व वैधानिक मंडळाची पार्श्वभूमी

*अनुक्रमणिका*


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय-विवेचन

  १.२.१ संवैधानिक व वैधानिक मंडळाचा अर्थ

  १.२.२ संवैधानिक व वैधानिक मंडळाच्या निर्मितीची कारणे

  १.२.३ संवैधानिक मंडळाची पार्श्वभुमी

  १.२.४ वैधानिक मंडळाची पार्श्वभुमी

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

- संवैधानिक मंडळे म्हणजे काय हे समजेल.
- वैधानिक मंडळाचा अर्थ समजून घेता येईल.
- संवैधानिक मंडळे व वैधानिक मंडळे यांच्या निर्मितीची कारणे सांगता येतील.
- संवैधानिक मंडळाची पार्श्वभुमी स्पष्ट करता येईल.
- वैधानिक मंडळाची पार्श्वभुमी सांगता येईल.

## १.१ प्रास्ताविक

या घटकात आपण संवैधानिक मंडळे व वैधानिक मंडळे यांचा अर्थ समजून घेणार आहोत. भारताची सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती व शासनव्यवस्था अशा विविध कारणामुळे ही मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. या कारणांचा आढावा घेण्यात आला आहे.

संवैधानिक मंडळाची पार्श्वभुमी स्पष्ट करत असताना नियत्रंक व महालेखापरिक्षक, निवडणुक आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, अनुसुचित जाती व जमाती आयोग व राष्ट्रीय इतर मागासवर्ग आयोग यांची पार्श्वभुमी सांगण्यात आली आहे. वैधानिक मंडळामध्ये राष्ट्रीय विकास परिषद, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय महिला आयोग, केंद्रीय माहिती आयोग यांची पार्श्वभुमी स्पष्ट केली आहे.

थोडक्यात या घटकात संवैधानिक व वैधानिक मंडळाचा अर्थ स्पष्ट करून काही ठारावीक मंडळाची ऐतिहासीक पार्श्वभुमी व त्यांच्या निर्मितीची पार्श्वभूमी आपण समजून घेणार आहोत.

---

# १.२ विषय–विवेचन

---

## १.२.१ संवैधानिक व वैधानिक मंडळाचा अर्थ

संवैधानिक मंडळे ही अशी मंडळे किंवा–संस्था असतात की, ज्यांचा उल्लेख राज्यघटनेमध्ये केलेला असतो. ते राज्यघटनेचा भाग असतात व त्याचे अधिकार, कार्ये या संदर्भातील सर्वच बाबींचे विश्लेषण राज्यघटनेमध्ये नमूद केलेले असते आणि या संस्थामध्ये काही बदल किंवा त्यांचे आस्तित्व नष्ट करावयाचे असल्यास घटनादुरुस्ती शिवाय काहीही बदल करता येत नाही.

शासनाचे कार्य सुलभ होण्यासाठी या संस्था मदत करतात. प्रत्येक संस्था ही विशिष्ठ प्रकारचे कार्य करत असते. तर काही संस्था सल्लात्मक कार्य करत असतात. राज्यघटनेत नमुद केलेल्या उददेशाची पूर्तता करण्यासाठी या सर्व संस्था स्थापन करून त्यांच्या माध्यमातून उददेश पूर्तता करण्यासाठीचा प्रयत्न केला जातो.

वैधानिक संस्थांचा उल्लेख राज्यघटनेमध्ये केलेला नसतो तर केंद्रीय मंत्रीमंडळ, संसद यांच्या अधिनियमाद्वारे यांची निर्मिती केली जाते. यात या संस्थाच्या रचना, कार्य, या संदर्भात स्पष्टपणे माहिती दिलेली असते. या मंडळाच्या वरील बाबीत काही बदल करता येतो. या संस्थांच्या प्रमुखांची नियुक्ती सरकारद्वारे केली जाते. या संस्था मंत्रालयांशी जवळीक ठेवून कार्य करत असतात. अशा प्रकारच्या संस्थाचे आस्तित्व हे बिटीश पद्धतीच्या शासनव्यवस्था असणाऱ्या देशात जास्त प्रमाणात आढळून येतात.

थोडक्यात संवैधानिक व वैधानिक मंडळातील फरक म्हणजेच संवैधानिक संस्थांची रचना, अधिकार, कार्य, हे राज्यघटनेतच नमूद केलेली असतात तर वैधानिक मंडळे ही मंत्रिमंडळ, संसद यांच्याद्वारे निर्माण केलेल्या अधिनियमाद्वारे स्थापन होत असते.

## १.२.२ संवैधानिक व वैधानिक मंडळाच्या निर्मीतीची कारणे

आपल्या देशात संवैधानिक व वैधानिक मंडळाची स्थापना करण्यासाठी कोणत्या घटकाचा प्रभाव पडला याची मीमांसा पुढीलप्रमाणे करण्यात येईल.

### (१) लोकशाही शासनव्यवस्था

भारतात संसदीय लोकशाही पद्धतीची शासनव्यवस्था स्वीकारली गेली. या व्यवस्थेत शासन कारभार करावयाचा असेल तर विशिष्ट प्रकारची संरचना आवश्यक आहे. या पद्धतीत नियमीत वेळेत व नि:पक्षपातीपणे निवडणुका घ्याव्या लागतात यातुनच सरकारची निवड केली जाते. यामुळे ह्या निवडणुका घेण्याचे कार्य सरकारकडे न सोपवता स्वतंत्र एखाद्या अभिकरणाकडे सोपवणे योग्य ठरणारे आहे अन्यथा पक्षपातीपणा व गैरप्रकार होवू शकतो. यामुळे लोकशाही धोक्यात येवू शकते हे टाळण्यासाठी स्वतंत्र निवडणुक व्यवस्था आवश्यक आहे म्हणूनच निवडणुक आयोगाची स्थापना करण्यात आली. शासनकर्ते व जनप्रतिनिधींना कायदयाची सखोल माहिती असेलच असे नाही यासाठी कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शनासाठी महान्यायवादीची व्यवस्था करण्यात आली आहे. आर्थिक बाबतीत कर व खर्चासंबंधी अधिकार संसदेच्या सहमतीने सरकारला दिले असले तरी योग्य खर्च होतो की नाही यासाठी लेखापरिक्षण व नियंत्रणासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची आवश्यकता असल्याने ती करण्यात आली आहे.

लोकशाही शासनाचे स्वरूप हे कल्याणकारी राज्याचे बनले आहे. तेव्हा हे उद्देश पूर्ण करण्यासाठीच सक्षम सुयोग्य नोकरवर्गाची भरती करण्यासाठी स्वतंत्र अशा यंत्रणेची गरज असल्याने भारतात केंद्रीय लोकसेवा आयोगासारखी संस्था स्थापन करण्यात आली आहे.

वरील कारणांचा विचार करता लोकशाही शासन व्यवस्थेत विविध संवैधानिक व वैधानिक संस्थाची निर्मिती करण्यात येत असते, हे दिसून येईल.

## (२) सामाजिक न्याय

भारतीय राज्यघटनेत सामाजिक न्यायाच्या तत्वाला स्थान देण्यात आले आहे. देशातील सामाजिक स्थिती ही भेदभाव व विषमतापुर्ण असल्याने समाजातील दलित, आदिवासी, महिला, बालके यांच्या कल्याणातूनच सामाजिक न्याय समाजात निर्माण करू शकतो. याच जाणीवेतून या घटकांसाठी घटनेतच काही सोयी, सुविधा देण्याचा उल्लेख केला आहे. या बरोबरच आयोगाची स्थापना करण्याची तरतुद घटनेतच केली. तसेच महिला व बालकांसाठी अधिनियमाद्वारे नंतर ती स्थापन करण्यात आली आहे. अशाप्रकारे या घटकांच्या कल्याणासाठी संवैधानिक व वैधानिक संस्था स्थापन करून सामाजिक विषमता व भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## (३) धर्मनिरपेक्षता

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत धर्मनिरपेक्ष या तत्त्वाचा समावेश करण्यात आला आहे. देशात विविध धर्मीयांचे आस्तित्व असल्याने या तत्वाचा पुरस्कार करण्यात आला आहे. हिंदू बहुसंख्यांक व बाकी धर्म अल्पसंख्यांक स्वरूपात आहेत. यामध्ये मुस्लिम धर्मीयांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती इतरांच्या तुलनेत दयनीय आहे. म्हणुन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांचा विकास करण्यासाठी काही सोयी, सवलती देणे आवश्यक होते यासाठी १९९२ ला राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त ॲंग्लो इंडियन यांनाही अल्पसंख्यांकांचा दर्जा देण्यात आला आहे. राज्यघटनेतही या घटकांसाठी काही तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

## (४) राष्ट्रीय विकास व संघराज्यीय व्यवस्था

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाचा विकास करणे हे मोठे आव्हान होते. अनेक समस्या आस्तित्वात होत्या. या परिस्थितीमधून मार्ग काढण्यासाठी नियोजित आर्थिक विकासाशिवाय पर्याय नव्हता. विकसित देशांनी अशाच प्रकारे आपल्या देशाचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले होते. भारतातही अशाच प्रकारे मिश्र अर्थव्यस्थेचा व नियोजित अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. यासाठी नियोजन आयोग, राष्ट्रीय विकास परिषद या संस्थाची स्थापना केली. याबरोबरच आर्थिक व्यवस्था व विकासासाठी तसेच देशात संघराज्य शासनपद्धती असल्याने वित्त आयोग, आंतरराज्यीय परिषद यांची स्थापना करण्यात आली आहे.

## (५) आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि जागतिकीकरणाचा प्रभाव

भारतीय घटनेत मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला त्यात यूनोच्या मानवधिकार घोषणापत्रातील काही अधिकारांनाही स्थान देण्यात आले होते मात्र मानवधिकार संरक्षणासाठी स्वतंत्र व्यवस्था आस्तित्वात नव्हती. १९६०-७०च्या दशकापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवधिकार संरक्षणासंदर्भात चर्चा व कार्य सुरू झाले होते. भारतातही या संदर्भात अनेक संस्था समित्याद्वारे शिफारशी केल्या होत्या. पण आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थाचा आयोगाच्या स्थापने संदर्भात दबाव हा ही कारणीभुत होता. इंटरनॅशनल कमिशन ऑफ ज्युरिस्टस, रेडक्रॉस, इत्यादी मानवधिकार संरक्षण करणाऱ्या संघटनांनी टीका केल्याने व देशातील मानवधिकार उल्लंघनाच्या घटनामूळे राष्ट्रीय पातळीवर व राज्य पातळीवर मानवधिकार आयोग स्थापन करण्यात आला.

केंद्रीय माहिती आयोगाच्या स्थापने संदर्भातही हे जागतिक पातळीवरील परिस्थिती व दबाव कारणीभूत ठरला. १९९४ मध्ये जागतिक बॅंकेद्वारे बनवण्यात आलेल्या समितीने ही लोकशाही सरकारांवर दबाव आणला होता. तसेच प्रशासनात स्वायत्तता, पारदर्शकता, जबाबदारी, सुशासन या गोष्टींची मागणी होवू लागली. देशात या कायद्यासाठी जनआंदोलन उभे राहीले यातूनच केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम बनला. त्यांच्या पालनांसाठी केंद्रीय माहिती आयोगाची स्थापना करण्यात आली.

अशा विविध कारणांमुळे देशात विविध संवैधानिक व वैधानिक संस्थाची निर्मिती करण्यात आलेली दिसून येते.

# १.२.३ संवैधानिक मंडळाची पार्श्वभुमी

संवैधानिक मंडळाच्या निर्मितीची पार्श्वभुमी पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल. भारताचा नियंत्रक व महालेखापरिक्षक हे १९३५ च्या कायदयामधील महालेखापरिक्षकाच्या आधारावर निर्माण करण्यात आले आहे. १९३५च्या कायदयाचा प्रभाव राज्यघटनेवर बराच पडलेला आहे. यामध्ये हे पद ही त्यातूनच राज्यघटनेत नमुद केले आहे. ब्रिटीशांनी वसाहतिक काळात अनेक अधिनियम, सुधारणा व राज्यकारभारासाठी व्यवस्था निर्माण करून ठेवल्या होत्या. यातील ज्या घटकांची उपयुक्तता आहे. ती तशीच किंवा त्यात काही बदल करून स्वीकारण्यात आलेली आपणास दिसून येतात. निवडणुक आयोगाची स्थापना

ही राज्यघटनेतच केली असली तरी स्वातंत्रपूर्व काळातही निवडणूका देशात झाल्या होत्या. १९१९ व १९३५च्या कायद्याने झालेल्या निवडणुकाने भारतीयांना या संदर्भात प्रशिक्षणच मिळाले होते. १९३४च्या निवडणुकीत महिलांनाही मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. २५ जानेवारी १९५० रोजी निवडणूक आयोगाची स्थापना झाली २१ मार्च १९५० रोजी आयुक्तांनी कार्यभार हाती घेतला. निवडणुक आयोगाने १९५१-५२ पहिली निवडणुक पार पाडली. आजपर्यंत आयोगाने लोकसभेच्या १६ निवडणुका पार पाडल्या आहेत.

आजच्या केंद्रीय लोकसेवा आयोगाची पार्श्वभुमी ही स्वातंत्रपुर्व काळातच झालेली आपणास सांगता येते मेकालेच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली तीने गुणवत्ता आधारित लोकसेवेची शिफारस केली. १८८६ ते १९२३ पर्यत एचीसन आयोग (१८८६), इस्लिंटन आयोग (१९१७), ली आयोग (१९२३) हे तीन आयोग स्थापन करण्यात आले. १९२०ला भारतात तीन प्रकारच्या सेवांची निर्मिती करण्यात आली होती. आयोगाच्या शिफारशीनुसार १ ऑक्टोबर १९२६, रोजी आयोगाची स्थापना करण्यात आली. या अगोदर लोकसेवकांची भरती लंडन येथील लोकसेवा आयोग करत असे. स्वातंत्र्याच्या पुर्वी त्यास संघीय लोकसेवा आयोग म्हटले जात होते. २६ जानेवारी १९५० पासून केंद्रीय लोकसेवा आयोग असे म्हटले जावू लागले. आय. सी. एस. ऐवजी आय. ए. एस. व आय. पी. ऐवजी आय. पी. एस असा बदल केला. १९७५ साली डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला त्यांनी प्राथमिक परीक्षा घेण्याची शिफारस केली. तसेच प्रशिक्षणोत्तर चाचणी ही घेतली जावी या शिफारशी आयोगाने स्वीकारल्या. १९८८-८९ ला सतीशचंद्र व २००० मध्ये प्रा. वाय. के. अलघ यांच्या अध्यक्षतेखाली ३ सदस्यीय समिती नेमली होती. समितीने परीक्षा पद्धती, मुलाखत, प्रशिक्षण या संदर्भात शिफारसी कराव्यात असे सुचवले होते.

राज्यघटनेमध्ये अनुसुचित जाती व जमातीसाठी आयोगाची तरतुद ३३८मध्ये केली होती. मात्र प्रत्यक्ष आयोगाची स्थापना ६५ व्या घटनादुरूस्तीने १९९० मध्ये करण्यात आली. यानंतर २००३ साली ८९ व्या घटनादुरूस्तीने अनुसुचीत जमातीसाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करण्यात आली. देशात स्वातंत्र्याच्या पुर्वीपासुन या घटकाच्या कल्याणासाठी विशेष तरतुदी संदर्भात चर्चा झालेली आहे. यातूनच घटनेमध्ये या घटकांच्या कल्याणासाठी आयोगाची तरतुद करण्यात आली तसेच अनेक बाबतीत सेवा, सुविधा, सवलती देण्यात आल्या आहेत. या व्यतिरिक्त कलम ३४०मध्ये इतर मागासवर्गासाठी आयोगाची स्थापना करण्यासंदर्भात घटनेतच तरतुद आहे. यानुसार राष्ट्रपतींनी दोन वेळा आयोग नेमले होते. कालेलकर आयोग,बी.पी. मंडल आयोग पण कालेलकर आयोगाच्या शिफारशीत ओबीसीची व्याख्या स्पष्ट नसल्याने लागू केला नाही. मंडल आयोगाने आपला अहवाल दिल्यानंतर तब्बल १० वर्षांनी व्ही.पी.सिंग सरकारने ओबीसींना २७ टक्के आरक्षणाचा अध्यादेश ऑगस्ट १९९० रोजी काढला. मात्र याला प्रचंड जनविरोध झाल्याने सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. यानंतर सप्टेंबर १९९१ ला नरसिंहराव सरकारने ओबीसीच्या २७ टक्के आरक्षणाची घोषणा केली. तसेच १०% आर्थिक मागासांना आरक्षणाची ही तरतुद करण्यात आली मात्र यालाही न्यायालयाने स्थगिती दिली. परंतु १६ नोव्हेंबर १९९२ रोजी न्यायालयाने नरसिंहराव यांच्या १०% आर्थिक आधारावरील आरक्षणाला विरोध केला पण ओबीसींसाठी २७% आरक्षणाचा निर्णय वैध ठरवला. पण ओबीसी मध्ये क्रिमिलेअर तत्वांचा अंगीकार करण्यास सांगीतले. आरक्षण नोकरीसाठी असेल पदोन्नतीसाठी नाही. सरकारने एक आयोग नेमून ओबीसीमध्ये कोणत्या जाती असाव्यात, इत्यादी संदर्भात अधिकार आयोगाला दयावा अशी सुचना केली. यानुसार संसदेत इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय इतर मागासवर्ग अधिनियम १९९३ पारित केला. त्यानुसार १९९३ साली न्या. आर. एन. प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय आयोगाची स्थापना केली.

वरीलप्रमाणे भारतीय राज्यघटनेस असणाऱ्या काही संवैधानिक मंडळाची पार्श्वभुमी आपणांस सारांश रूपाने सांगता येईल.

## १.२.४ वैधानिक मंडळाची पार्श्वभूमी

भारतात विविध वैधानिक मंडळाची स्थापना करण्यामागील कारणांचा आढावा आपण मागे बघितला आहे. या मंडळाच्या निर्मितीच्या पार्श्वभुमीचा थोडक्यात आढावा आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

स्वातंत्र्यानंतर देशाचा विकास करण्यासाठी नियोजित आर्थिक विकासासाठी नियोजन आयोगाद्वारे पंचवार्षिक योजनांची निर्मिती होवू लागली. तेव्हा हा विचार पुढे आला की केंद्रीय पातळीवर योजना निर्मितीमध्ये राज्यांचीही भुमिका असायला पाहिजे. भारतासारख्या विशाल देशात जेथे राज्यांनी व केंद्राने मिळून वेळोवेळी विकास योजनेवर चर्चा करण्यासाठी एखादया संस्थेची गरज होती. यानुसार केंद्रीय मंत्रिमंडळाच्या प्रस्तावाने एका कार्यकारी आदेशान्वये ६ ऑगस्ट १९५२ रोजी राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना झाली. वास्तविकपणे ही परिषद १९४६ मध्ये के. सी. नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार नियोजन मंडळ स्थापन करण्यात आले होते. त्याचेच संशोधित रूप आहे. राष्ट्रीय मानवधिकार आयोगाची पार्श्वभुमी ही जागतिक परिस्थिती व भारतातील त्याची प्रतिक्रिया यामध्ये दिसते. फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती इथपासून ते

युनोच्या मानवधिकार जाहीरनाम्यामुळे जगभरच मानवधिकार संदर्भात जाणीव जागृती वाढली होती. यूनोने १९८०मध्ये जगातील सर्व देशांना मानवधिकार आयोग स्थापन करण्यासंबधीचे आव्हान केले. त्याबरोबरच जागतीक पातळीवरच या संदर्भातील संस्थानीही प्रसार, प्रचार व दबाव वाढवला होता. यामुळे जगभरातील बहुतांश देशांनी आयोग स्थापन केले होते. याचा परिणाम भारतातही अनेक संस्था, संघटनांनी मागणी केली. १९८८ ला एल. एम. सिंघवी यांनीही शिफारस केली होती. १९९१ ला काँग्रेसने निवडणुक जाहीरनाम्यात घोषणा केली. १९९२मध्ये सर्व मुख्यमंत्राच्या परिषदेत ठराव संमत करण्यात आला. यामुळे १४ मे १९९२ ला संसदेत या संदर्भात विधेयक मांडले २८ सप्टेंबर १९९३ रोजी राष्ट्रपतीद्वारे मानवधिकार आयोगासंबधी अध्यादेश काढण्यात आला. यानंतर मानवधिकार सुरक्षा अधिनियम, १९९३ आस्तित्वात आला. या कायदयाच्या आधारावरच १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राष्ट्रीय मानवधिकार आयोगाची स्थापना झाली.

१९७०च्या नंतर जगभरातच महिला सबलीकरण किंवा स्त्रीवाद याबाबत प्रकर्षाने जाणीव जागृती वाढल्याचे दिसते. १९७५मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त शासनाला प्राप्त झालेल्या अहवालावर विशेष लक्ष केंद्रीत केले. १९८५ ते १९९०च्या दरम्यान महिलांच्या विकासासंदर्भात विचार केला गेला. ६, ७ व ८व्या पंचवार्षीक योजनेतही या संदर्भात विचार करण्यात आला होता. महिला व बालविकास विभाग मानव संसाधन विकास मंत्रालयाकडे सुपुर्द करण्यात आला. महिलांसाठी अनेक कायदे करण्यात आले आहेत. यांचे संरक्षण व महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी एक आयोग असावा असा विचार पुढे आल्याने ३० ऑगस्ट १९९० रोजी तत्कालीन जनता दल सरकारने राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम पारित केले. परंतु ३१ जानेवारी १९९२ रोजी महिला आयोगाची स्थापना झाली.

भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजाणीच्या ५० वर्षाचा कालावधी पुर्ण झाला. या अनुभवातुन राज्यघटनेमध्ये काही कमतरता राहून गेली किंवा लोकांची मानसिकता, मानवीय क्षमता त्या योग्य नाही की ज्यामुळे घटनेतील गोष्टींचे पालन करून शासन चालवू शकत नाहीत. यातुन काही वाद विवाद समोर येवू लागले. यामुळे असा विचार पुढे आला की राज्यघटनेची समीक्षा करावी किंवा काही भागात, तत्वात दुरुस्ती करण्यात यावी. यातुन राज्यघटना पुनर्विलोकनाचा विचार पुढे आला. परंतु १९९९ला १३व्या लोकसभेच्या निवडणुकीतील भाजपाप्रणित रालोआ आघाडीच्या जाहीरनाम्यात याला स्थान दिले. वाजपेयीचे सरकार स्थापन झाल्यानंतर २२ फेब्रुवारी २००० रोजी न्या. वैकटचलैया यांच्या अध्यक्षतेखाली राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोगाची स्थापना झाली.

जगभरात ५० हुन अधिक देशात माहिती अधिकाराचा कायदा झाला आहे.१७६६ मध्ये स्वीडनने प्रथम तो केला होता. युनोच्या मानवधिकारतही याचा उल्लेख आहे अमेरिकेने १९६६ साली स्पष्टपणे व व्यापक कायदा बनवला. १९९० नंतर जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानाच्या युगाने पारदर्शकता, जबाबदारी या तत्वाला महत्त्व प्राप्त झाल्याने याचा प्रचार प्रसार वाढला. अनेक देशांनी या कायदयाला संमती दर्शवून अंमलबजावणी केली. १९९४ मध्ये जागतिक बँकेनेही लोकशाही राष्ट्रांना आव्हान केले. या परिस्थितीचा प्रभाव देशभर झाला. व्ही. पी. सिंग यांनीही या कायदयाला समर्थन दाखवले होते. प्रेस परिषदेने ही शिफारस केली होती. अरूणा रॉय, अण्णा हजारे यांनी जनआंदोलन उभारले १९९६ च्या निवडणुकीत सर्वच राजकीय पक्षांनी निवडणुक जाहिरनाम्यात स्थान दिले. काही राज्य सरकारांनी हा अधिकार दिला होता. पाचव्या वेतन आयोगानेही या संदर्भात शिफारस केली होती. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणुन वाजपेयी सरकारेने एच. डी. शौरी यांच्या नेतृत्वातील गटाने दिलेल्या अहवालावर २५ जुलै २००० रोजी विधेयक मांडले ते पारितही झाले पण माहिती देणे यात बंधनकारक नसल्याने नवीन यु. पी. ए सरकारने २३ डिसेंबर २००४ रोजी नवीन विधेयक संसदेत प्रस्तुत केले. ११ मे २००५ साली मान्यता मिळाली व १५ जुन २००५ ला काही गोष्टी लागु केल्या तर बाकी १२ ऑक्टोबर २००५ ला हा कायदा संपुर्ण देशभर लागू केला. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कायद्यातच केंद्रीय माहिती आयोगाची स्थापनेसंदर्भात तरतुद करण्यात आली.

## *स्वंय-अध्ययनासाठी प्रश्न*

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) संवैधानिक मंडळे म्हणजे काय?

(२) निवडणूक आयोगाची स्थापना केव्हा झाली?

(३) वैधानिक मंडळाची स्थापना कोणाद्वारे केली जाते?

(४) राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना कोणाद्वारे करण्यात आली?

(५) कोणाच्या अध्यक्षतेखाली राज्यघटना पुनर्विलोकन आयोगाची स्थापना करण्यात आली?

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**संवैधानिक :** संविधानामध्ये तरतूद असलेले.

**वैधानिक :** कायदेशीर मान्यता असलेले.

**धर्मनिरपेक्ष :** राज्याचा कोणताही धर्म नसणे. राजसत्ता धर्माबाबत उदासीन असते. कोणत्याच धर्मकार्यात हस्तक्षेप न करण्याचे धोरण हे धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप आहे.

**जागतिकीकरण :** देशाची बाजारपेठ जागतिक बाजारपेठेशी जोडणे. जागतिकीकरण ही स्थानिक वस्तुची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया आहे.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) ज्या संस्था किंवा मंडळे यांची रचना, अधिकार, कार्य यांचा उल्लेख राज्यघटनेमध्ये केलेला असतो त्यांना संवैधानिक मंडळे असे म्हणतात.

(२) २५ जानेवारी १९५० रोजी निवडणूक आयोगाची स्थापना झाली.

(३) वैधानिक मंडळाची स्थापना ही संसद किंवा मंत्रिमंडळ यांच्याद्वारे निर्माण केलेल्या अधिनियमाद्वारे करण्यात येते.

(४) राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना केंद्रीय मंत्रिमंडळाच्या प्रस्तावाने करण्यात आली.

(५) न्यायमुर्ती वैकटचलैया यांच्या अध्यक्षतेखाली राज्यघटना पुनर्विलोकन आयोगाची स्थापना करण्यात आली.

## १.५ सारांश

राज्यघटनेमध्ये नमुद करण्यात आलेली मंडळे म्हणजेच संवैधानिक मंडळे होय. त्यांच्यात काहीही बदल करावयाचा असल्यास राज्यघटनेत दुरूस्ती करावी लागते. वैधानिक मंडळे ही संसदेद्वारे किंवा केंद्रीय व राज्य कायदे मंत्रिमंडळाच्या अधिनियमाने बनवता येतात. त्यांच्यात बदल करण्याचा अधिकार शासनालाच असतो.

भारतात विविध मंडळे स्थापन करण्यात आली कारण भारताची संसदीय लोकशाही व्यवस्था, संघराज्य, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय व कल्याणकारी राज्याचे तत्त्व आर्थिक विकास व जागतिक परिस्थिती या सर्वाच्या परिणामातुन अनेक संवैधानिक व वैधानिक मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या घटकात आपण भारताची सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती यामुळे संवैधानिक व वैधानिक मंडळे स्थापन करण्यात आली यांचा अभ्यास केला.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) संवैधानिक मंडळाचा अर्थ सांगा.

(२) वैधानिक मंडळाचा अर्थ स्पष्ट करा.

(३) संवैधानिक व वैधानिक मंडळाच्या निर्मितीची कारणे लिहा.

(४) संवैधानिक मंडळाची पार्श्वभूमी सांगा.

(५) वैधानिक मंडळाची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) जोशी, एस. (२००३). *भारतीय शासन व राजकारण.* औरंगाबाद, विद्या बुक पब्लिकेशन.

(२) कटारिया, एस. (२००८). *भारतीय लोकप्रशासन.* नवी दिल्ली, नॅशनल पब्लिकेशन.

(३) शर्मा, ए. (१९९९). *भारत में प्रशासनिक संस्थाएँ.* जयपूर, आर. बी. एस. ए. पब्लिकेशन.

(४) Kaushik, S. (1982). *Election in India its Social Basis*. Calcutta, Cambridge University Press.

(५) *लोकराज्य* (२०१४). महाराष्ट्र राज्य.


ज्ञानगंगा घरोघरी

# घटक २ : संवैधानिक मंडळे – भाग १

***अनुक्रमणिका***

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय-विवेचन
    २.२.१ भारताचा महान्यायवादी
    २.२.२ भारताचा नियंत्रक व महालेखा परीक्षक
    २.२.३ भारत निवडणूक आयोग
२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
२.४ स्वंय-अध्ययनासाठी प्रश्न
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

- भारताच्या महान्यायवादीची पात्रता, कार्यकाल यांची माहिती मिळेल.
- महान्यायवादीच्या कार्याची ओळख होईल.
- भारताचा नियंत्रक व महालेखा परीक्षकासंबंधी घटनेतील कलमांचा तसेच या पदाची नियुक्ती, इत्यादीविषयी माहिती सांगता येईल.
- भारताचा नियंत्रक व महालेखा परिक्षक हे पद देशाच्या वित्तीय व्यवस्थेत कसे महत्त्वाचे आहे हे त्याच्या अधिकार व कार्यावरुन लक्षात येईल.
- भारतीय निवडणूक आयोगाची रचना व कार्याची माहिती सांगता येईल.
- निवडणुक पद्धती व निवडणुक सुधारणांची माहिती मिळेल.

## २.१ प्रास्ताविक

भारतातील संवैधानिक मंडळे -१ या घटकात महान्यायवादी, नियंत्रक व महालेखापरिक्षक आणि भारतीय निवडणुक आयोग या तिन्ही घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

भारतीय राज्यघटनेत अनेक संवैधानिक मंडळाच्या निर्मीती व कार्यासंबंधी तरतुद करण्यात आली आहे. संसदीय राजव्यवस्था प्रभावीपणे राबवण्यासाठी अशा विविध घटनात्मक संस्थांच्या निर्मितीची व्यवस्था राज्यघटनेतच करण्यात आली आहे. अशा महत्त्वपूर्ण मंडळापैकी भारत सरकारचा कायदेविषयक अधिकारी महान्यायवादी या पदाचा अभ्यास करण्यात येणार

आहे. केंद्र सरकारला महत्वाच्या बाबीत कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन करण्याचे कार्य यांच्याकडून केले जाते. याबरोबरच संसदेच्या कामकाजात सहभागी होण्याचा अधिकार ही यांना असतो मात्र मतदानाचा अधिकार नसतो.

भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक या संस्थेचा व त्याच्या प्रमुखाचा अभ्यास करण्यात येणार आहे. देशाच्या आर्थिक व्यवस्थेतील हे महत्त्वाचे पद आहे. संचित निधी असो वा इतर सर्व आर्थिक बाबींवर नियंत्रण व त्यांचे लेखापरीक्षण करण्याची जबाबदारी यांच्यावरच असते. त्यांना देशाच्या आर्थिक कोषाचा संरक्षक म्हटले जाते. म्हणूनच या पदाचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

लोकशाही व्यवस्था ही निवडणुक प्रक्रियेवरच अवलंबून असते म्हणून राज्यघटनेत स्वतंत्र निवडणुक आयोगाची व्यवस्था केली आहे. निवडणुक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी अशा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता होती ती निवडणुक आयोगाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आली. भारतासारख्या विशाल लोकसंख्या, विस्तृत क्षेत्रफळ, सामाजिक, धार्मिक भिन्नता, निरक्षरता अशा अनेक समस्या व अडचणी असतांना जगातील सर्वात मोठया लोकशाहीमधील निवडणुका घेणे हे एक प्रकारचे दिव्यच आहे. सार्वत्रिक निवडणुकांबरोबरच राज्याच्या विधानसभेच्या निवडणुका, पोट निवडणुका, स्थानिक स्वराज्य संस्था हा व्याप बघितला तर आयोगापुढे किती मोठे आव्हान आहे याची कल्पना येते. मतदार नोंदणी, मतदार संघ पुर्नरचना, आदर्श आचारसंहितेचे पालन करुन घेणे, बदलत्या काळानुसार निवडणुक प्रक्रियेत करण्यात येणाऱ्या सुधारणा या सर्व गोष्टीही कराव्या लागतात. तेव्हा निवडणुक आयोग हे सुदृढ लोकशाहीसाठी आवश्यक आणि महत्त्वाची संस्था आहे. म्हणूनच याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

अशाप्रकारे या घटकात वरील तिन्ही संस्था ज्या कायदा, आर्थिक व्यवस्था व निवडणुक या क्षेत्रातील महत्त्वाच्या संस्था असल्याने त्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

## २.२ विषय-विवेचन

### २.२.१ भारताचा महान्यायवादी

भारतीय राज्यघटनेत कलम ७६(१)मध्ये वर्णन करण्यात आले की भारताच्या महान्यायवादीची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारे केली जाईल. भारतीय नागरिकत्व आणि सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणुक होण्यास पात्र असलेली व्यक्तीच या पदासाठी पात्र समजली जाते. राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंतच अशा व्यक्तीस या अधिकारपदावर राहता येते. हाच अधिकारी आहे जो संसदेचा सदस्य नसुनही संसदेच्या कार्यामध्ये सहभाग घेवू शकतो. तसेच आपले मत व्यक्त करु शकतो परंतु मतदान करु शकत नाही. भारत सरकारचा तो प्रथम कायदेविषयक अधिकारी आहे.

#### ● महान्यायवादीची कार्य

(०१) कायदेविषयक बाबी संदर्भात भारत सरकारला सल्ला देणे.

(०२) राष्ट्रपतीद्वारे सोपविलेली विधिविषयक कामे पार पाडणे.

(०३) राज्यघटना व अन्य कायद्याद्वारे त्यावर सोपविलेली कार्य पार पाडणे.

(०४) केंद्र सरकारतर्फे दिवाणी व फौजदारी दावे चालविणे.

(०५) योग्य न्यायासाठी एखाद्या उच्च न्यायालयातील खटला दुसऱ्या उच्च न्यायालयात चालविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे अर्ज करणे.

(०६) अधिवक्ता कायद्याखाली भारतीय वकील परिषदेने एखाद्या अधिवक्त्यास व्यावसायीक अथवा इतर गैरवर्तनाबद्दल दिलेला आदेश अन्यायकारक वाटल्यास सर्वोच्च न्यायालयाकडे अर्ज करणे.

(०७) भारतातील सर्व न्यायालयात युक्तीवाद करण्याचा अधिकार आहे.

(०८) संसदेच्या दोन्ही सभागृहातील कामकाजात तसेच सभागृहांच्या संयुक्त बैठकीत मतदानाचा हक्क सोडून एखाद्या संसदीय समितीस सदस्य असल्यास त्या समितीच्या बैठकीत भाषण करण्याचा व कामकाजात भाग घेण्याचा त्याला अधिकार आहे.

(०९) न्यायालयात केंद्र व राज्य सरकारचे प्रतिनिधीत्व करतो तरीसुद्धा तो वैयक्तिक वकीलीचा व्यवसाय  करु शकतो. कारण वेतन घेत नाही परंतु काही विशिष्ट रक्कम दिली जाते जी साधारणत: न्यायाधीशांच्या वेतनाएवढी असते.

(१०) महान्यायवादी दोन सॉलिसिटर जनरल व ४ अतिरिक्त सॉलिसिटर जनरलच्या मदतीने कार्य करत असतो.

वरीलप्रमाणे कार्य महान्यायवादीद्वारे केली जातात परंतु आजपर्यंत काही अनुभवामुळे वास्तविक पातळीवर बघितल्यास ही एक राजकीय नियुक्ती असते. त्यामुळे सरकारच्या मर्जीप्रमाणे काम केले जाते. यामुळे महान्यायवादीचे सल्ले बऱ्याचदा राजकीय प्रभावातून देण्यात आल्याचे दिसते.

अनेकदा असे दिसून आले आहे की, महान्यायवादींनी आपल्या सीमारेषेच्या बाहेर जावून काम केलेले आहे. इंदिरा गांधीच्या कार्यकाळात नीरेन डे एका प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटले होते की, आणीबाणीच्या काळात जीवीताचा अधिकार ही निलंबित केला जावू शकतो. याचप्रमाणे २००५ साली युपीए सरकार मायावती सोबत आघाडी करण्याचा प्रयत्न करत होते. तेव्हा महान्यायवादी मिलन के.बॅनर्जी यांचा विचार मायावतीला ताज कॅरेडॉर प्रकरणातून निर्दोष करण्याचा होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाने CBI ला सांगितले की महान्यायवादीच्या वक्तव्याचे पालन करु नये तर त्यांच्यासमोर सर्व पुरावे सादर करावीत. ज्यामुळे तथ्य त्यांच्या लक्षात येईल. तसेच २००९ साली बॅनर्जी यांनी बोफोर्स घोटाळयामधील ओटेविया क्वात्रोचिला निर्दोष मुक्त केले. यामुळे महान्यायवादीच्या स्थितीचे अवमुल्यन व ऱ्हास झाला असे म्हणता येईल.

महान्यायवादी हे पद माहितीच्या अधिकारांतर्गत येत नाही कारण हे काही सार्वजनिक प्राधिकरण नाही तसेच लोकसेवक ही नाही. यामुळे कायद्याच्या त्रुटीमुळे या निर्णयावर न्यायालयीन समीक्षा करण्याची मागणी केली जात आहे.

## २.२.२ भारताचा नियंत्रक व महालेखा परीक्षक

भारत सरकारची वित्तीय व्यवस्था व अनावश्यक खर्च नियंत्रित ठेवण्याच्या उद्देशानेच घटनाकारांनी नियंत्रक व महालेखापरीक्षक हे पद निर्माण केले आहे. तो केंद्र व राज्याच्या दोन्ही वित्तीय प्रणालीचे नियंत्रण करत असतो.

घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. भिमराव आंबेडकर यांच्या मतानुसार, भारताचा नियंत्रक व महालेखा परीक्षक भारताच्या घटनेच्या अंतर्गत सर्वाधिक महत्त्वाचा अधिकारी आहे. देश व राज्याच्या संचित निधिमधून योग्य अधिकार व प्रक्रियेशिवाय एक पैसाही खर्च झाला नाही पाहिजे हे पाहणे त्याचे कर्तव्य आहे. भारतातील लेखापरीक्षण व प्रणालींचा निष्पक्ष प्रमुख आहे. यामुळेच हे पद कार्यपालिकेच्या नियंत्रणात किंवा अधीन ठेवले नाही जेणेकरून तो आपल्या कर्तव्याचे पालन योग्य प्रकारे करू शकेल' भारतीय राज्यघटनेमधील हे पद भारतीय अधिनियम १९३५च्या कायद्यामधील महालेखा परीक्षकाच्या आधारावर निर्माण केल्याचे दिसते. महालेखापरीक्षकाला सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या समकक्ष मानले जाते.

### (१) नियुक्ती, वेतन, इत्यादी – कलम १४८

घटनेतील कलम १४८ अंतर्गत नियंत्रक व महालेखापरीक्षकाची व्यवस्था केली जाते. राष्ट्रपतीच्याद्वारे हस्ताक्षर व मुद्रे 'सहित नियूक्ती केली जाते' राष्ट्रपती किंवा त्यांच्याद्वारे नियूक्त केलेल्या व्यक्तीच्या समक्ष शपथ घ्यावी लागते' कॅगच्या सेवाशर्ती, वेतन, पेंशन, इत्यादी संदर्भात संसद नियम बनवू शकते मात्र नियुक्तीनंतर या संदर्भात अडचणीचा ठरेल असा बदल करू शकत नाही. या पदाच्या निवृतीनंतर भारत सरकार व इतर राज्य सरकारमध्ये कोणत्याही पदासाठी पात्र नसेल. कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, इत्यादी खर्च संचित निधीमधूनच केला जाईल. कॅगचे वेतन सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाइतकेच असेल इतर विषयाच्या बाबतीत त्याच्या सेवाशर्ती भारत सरकारच्या सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याच्या सदस्यांना लागु होणारे नियम त्यालाही लागू होतील.

नियंत्रक व महालेखापरीक्षकाचा कार्यकाळ ६ वर्षाचा निर्धारित केला गेला आहे परंतु वयाची ६५ वर्षपूर्ण केल्यास ६ वर्ष कालावधी पुर्ण होण्याअगोदरही कार्यकाळ समाप्त होतो. याबरोबरच तो कोणत्याही वेळी राष्ट्रपतीला उद्देशुन आपल्या सहीनिशी राजीनामा देवू शकतो. तसेच त्यांना महाभियोगाद्वारेही हटवता येवू शकते.

या संदर्भात नियंत्रक महालेखापरीक्षक (कर्तव्य, सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ पारित केला तो १९७६, १९८४ व १९८७ मध्ये संशोधित केला  आहे'

### (२) संरचना

नवी दिल्ली येथे मुख्य कार्यालय असून राज्यात अनेक कार्यालये आहेत. देशभरात ८३ शाखा कार्यालय, १३६ क्षेत्रीय कार्यालय, ४६१ रेजिडण्ट लेखा परीक्षण कार्यालय आहेत. एक-एक कार्यालय लंडन व न्यूयार्क मध्येही आहे. सी. ए. जी.च्या मदतीसाठी दोन उप कॅग आहेत. त्यांच्या नंतर सहायक सी. ए. जी. संचालक, व इतर कर्मचारी कार्यरत आहेत. दोन भागात कार्यालय विभागले आहे  १ लेखा, २ लेखापरीक्षण.

राज्यपातळीवरही एजी कार्यालयात महालेखाकार, लेखा परीक्षण असतात. त्यांच्या मदतीसाठी अनेक अधिकारी, कर्मचारी कार्यरत असतात. भारतीय लेखा व लेखापरीक्षण विभागाच्या कार्यालयात ५२,००० हून अधिक अधिकारी, कर्मचारी कार्यरत आहेत. यांना राष्ट्रीय लेखापरीक्षण व लेखा अकादमी शिमला येथून प्रशिक्षण दिले जाते. तसेच तृतीयवर्ग कर्मचाऱ्यांना विभागीय केंद्रामधूनही प्रशिक्षण दिले जाते' उदा' इलाहाबाद, मुंबई, जयपुर, जम्मु, चेन्नई, नागपुर, कोलकत्ता, रांची, शिलांग, इत्यादी.

## (३) अधिकार व कार्य

### ● अधिकार

सन १९७६ च्या कायद्यानुसार शक्ती व कार्य खालीलप्रमाणे सांगता येतील -

(१) कोणत्याही कार्यालयाचे किंवा संघाचे लेखापरीक्षणासाठी निरीक्षण करण्याचा अधिकार आहे.

(२) लेखापरीक्षणासाठी सर्व कागदपत्रे मागवू शकतात.

(३) लेखा अहवाल बनवण्यासाठी आवश्यक सुचना देणे.

(४) लेखापरीक्षणाचे क्षेत्र,स्वरुप,प्रमाण निर्धारित करण्याची पूर्ण अधिकार आहे.

### ● कार्य

**लेखापरीक्षण करणे**

सी एजी (कॅग) चे प्रथम कार्य लेखापरीक्षण करणे हे आहे. यामुळेच प्रशासकीय यंत्रणा योग्य व निर्धारित नियमानुसारच खर्च करण्याचा प्रयत्न करतात'खालील प्रमुख कार्य यामध्ये आहेत.

(१) संचित निधीमधील राज्य सरकार व केंद्र सरकारांचा जमा व खर्च तपासणे.

(२) सरकारी संघटना, कंपनी व सार्वजनिक उपक्रम यांचे भांडार व माल तपासणे.

(३) आकस्मिक निधी व लोकलेखा यामधून देणे घेणे.

(४) केंद्र व राज्य यांच्या संचित निधीवर अवलंबून असलेले सर्व प्राधिकरणे व घटक.

(५) विशिष्ट उददेशासाठी सरकारकडून घेतलेले अनुदान व कर्ज घेतलेले घटक व संस्था.

यामध्ये खर्चाच्या कारणांची माहिती करुन घेणे, सूचना देणे, राज्य व केंद्राचे वार्षिक लेखांचे प्रमाणीकरण करणे ह्या गोष्टीही तपासल्या जातात'

## (४) राष्ट्रपती व राज्यपालांना अहवाल देणे

कलम-१५१ नुसार आपल्याकडील संपादित लेखापरीक्षणा संबंधी कार्याचा अहवाल केंद्र सरकार संबंधित राष्ट्रपतींना व राज्यासंबंधी राज्यपालांना सोपवला जातो. यात मागणी व त्यानुसार केला गेलेला खर्च वार्षिक जमा खर्च याचा आढावा घेतला गेलेला असतो'

## (५) लोकलेखा समितीशी समन्वय साधणे

सीएजीचा अहवाल केंद्रात संसदीय लोकलेखा समितीकडे तर राज्यात विधानसभा लोकलेखा समितीकडे सोपवला जातो. यामध्ये समितीला गंभीर व महत्त्वपूर्ण गोष्टी वाटल्यास त्याच्या पुढील चौकशीसाठी सीएजी व एजी सहकार्य पुरवतात.

## (६) आर्थिक अनियमिततेवर अंकुश ठेवणे

विविध प्रशासकीय विभागाची लेखापरीक्षणाचा अहवाल लोकलेखा समितीला दिला तरीपण सी ए जी (कॅग) (CAG) संबंधित विभागाकडून जर अनियमित अर्थिक कार्य व कार्यवाहीकडे लक्ष दिले जाते यामुळेच तर अनेक प्रशासकीय संस्था विभाग खर्च नियमानुसार करण्यावर भर देतात. अन्यथा सी.ए.जी. अहवालामुळे अनेक प्रकरणे पुढे आलेली आहेत.

या व्यतिरिक्त इतर काही कार्य सी ए जी कडून केली जातात. यामध्ये संयूक्त राष्ट्राच्या लेखापरीक्षणाला मदत करणे सरकारी खर्च, संपत्ती, साहित्य, वस्तुंचा दुरुपयोग रोखणे, इत्यादी.

सारांशरूपाने असे म्हणते येते की सी.ए.जी. केंद्र व राज्य सरकारच्या अर्थिक प्रशासनाला योग्य पद्धतीने नियंत्रित व नियमित करत आहे. सीएजीच्या अहवालावर राज्यसरकारे तात्काळ कार्यवाही करत नाहीत असे १९९३ रोजी शकधर समिती ने आपल्या अहवालात म्हटले आहे'

एपलबी यांनी सी.ए.जी.बद्दल नकारात्मक मत मांडले होते पण नेहरूंनी ते मान्य केले नाही. आणखी काही विचारवंत सी.ए.जी.बद्दल नकारात्मक मत मांडतात की तो केवळ लेखापरीक्षक आहे. नियंत्रक नाही कारण संचित निधीतून खर्चासाठी सी.ए.जी.च्या परवानगीची गरज नाही किंवा त्यावर त्याचे नियंत्रण नाही. परंतु संविधान त्याला नियंत्रक व महालेखापरीक्षकाच्या स्वरूपात व्यक्त करत आहे. परंतु माजी कॅग अशोक चंदा यांनी या पदाचे स्थान महत्त्वाचे आहे असे मत मांडले आहे.

## २.२.३ भारत निवडणूक आयोग

भारत एक संसदीय लोकशाही असणारा देश आहे. या व्यवस्थेमध्ये नियमित, स्वतंत्र आणि निपक्ष निवडणुका घेणे आवश्यक असते. या निवडणुकांद्वारे संसदेतील दोन्ही सभागृहांतील सदस्य, राज्य व केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा सदस्य आणि राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांचे निर्वाचण केले जाते. या निवडणूकीचे संचालन, निर्देशन आणि नियंत्रणाची पूर्ण जबाबदारी निवडणूक आयोगावर सोपवलेली आहे. भारत निवडणूक आयोग हा स्थायी घटनात्मक संस्था आहे. घटनेनुसार निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी करण्यात आली. २००१ साली आयोगाने आपले स्वर्ण जयंती वर्ष साजरे केले.

### (१) आयुक्तांची नियुक्ती आणि कार्यकाळ

मुख्य निवडणूक आयुक्त आणि अतिरिक्त निवडणूक आयुक्तांची निवड राष्ट्रपतीद्वारे केली जाते. त्यांचा कालावधी ६ वर्ष किंवा ६५ वर्ष यांपैकी जे अगोदर असेल तोपर्यंत तो पदावर असेल. त्यांचा दर्जा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या बरोबरीचा असल्याने त्याच प्रमाणात वेतन व इतर लाभ मिळतात. मुख्य निवडणूक आयुक्ताला केवळ महाभियोगाद्वारेच हटवले जावू शकते.

### (२) संरचना

भारत निवडणूक आयोगाचे स्वतंत्र सचिवालय असून साधारणत: ३०० अधिकारी/कर्मचारी पदानुक्रमाने कार्य करतात. आयोगाच्या कार्यामध्ये सहकार्य करण्यासाठी सचिवालयात वरिष्ठ अधिकारी यांच्या रूपात उपनिवडणूक आयुक्त, महासंचालक, संचालक, प्रधान सचिव, सचिव, अप्पर सचिव, उपनिदेशक, उपनिर्वाचन आयुक्त आणि महासंचालकांना सहकार्य करतात. आयोगामध्ये कार्यात्मक व प्रादेशिक वितरण केले जाते.

घटक राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या पातळीवर मुख्य निवडणूक अधिकारी हा निवडणूक यंत्रणेचा प्रमुख असतो त्याच्या आधीनच संपूर्णत: परीक्षण, निर्देशन आणि नियंत्रण असते. राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या सल्ल्याने निवडणूक आयोग त्याची नेमणूक करते. सामान्यत: राज्यसरकारच्या प्रशासकीय व न्यायीक अधिकाऱ्यांमधून ही निवड केली जाते. त्याच्या मदतीला सह, उप किंवा सहाय्यक निवडणूक अधिकारी आणि त्याने संबंधीत राज्यसरकारच्या सल्ल्याने नेमलेला अन्य कर्मचारी वर्ग असतो. मुख्य निवडणूक अधिकारी पूर्णवेळ असतो किंवा राज्यसरकार त्याच्याकडे इतरही जबाबदाऱ्या सोपवू शकते. मतदारांच्या याद्या तयार करणे व निवडणुकांचे संचलन करणे या कामांचे तो पर्यवेक्षण करतो.

जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी किंवा कार्यकारी अधिकारी आपल्या नियमित कार्यासोबतच निवडणूकविषयक जबाबदाऱ्याही पार पाडतो. १९६६ पासून त्याच्यावर हे कार्य अधिकृतपणे सोपवण्यात आले आहे. निवडणूक नोंदणी अधिकाऱ्याकडे मतदार याद्या तयार करण्याचे व त्यांना अद्ययावत करण्याचे कार्य असते. सहायक निवडणूक नोंदणी अधिकारी त्याला त्याकाळी मदत करतात. प्रत्येक मतदारसंघात निवडणूक अधिकारी (रिटर्निंग ऑफीसर) निवडणुकांची देखरेख करतो. राज्यसरकारच्या सल्ल्याने निवडणूक आयोग त्याचे नामनिर्देशन करतो. या खेरीज प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्रप्रमुख, मतदान अधिकारी, इत्यादींची नेमणूक योग्य प्रमाणात जिल्हा निवडणूक अधिकारी करतो.

### (३) अर्थसंकल्प आणि खर्च

निवडणूक आयोगाच्या सचिवालयाचे स्वतंत्र बजट असते. आयोग आणि केंद्रिय वित्त मंत्रालयाच्या चर्चेतून ते तयार केले जाते. जर लोकसभेच्या निवडणुका होणार असतील तर त्याचा संपूर्ण खर्च केंद्र सरकार करते. विधानसभेच्या निवडणुकीचा खर्च मात्र संबंधित राज्याला करावा लागतो. दोन्ही निवडणुका एकाचवेळी झाल्यास खर्चाची समसमान विभागणी होते. निवडणूक याद्या, निवडणूक ओळखपत्र यासंबंधी खर्चही समानपणे केला जातो. निवडणूक आयोगात कार्यकारी हस्तक्षेपास प्रतिबंध आहे.

(१) आपल्या कार्याची पूर्तता करण्यासंबंधी निवडणुक आयोग कार्यकारी हस्तक्षेपापासून मुक्त आहे. निवडणुकांचे संचालन त्यासाठीचा कार्यक्रम मग सार्वत्रिक निवडणूक असो की पोटनिवडणूक हे सर्व ठरवण्यात आयोगच निर्णय घेते. मतदान केंद्राचे स्थान, मतदारांचे वितरण, मतदान मोजणी केंद्राचे ठिकाण या सर्वच बाबींवर आयोगच निर्णय घेते.

(२) राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे बंधनकारक असते. निवडणुकांत मिळणारी मते आणि आयोगाने निश्चित केलेले निकष यावरून पक्षांना राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ओळखले जाते. निवडणुका जाहीर करण्यापूर्वी आयोगाकडून राजकीय पक्षांशी वेळोवेळी चर्चा करण्यात येते काम करतांना पक्षांतर्गत लोकशाही कायम राहील यावर आयोगाचे लक्ष असते.

(३) राज्यघटनेत निवडणूक आयोगाला संसद व विधानसभा सदस्यांच्या निवडणुकीनंतर योग्य अयोग्यतेसंबंधी सल्ला देण्याचा अधिकार आहे. याशिवाय निवडणूक प्रक्रियेत भ्रष्टाचार केल्याचे प्रकरण सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयात असल्यास त्यावर आयोगाचे मत महत्त्वपूर्ण मानले जाते. उमेदवारांनी निवडणूकीत किती खर्च करावा यावर मर्यादा घालून दिल्या आहेत. आयोगाने आखून दिलेल्या मर्यादेत आणि ठराविक कालावधीत निवडणुकीचा खर्च उमेदवाराने सादर न केल्यास त्याला अपात्र ठरवण्याचे अधिकार आयोगाला आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्णयांना सर्वोच्च व उच्च न्यायालयात आव्हान देता येवू शकते.

(४) प्रसार माध्यमे : प्रसार माध्यमांच्या संदर्भात आयोगाने व्यापक धोरण आखले आहे. निवडणुकीच्या दरम्यान निवडणूककाळात सर्व प्रकारच्या प्रसार माध्यमांना माहिती दिली जाते. तसेच मतदान केंद्र व मतमोजणी केंद्र या ठिकाणीही संचालन अहवाल (रिपोर्ट) साठी सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मीडियालाही प्रवेश दिला जातो. तसेच काही सांसदीय रिपोर्ट आणि काही महत्त्वाची माहिती प्रकाशित केली जाते. तसेच पुस्तकालय, संशोधन व मीडिया प्रतिनीधीसाठी उपलब्ध आहे.

## (४) निवडणूक आयोगाचे अधिकार व कार्ये

निवडणूक आयोगावर सोपवलेली कार्य ही बहुविध स्वरुपाची आहेत आयोगाचे कार्ये विशाल आहे. देशाची लोकसंख्या, क्षेत्रफळ, प्रतिनिधीची संख्या हया सर्वांची आकडेवारी बघितल्यास आयोगाच्या कार्याची व्याप्ती लक्षात येते.

(०१) मतदारसंघाची आखणी करणे.

(०२) मतदार याद्या तयार करणे.

(०३) राजकीय पक्षांना मान्यता देणे आणि मतदान चिन्ह देणे.

(०४) नामांकन पत्रांची छाननी करणे.

(०५) निवडणुकांचे संचालन करणे.

(०६) निवडणूक खर्चावर लक्ष ठेवणे.

(०७) पोटनिवडणूका घेण्याचा अधिकार.

(०८) निवडणूका रद्द करण्याचा अधिकार.

(०९) राजकीय पक्षांसाठी आचारसंहिता तयार करणे.

(१०) राजकीय पक्षांना आकाशवाणीवर प्रचार करण्याची सुविधा देणे.

(११) मतदारांना राजकीय प्रशिक्षण देणे.

(१२) निवडणूक याचिका संदर्भात सरकारला सल्ला देणे.

## (५) निवडणुकीतील दोष व सुधारणा

आजपर्यंत झालेल्या १६ सार्वत्रिक निवडणुकांवरून निवडणुकीतील काही दोष समोर आलेले दिसून येतात.

(१) अल्पमतांचा विजय होतो ज्याला सर्वाधिक मते तो विजयी.

(२) निवडणुकीमध्ये अति पैसे खर्च करण्याची प्रवृत्ती दिसून येते.

(३) मतदारांमध्ये निष्क्रियता दिसते म्हणून मतदानाची आकडेवारी कमी आढळते.

(४) शासकीय यंत्रणेचा गैरवापर सत्ताधारी पक्षामार्फत केला जातो.

(५) निवडणुकीत गुन्हेगारीकरणाचे वाढते प्रमाण.

वरील दोष निवडणूक प्रक्रिया दिसून येतात हे सर्व दूर करण्यासाठी बऱ्याच प्रमाणात आजवर प्रयत्न झालेले आहेत' याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल'

(१) तारकुंडे समिती - १९७४

(२) श्यामलाल शकधर सुधारणा - १९७७

(३) दिनेश गोस्वामी समिती - १९९०

(४) टी. एन. शेषन यांनी सुचवलेल्या शिफारशी - १९९२

(५) इंद्रजीत गुप्त समिती - १९९८

(६) प्रणव मुखर्जी समिती - २००२

(७) निवडणूक संबंधित संशोधन अधिनियम - २००३

अशा प्रकारे अनेक समित्या आयोगामार्फत निवडणुकामधील अपप्रकार व गैरप्रकार रोखण्यासाठी प्रयत्न झालेले आहेत पण काही शिफारशींची कार्यवाही झाली तर काही धूळ खातच पडल्या आहेत. सन २००४ साली इलेक्ट्रॉनिक मतदान संपूर्ण देशभर करण्यात आले. सन २००३च्या कायद्याने उमेदवारांना आपली सर्व आर्थिक माहिती, गुन्हेगारी संदर्भातील माहिती देणे बंधनकारक केले. अनामत रकमेत वाढ, निवडणूक खर्च, मतदारांचे वय, अनिवासी भारतीयांना मतदानाचा अधिकार, आदर्श आचारसंहिता पालन, मतदारांना छायाचित्रासह ओळखपत्र, प्रचारयंत्रनेसंबंधी सुधारणा या आणि अशा सुधारणा घडून आल्या. या व्यतिरिक्त आणखीन बऱ्याच सुधारणांची गरज आहे. यामध्ये निवडणुकांच्या अर्थकारणा संबंधी, राजकारणाच्या गुन्हेगारी करण्यास पायबंद घालण्यासाठी करावयाच्या सुधारणा, निवडणूक आयोगाशी संबंधीत सुधारणा, मतदानपद्धती संबंधित सुधारणा, प्रतिनिधींच्या वर्तनाशी संबंधित सुधारणा आणि नागरिकांच्या वर्तनाशी संबंधित सुधारणा, इत्यादी.

### *स्वंय-अध्ययनासाठी प्रश्न*

**योग्य जोड्या लावा.**

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| (१) | तारकुंडे समिती | (अ) १९९८ |
| (२) | दिनेश गोस्वामी समिती | (ब) १९७४ |
| (३) | इंद्रजित गुप्त समिती | (क) २००२ |
| (४) | प्रणव मुखर्जी समिती | (ड) १९९० |

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**महान्यावादी :** शासनाचा कायदेविषयक सल्लागार.

**अर्थसंकल्प :** शासनाच्या एका आर्थिक वर्षातील जमा व खर्चाचे अंदाजपत्रक.

**लेखापरीक्षण :** लेखे, ताळेबंद, दस्तऐवज, ध्येयधोरण या सर्वांची विविध कसोट्या लावून टिकात्मक, चिकित्सकपणे केलेली तपासणी

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) ब

(२) ड

(३) अ

(४) क

## २.५ सारांश

महान्यायवादी हा भारताचा प्रथम कायदेविषयक अधिकारी आहे. कायदेविषयक बाबीविषयी भारत सरकारला सल्ला देण्याचे महत्त्वपुर्ण कार्य महान्यायवादी करत असतो. भारत सरकारतर्फे दिवाणी व फौजदारी खटला चालवण्याचे कार्ये केले जाते. महान्यायवादीची नियुक्ती आणि कार्यकाळ राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत असल्याने अनेकदा सरकारच्या मर्जीचे सल्ले व कार्य करण्यात आल्याचे दिसून आले आहे.

भारतीय वित्तीय व्यवस्था व खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियंत्रक व महालेखापरीक्षक पद घटनाकारांनी निर्माण केले आहे. संचित निधीमधील खर्च योग्य प्रक्रियेद्वारा व्हावा व भारतातील संपुर्ण लेखापरीक्षण प्रणालीचा तो निष्पक्ष प्रमुख आहे. म्हणूनच हे पद कार्यपालिकेच्या अधीन ठेवले नाही. नियुक्ती, बडतर्फी याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणेच व्यवस्था केली आहे. केंद्र व राज्य यांच्या संचित निधी, संकट निधी व लोकलेखा संबंधी सर्व खर्चाचे लेखापरीक्षण आणि त्यावर निवेदन देण्याचे कार्य कॅग कडून केले जाते.

भारतासारख्या संसदीय लोकशाही असणाऱ्या देशातील सर्व निवडणुका स्वतंत्र, नियमित आणि निपक्ष घेण्यासाठी निवडणुक आयेगाची भुमिका महत्त्वाची आहे. निवडणुक आयुक्त, उपायुक्त यांचा दर्जा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे असतो. आयोगाची संरचना राज्य व जिल्हा पातळी पर्यंत ठरवण्यात आली आहे. आयोगाचे स्वतंत्र बजट असते. आयोगाच्या कार्यात कार्यकारी हस्तक्षेपास प्रतिबंध आहे. आयोगाची कार्ये ही व्यापक स्वरुपाची आहेत. मतदारसंघ आखणी, मतदार नोंदणी, राजकीय पक्षांना मान्यता, निवडणुकांचे संचालन, मतदारांना प्रशिक्षण, इत्यादी कार्ये आयोग पार पाडत असते. आजपर्यंतच्या निवडणुकामध्ये दिसून आलेल्या उणीवा दूर करण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न करुन निवडणुक सुधारणा करण्यात आल्या आहेत काही विचाराधीन आहेत.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) महान्यायवादीच्या कार्याचा आढावा घ्या.

(२) नियंत्रक व महालेखापरीक्षकाच्या कार्याची माहिती देवून मुल्यांकन करा.

(३) भारतीय निवडणुक आयोगाची रचना स्पष्ट करा.

(४) निवडणुक आयोगाची कार्ये सांगा.

(५) निवडणुकीतील दोष व निवडणुक सुधारणा या विषयी थोडक्यात माहिती द्या.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) सिंघवी, एल. (२००७). *भारत का संविधान.* नई दिल्ली, प्रभात प्रकाशन.

(२) जैन. पी., फडिया, बी. एल. (२०१२). *भारतीय शासन एवं राजनीती.* आगरा, साहित्य भवन प्रकाशन.

(३) कटारिया, एस. (२००८). *भारतीय लोकप्रशासन.* नवी दिल्ली, नॅशनल पब्लिकेशन हाऊस.

(४) मळेकर, एच. (२००९). *ओळख निवडणूक आयोगाची.* महाराष्ट्र टाईम्स.

(५) Kothari, R. (1989). *Politics and People Vol-I..* Udaipur, Raj : Apex Publishing House.

# घटक ३ : संवैधानिक मंडळे – भाग २

*अनुक्रमणिका*


३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय-विवेचन
    ३.२.१ केंद्रिय लोकसेवा आयोग
    ३.२.२ राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग
    ३.२.३ राष्ट्रीय अनुसुचित जमाती आयोग
    ३.२.४ राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग
३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
३.५ सारांश
३.६ सरावासाठी स्वाध्याय
३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

- भारतातील लोकसेवेची स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तरकाळातील पार्श्वभुमी ची माहिती मिळेल.
- केंद्रीय लोकसेवा आयोगाची रचना व कार्ये यांची माहिती होईल.
- अनुसुचित जाती संदर्भातील घटनेतील तरतुदींची माहिती व अनुसुचित जाती आयोगाची माहिती मिळेल.
- अनुसुचित जमाती आयोगाची माहिती प्राप्त होईल.
- इतर मागासवर्गासाठी स्थापन करण्यात आलेले आयोग आणि स्थायी स्वरुपाचा आयोग याविषयी माहिती मिळेल.

## ३.१ प्रास्ताविक

संवैधानिक मंडळे भाग-२ या घटकामध्ये केंद्रीय लोकसेवा आयोग, अनुसुचित जाती व जमाती आयोग आणि इतर मागासवर्गीय आयोग यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

कल्याणकारी राज्याच्या उदयापासुन नोकरशाहीस महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. शासनाचे वाढते कार्यक्षेत्र यामुळे नोकरशाहीवर जबाबदाऱ्याही वाढल्या आहेत. विकसनशील देशात तर नोकरशाहीची भुमिका आणखी महत्त्वाची आहे. भारताचा विकास करावयाचा असेल तर नोकरशाहीला विकासाचे साधन बनावे लागेल. नोकरशाहीत योग्य व कर्तव्यदक्ष लोकांची भरती व्हावी यासाठी स्वतंत्र व नि:पक्ष संस्थेची आवश्यकता होती. ती लोकसेवा आयोग निर्माण करण्यात येवून पुर्ण केली आहे.

भारताच्या लोकसेवेचा इतिहास हा तसा जुनाच आहे वसाहतिक काळापासुन सुरुवात होवून स्वातंत्र्यानंतरही त्यात

सुधारणा करत आजच्या लोकसेवेत त्याचे रुपांतर झाल्याचे दिसते. अखिल भारतीय सेवा, केंद्रीय सेवा, राज्यसेवा, इत्यादी सेवांच्या माध्यमातुन नोकरशाहीचे स्वरुप आपणास दिसते. अखिल भारतीय पातळीवरच्या सेवे करिता स्वतंत्र केंद्रीय लोकसेवा आयोग तर राज्यपातळीवरच्या भरतीसाठी राज्य लोकसेवा किंवा संयुक्त लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. यांच्या माध्यमातुन भारतातील नोकरभरती केली जात आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाची रचना कार्य व त्यांच्या कार्यातील सुधारणा याचा आढावा घेण्यात येणार आहे.

भारतात अनुसुचित जाती, जमातींच्या कल्याणसाठी विविध तरतुदी घटनेत केल्या आहेत. या बरोबरच अनुसुचित जाती, जमातीसाठी एका स्वतंत्र आयोगाची स्थापना करण्याचे नमुद केले आहे. ८९ व्या घटनादुरुस्तीने अनुसुचित जमातीसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची तरतुद केली. या दोन्ही आयोगाचा आढावा या घटकात करण्यात येणार आहे.

देशाच्या लोकसंख्येत दलितापेक्षा बऱ्या अवस्थेत पण तथाकित सवर्ण जातीपेक्षा निम्न दर्जा असणारा एक मोठा वर्ग अस्तित्त्वात होता याचा विचार करून या घटकाच्या उन्नतीसाठी काका कालेलकर समिती, बी. पी. मंडल आयोग यांची स्थापना केली होती.यांच्या शिफारशीनुसारच १९९० साली व्ही. पी. सिंग सरकारने मंडल आयोग लागू केला त्यावर तीव्र प्रतिक्रिया झाल्याने सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. परंतु १९९२ ला व्ही. पी. सिंगाचा निर्णय वैध ठरवला व घटनेत कलम ३४० प्रमाणे एका स्थायी आयोगाची स्थापना करण्याची शिफारस केली. या सर्व घडामोडींचा व आयोगाची रचना व कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या घटकात केला जाईल.

## ३.२ विषय–विवेचन

### ३.२.१ केंद्रिय लोकसेवा आयोग

आधुनिक काळात लोकसेवेला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. समाज हा अधिक गतिमान बनला आहे व या गतिमानतेतून सार्वजनिक स्वरुपाचे लहान मोठे प्रश्न निर्माण होत आहेत. राज्याच्या कार्यक्षेत्रात कल्याणकारी राज्यकल्पनेचा व समाजवादी राज्याचा जसजसा विकास होत गेला तसतसा कायदा व सुव्यवस्था पाहण्याची पारंपारिक जबाबदारीच तेवढी राज्याकडे नसून विविध कार्यक्रम हाती घेऊन व त्यांची अंमलबजावणी करुन समाजाला विशिष्ट वळण देण्याची जबाबदारी राज्यसंस्थेवर येऊन पडली आहे. परिणामी शासनाचे कार्यक्षेत्र झपाट्याने वाढत जाऊन सनदी सेवांवरील जबाबदाऱ्या व कार्येही वाढत गेली या विविध कारणांमुळे बहुतेक सर्व राष्ट्रांत शासकीय धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या नोकरांच्या संख्येत व त्यामुळे नोकर यंत्रणेच्या आकारात खूपच वाढ झाली आहे. यामुळेच पूर्वी सनदी सेवांचा अभ्यास अनुशासकीय सत्तेचा एक घटक या नात्याने केला जात असे. तो आज मात्र शासनाच्या क्षेत्रात स्वत:चे एक आगळे वेगळे महत्त्व व स्थान या स्थायी प्रशासकांनी निर्माण केल्यामुळे हा एक स्वतंत्र अभ्यास विषय ठरू लागला आहे. नोकरभरतीसाठी गुणवत्ता तत्त्वाचा स्विकार व त्यामुळे नोकर वर्गाची गुणवत्ता व प्रावीण्य कार्यकाळात त्यांना लाभलेली सुरक्षितता धोरण निर्मितीस आवश्यक असणाऱ्या माहितीवरील त्यांचे नियंत्रण आणि त्यांच्यात वाढत चाललेला संघटनावाद यामुळे नोकरवर्ग एक महत्त्वाची 'राजकीय शक्ती'च बनला आहे. राजकीय व्यवस्थेचे यशापयश बऱ्याचदा नोकरवर्गाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहू लागले आहे.

लोकसेवेच्या भुमिकेची यथार्थ जाणीव होती. त्यामुळेच लोकशाही व सामाजिक न्यायावर आधारित कल्याणकारी राज्याचा आदर्श पुढे ठेवणारी घटना तयार करतानाच त्यांनी त्यात निष्पक्ष, कार्यक्षम स्वतंत्र सार्वजनिक सेवांचासुद्धा अंतर्भाव केलेला दिसतो. भारताच्या न्याय व्यवस्थेप्रमाणेच भारताच्या प्रशासन व्यवस्थेची रचनाही एकत्र असावी. असा निर्णय घटनाकारांनी घेतला. संघराज्याच्या तत्त्वाला मुरड घालुन त्यांनी केंद्र व राज्य या दोहोंसाठी संमिश्र असलेल्या अखिल भारतीय सेवा हा प्रकार निर्माण केला. भारतीय प्रशासकीय सेवा आणि भारतीय पोलीस सेवा केंद्र व राज्ये या दोन्ही स्तरांवर सारख्याच पद्धतीने कार्यान्वित राहतील अशी राज्यघटनेत तरतुद करण्यात आली. भारताच्या आजच्या नोकरशाहीस मिळालेला वारसा तसा जुनाच आहे. भारत हा विकसनशील देश असल्याने व विकास विषयक प्रयत्नांत नोकरवर्ग मोठया प्रमाणात गुंतलेला असल्याने येथील नोकरशाहीस सैद्धांतिक पातळीवर विकासानुवर्ती नोकरशाही म्हणता येईल. भारताचे आधुनिकीकरण करण्याच्या प्रक्रियेत नोकरशाहीचा सहभाग मोठया प्रमाणात असल्याचे दिसते. नव्याने स्वतंत्र झालेल्या सर्वत्र राष्ट्रांत नोकरशाहीस आधुनिकीकरणाच्या वाहकाची भुमिका पार पाडावी लागत असल्याचे दिसते.

## (१) इतिहास

मैकाले, इस्लिंगटन ली फर्नहाम, इत्यादी विद्वानांनी ब्रिटिशकालीन भारतामध्ये लोकसेवेचे स्वरुप निर्धारित केले. ब्रिटिशकाळातला लोकसेवेचा विकासाचा आढावा संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे सांगता येईल.

कंपनीच्या कार्यकाळात भारतामध्ये लोकसेवकांची निवड हेलीबेरी कॉलेजमधील एक निवड समिती आणि बोर्ड ऑफ डायरेक्टर्सद्वारे केली जात होती. परंतु १८५४मध्ये मैकालेच्या अध्यक्षतेखाली 'कमेटी ऑन इंडियन सिविल सर्विसेस' स्थापना केली त्यांनी लोकसेवेला मैरिट ओरियन्टेडकरियर सर्विसेस बनवण्याचा प्रयत्न केला.

१८८६ ते १९२३ पर्यंत तीन प्रमुख आयोगाची स्थापना लोकसेवांच्या संदर्भात केली गेली.

(१) **एचीशन आयोग (१८८६) :** यांनी स्टेच्युटरी सिविल सर्विसेस समाप्त करुन प्रांतीय लोकसेवेची स्थापना करण्याची शिफारस केली. सरकारने कॉवेनेंटेड आणि अनकॉवेनेन्टेड सर्विस समाप्त करुन दोन केडर इंपीरियल आणि प्रांतीय सेवा बनवले.

(२) **इस्लिंगटन आयोग (१९१७) :** लोकसेवेच्या कार्याच्या आधारावर तीन वर्ग प्रथम, द्वितीय आणि तृतीय बनवण्याची शिफारस केली.

(३) **ली आयोग (१९२३) :** यांनी लोकसेवकांची भर्ती, वर्गीकरण यासाठी लोकसेवा आयोगाची स्थापना केडर प्रमाणे भारती करणास प्रोत्साहन व योग्य वेतन आणि सुविधेची शिफारस केली.

१९१९ च्या अधिनियमाद्वारे लोकसेवेला व्यवस्थित स्वरुप देण्याचा प्रयत्न केला गेला. यामुळेच १९२० ला भारतात तीन प्रकारच्या सेवेची निर्मिती करण्यात आली. केंद्रीयसेवा, वसाहतीक सेवा प्रांतीय सेवा.

## (२) स्वतंत्र भारतातील लोकसेवा

भारतातील लोकसेवेचे तीन वर्गवारीमध्ये वर्गीकरण केले जाते. अखिल भारतीय सेवा, केंद्रिय सेवा, राज्यसेवा हया होत. १९४७ साली आय. सी. एसचे नाव बदलून आय. ए. एस, आय. पी. चे आय.पी.एस. केले. १९५१ सालच्या 'अखिल भारतीय सेवा' कायद्याने राज्य सरकारांशी सल्ला मसलत करून अखिल भारतीय सेवेतील सदस्यांची भर्ती, सेवाशर्ती याबाबत नियम तयार करण्याचे अधिकार केंद्र सरकारला देण्यात आले. १/३ पदे राज्याच्या प्रशासकीय सेवेमधून पदोन्नतीद्वारे भरली जातात. आयोगाकडून अखिल भारतीय सेवा आणि केंद्रीय सेवा यांच्यासाठी परीक्षेचे आयोजन केले जाते. त्यापैकी जवळजवळ २७ सेवांसाठी परीक्षा घेतली जात असे. १९७८ पर्यंत एकच परीक्षा घेतली जात असे. १९७५ मध्ये डी.एस.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला गेला. त्या आयोगाने आय. ए. एस. व इतर वर्ग एकच्या केंद्रीय सेवांसाठी एक प्राथमिक छाननी परीक्षा घेण्याची शिफारस केली. त्यानंतर प्रशिक्षणोत्तर चाचणी घेतली जावी या सुचनानुसार आयोग या परीक्षा घेते. १९८८-८९ मध्ये युजीसीचे माजी अध्यक्ष सतीशचंद्र यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. सेवा प्रवेश पद्धती बदलण्यात यावी तसेच निबंधाचा २०० मार्काचा पेपर सुरू केला. मुलाखतींचे गुण २५० चे ३०० केले मुख्य परीक्षेतील काही विषयात फेरबदल केले काही नव्याने सुरु केले.

प्रा. वाय. के अलघ यांच्या अध्यक्षतेखाली जुलै २०००मध्ये ३ सदस्यांची समिती नेमली गेली होती. त्या समितीला जागतिकीकरणाच्या बदलत्या परिस्थितीनुरुप कोणते बदल केले जावेत. प्रशिक्षण 'येतील प्रशिक्षणासंदर्भातही शिफारस करावी असे सुचवले होते.'

## (३) केंद्रिय लोकसेवा आयोगाची रचना

### (अ) सभासद संख्या व पात्रता

केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या सभासदांची संख्या घटनेत निश्चित केलेली नाही. तरीपण घटनेत एवढेच नमुद करण्यात आले आहे की, एकूण सभासदांपैकी निम्मे सभासद केंद्रशासन किंवा राज्यशासनाच्या सेवेत कमीत कमी १० वर्षे सेवा केलेले असावेत. सभासदांच्या नेमणुकीसंबंधीच्या अटी निश्चित करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला देण्यात आला आहे. साधारणत: आयोगाची सदस्यसंख्या सात ते आठ असते.

### (आ) सदस्यांचा कार्यकाल

आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाल सहा वर्षे ठरविण्यात आला आहे. परंतु सदस्यांचे ६५ वर्ष किंवा ६ वर्ष या दोन्हीपैकी पहिल्यांदा जी मुदत पूर्ण होईल तोपर्यंत सदस्य पदावर राहू शकतो. केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या सदस्यांना आपल्या पदाचा

राजीनामा देता येतो. सभासदांचा कार्यकाल संपल्यानंतर त्याच व्यक्तीची पुन्हा नेमणुक करता येत नाही. सभासदांची अध्यक्ष म्हणून किंवा राज्य लोकसेवा आयोगाच्या सभासदांची केंद्रिय लोकसेवा आयोगाचा सभासद किंवा अध्यक्ष म्हणून नेमणूक केली जावू शकते.

**(इ) वेतन व भत्ते**

आयोगाच्या अध्यक्षाला व सभासदांना वेतन व भत्ते भारताच्या संचित निधीतून दिले जातात. त्यावर संसदेमध्ये मतदान होत नाही. सन २००९ मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतला त्यानुसार ९० हजार अध्यक्षाला तर ८० हजार सदस्यांना वेतन दिले जाते. परंतु सहाव्या वेतन आयोगाने यात वाढ केली आहे.

**(ई) बडतर्फी**

कलम ३१७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे राष्ट्रपतीने अध्यक्ष आणि सदस्यांच्या गैरवर्तणुकी संदर्भात सर्वोच्च न्यायालयाकडे निर्णयार्थ सोपवल्यानंतर न्यायालयाने पदावरून दुर करण्याचे सुचवल्यास नंतरच केवळ राष्ट्रपतीच्या आदेशाद्वारे पदावरुन दुर केले जाईल.तसेच, (१) अन्य कोणतेही सवेत काम करत असल्यास, (२)तो शारीरिक व मानसिक दुर्बलतेमुळे काम करण्यास असक्षम अयोग्य असेल तर पदावरुन दूर करता येते.

## (४) लोकसेवा आयोगाची कार्ये

केंद्रिय लोकसेवा आयोगाची कार्येही घटनेच्या कलम ३२०मध्ये नमुद केली आहेत. त्यांच्या कार्याचे दोन प्रकार पाडता येतात. (अ) प्रशासकीय कार्ये, (आ) सल्ला विषयक कार्ये

**(अ) प्रशासकीय कार्ये**

(१) नागरी सेवापदांच्या भरतीसाठी नागरी सेवा परीक्षेचे आयोजन व संचालन करणे.
(२) मुलाखतीद्वारे उमेदवारांची नागरी सेवापदी निवड करणे.
(३) बढतीद्वारे नागरी पदांची भरती करणे.
(४) एका सेवेतून दुसऱ्या सेवेत उमेदवारांची बदली करण्याविषयी केंद्र शासनास सल्ला पुरविणे.
(५) आयोग काही प्रसंगी तात्पुरत्या स्वरूपाच्या नेमणुका करते.
(६) आपल्या कार्याविषयी राष्ट्रपतींना वार्षिक अहवाल सादर करणे.

**(आ) सल्ला विषयक कार्ये**

(१) नागरी सेवा व सेवापदांच्या भरतीच्या पद्धती ठरविणे.
(२) नागरी सेवेतील बढती, बदल्या आणि नियुक्त्या यांची तत्त्वे निर्धारित करणे.
(३) केंद्र शासनात नागरी पदभार सांभाळलेल्या अथवा सद्यस्थितीत पदभार सांभाळणाऱ्या व्यक्तीने दावा केल्यास त्याची तपासणी करणे.
(४) राष्ट्रपतीद्वारे संदर्भित केलेली कोणतीही बाब.
(५) केंद्र शासनाच्या अधिकारक्षेत्रात नागरी पदभार सांभाळणाऱ्या अधिकार पदाच्या शिस्तीविषयीच्या बाबी निश्चित करणे.
(६) सरकारी काम पार पाडीत असतांना एखाद्या सेवकाला इजा झाली असल्यास व त्याबाबत तो शासनाकडे नुकसान भरपाई मागत असल्यास निर्माण होणारा तंटा मिटविण्यासाठी आयोगाचा सल्ला घेतला जातो.
(७) जुन्या किवा नव्या सेवासंबंधीच्या कायदेशीर बाबींवर सल्ला देणे.

**आजपर्यंतचे यु.पी.एस.सी. चे अध्यक्ष**

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ | अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|---|---|---|
| (१) | सर रॉस बार्कर | १९२६-१९३२ | १५ | जे.पी.गुप्ता | १९९०-९२ |
| (२) | सर डेव्हीड पेत्री | १९३२-३६ | १६ | श्रीमती आर.एम.बॅथ्यु | १९९२-९६ |
| (३) | सर आय गार्डन | १९३७-४२ | १७ | एस.जे.एस.छटवाल | १९९६-९६ |
| (४) | एफ.डब्ल्यु.राबर्टसन | १९४२-४७ | १८ | जे.एम.कुरेशी | १९९६-९८ |
| (५) | एच.के.कृपलानी | १९४७-४९ | १९ | ले.जन.सुरींदर नाथ | १९९८-२००२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (६) | आर.एन.बॅनर्जी | १९४९-५५ | २० | पी.सी.होता | २००२-०३ |
| (७) | एन.गोविंदराजन | १९५५-५५ | २१ | माता प्रसाद | २००३-०५ |
| (८) | व्ही.एस.हेजमदी | १९५५-६१ | २२ | डॉ.एन.आर.हशीम | २००५-०६ |
| (९) | बी.एन.झा | १९६१-६७ | २३ | गुरबचन जगत | २००६-०७ |
| (१०) | के.आर.दामले | १९६७-७१ | २४ | सुबीर दत्ता | २००८-०८ |
| (११) | आर.सी.एस.सरकार | १९७१-७३ | २५ | डी.पी.अग'वाल | ऑगस्ट२००८ ते ऑगस्ट२०१४ |
| (१२) | डॉ.ए.आर.किडवाई | १९७३-७९ | २६ | श्रीमती रजनी राझदान | ऑगस्ट २०१४ ते नोव्हें.२०१४ |
| (१३) | डॉ.एम.एल.शहारे | १९७९-८५ | २७ | दिपक गुप्ता | नोव्हें.२०१४ ते सप्टें. २०१६ |
| (१४) | एच.के.एल.कपुर | १९८५-९० | २८ | सिरोही | |

## ३.२.२ राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग (Scheduled Caste Commission)

अनुसुचित जाती जमातीचा मागासलेपणा घालवण्यासाठी त्यांना विशेष संधी देऊन मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने काही विशेष घटनात्मक तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी व त्यांच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाला शिफारस करणे आणि अनुसुचित जातींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली. १९९०च्या ६५व्या घटना दुरूस्तीनुसार या आयोगाची निर्मिती करण्यात आली. यानंतर २००३ साली ८९ वी घटना दुरुस्ती करुन अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती असे दोन स्वतंत्र आयोग निर्माण करण्यात आले.

### (१) घटनात्मक तरतूद

(१) घटनेतील कलम ३३८ नुसार अनुसूचित जाती आणि जमातीच्या संदर्भातील घटनात्मक तरतुदींचा अभ्यास करून त्याच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाकडे शिफारस करणे व राष्ट्रपतीला अहवाल पाठवण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाईल.

(२) ६५ वी घटना दुरुस्ती (१९९०) अनुसूचित जाती जमातींच्या घटनात्मक संरक्षणाचा अभ्यास करण्यासाठी व संरक्षण करण्यासाठी नियुक्त केल्या जाणाऱ्या अधिकाऱ्याऐवजी राष्ट्रीय आयोगाची निर्मिती करण्यात आली.

(३) ८९ वी घटनादुरूस्ती (२००३) या घटना दुरूस्तीनुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यासाठी दोन स्वतंत्र आयोग निर्माण करण्यात आले.

### (२) राष्ट्रीय अनुसूचित आयोगाची रचना

८९ व्या घटनादुरूस्तीनुसार अध्यक्ष आणि उपाध्यक्षांबरोबरच इतर तीन सदस्य मिळून पाच सदस्यांचा राष्ट्रीय जाती आयोग नियुक्त केला जातो. या आयोगाच्या सदस्य व अध्यक्षाची नियुक्ती ही राष्ट्रपतीमार्फत केली जाते.

### (३) राष्ट्रीय अनुसूचित आयोगाची कार्ये

या आयोगाचे अधिकार व कार्य घटनेतील कलम ३३८ च्या उपकलम ५, ८, ९ मध्ये दिली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

(१) अनुसुचित जातीच्या संरक्षणासाठी असलेल्या घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदीचे नियमन करणे व त्या विकसित करण्याचे कार्य करणे.

(२) अनुसुचित जातींच्या हक्कांचा भंग केल्याप्रकरणी फिर्यादीसंदर्भात चौकशी करणे.

(३) अनुसुचित जातीच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेत सहभागी होणे व सल्ला देणे. केंद्र व राज्यशासनाच्या कार्यांतर्गत त्यांच्या विकासाचे मुल्यमापन करणे.

(४) वर्षभरातील कामकाजानुसार वार्षिक अहवाल राष्ट्रपतीला सादर करणे.

(५) केंद्र व राज्यसरकारकडून केलेल्या अंमलबजावणीच्या मोजमापाशिवाय अनुसुचित जातीच्या कल्याण आणि आर्थिक, सामाजिक विकासाचे मोजमाप करणे व त्या संदर्भातील शिफारशी अहवालात नमुद करणे.

**(४) राष्ट्रीय अनुसूचित आयोगाची अधिकार**

(१) उपकलम ८ नुसार अनुसुचित जातींच्या सुरक्षेसंदर्भात नागरी न्यायालयाचे अधिकार असतात. आयोग या चौकशीसाठी भारतातील कोणत्याही व्यक्तीला बोलावू शकते व तसा समन्स बजावू शकते.

(२) कोणत्याही फिर्यादी संदर्भात चौकशीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे आयोग मागवू शकते.

(३) तपासणीसाठी कोणत्याही कार्यालयातील शासकीय नोंद व कागदपत्रे मागवू शकते.

(४) शिवाय अनुसुचित जातींवर परिणाम करणारे धोरण ठरवितांना केंद्र व राज्य सरकारने आयोगाशी सल्लामसलत केली पाहिजे, इ. प्रकारची प्रमुख कार्ये व अधिकार या आयोगाला आहेत.

## ३.२.३ राष्ट्रीय अनुसुचित जमाती आयोग

भारतीय राज्यघटनेने केलेल्या आदिवासींच्या घटनात्मक तरतुदींचा लाभ होतो किंवा नाही? पंचवार्षिक योजनांद्वारे त्यांचा विकास कसा होत आहे? याचा मागोवा घेण्यासाठी व त्यासंबंधी अहवाल राष्ट्रपतींना सादर करण्यासाठी अनुसुचित जमाती आयोगाची तरतुद केली आहे.

२००३ साली ८९ वी घटनादुरुस्ती करुन अनुसुचित जमातीसाठी स्वतंत्र आयोग निर्माण करण्यात आला. अनुसुचित जमातीसाठी करण्यात आलेल्या घटनात्मक तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी व त्याच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाला शिफारसकरणे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी या स्वतंत्र राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली.

**(१) राष्ट्रीय अनुसुचित जमाती आयोगाची रचना**

८९ व्या घटनादुरुस्तीनुसार अध्यक्ष आणि उपाध्यक्षांबरोबरच इतर तीन सदस्य मिळून पाच सदस्यांचा राष्ट्रीय जमाती आयोग नियुक्त केला जातो. या आयोगाच्या सदस्य व अध्यक्षाची नियुक्ती ही राष्ट्रपतीमार्फत केली जाते?

**(२) राष्ट्रीय अनुसुचित जमाती आयोगाची कार्ये**

या आयोगाचे अधिकार व कार्य घटनेतील कलम ३३८ च्या उपकलम ५, ८, ९मध्ये दिली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

(१) अनुसुचित जमातीच्या संरक्षणासाठी असलेल्या घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदीचे नियमन करणे व त्या विकसित करण्याचे कार्य करणे.

(२) अनुसुचित जमातींच्या हक्कांचा भंग केल्याप्रकरणी फिर्यादीसंदर्भात चौकशी करणे.

(३) अनुसुचित जमातीच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेत सहभागी होणे व सल्ला देणे. केंद्र व राज्यशासनाच्या कार्यांतर्गत यांच्या विकासाचे मुल्यमापन करणे.

(४) वर्षभरातील कामकाजानुसार वार्षिक अहवाल राष्ट्रपतीला सादर करणे.

(५) केंद्र व राज्यसरकारकडून केलेल्या अंमलबजावणीच्या मोजमापाशिवाय अनुसुचित जमातीच्या कल्याण आणि आर्थिक, सामाजिक विकासाचे मोजमाप करणे व त्या संदर्भातील शिफारशी अहवालात नमुद करणे.

**(३) राष्ट्रीय अनुसुचित जमाती आयोगाचे अधिकार**

(१) उपकलम ८ नुसार अनुसुचित जमातींच्या सुरक्षेसंदर्भात नागरी न्यायालयाचे अधिकार असतात. आयोग या चौकशीसाठी भारतातील कोणत्याही व्यक्तीला बोलावू शकते व तसा समन्स बजावू शकते.

(२) कोणत्याही फिर्यादी संदर्भात चौकशीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे आयोग मागवू शकते.

(३) तपासणीसाठी कोणत्याही कार्यालयातील शासकीय नोंद व कागदपत्रे मागवू शकते.

(४) शिवाय अनुसुचित जमातींवर परिणाम करणारे धोरण ठरवितांना केंद्र व राज्य सरकारने आयोगाशी सल्लामसलत केली पाहिजे, इ. प्रकारची प्रमुख कार्ये व अधिकार या आयोगाला आहेत.

## ३.२.४ राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग

भारतीय राज्यघटना ही सामाजिक न्यायाच्या सिद्धांतावर आधारित आहे. घटनेमध्ये मागास, दलित वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी सर्व प्रयत्न करण्याची व्यवस्था केली आहे. इतर मागासवर्गामध्ये अनेक अशा जाती आहेत की ज्या अनुसुचित जातीत समाविष्ठ नाहीत परंतु समाजातील इतर तथाकथित उच्च जातींपेक्षा मागास आहेत. यामुळे या जातींच्या उत्थानासाठी त्यांना आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये काही विशिष्ठ सुविधा देण्याची गरज आहे.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४०मध्ये सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाच्या स्थितीचे परिक्षण व त्यांच्या समोरील समस्यांची सोडवणुक करण्यासाठी एक आयोग स्थापन करण्याची तरतुद करण्यात आली आहे. आपल्या या शक्तीच्या अंतर्गत राष्ट्रपतींनी आतापर्यंत दोन आयोग स्थापन केले होते. (अ) काका कालेलकर, (आ) मंडल आयोग.

### (अ) काका कालेलकर आयोग

मागासवर्गीयांच्या स्थितीचा विचार करण्यासाठी जानेवारी १९५३ साली स्थापित केला. आयोगाने मागासवर्गाच्या ओळखीसाठी शैक्षणिक व सामाजिक मापदंड निर्धारित करुन इतर मागसवर्गासाठी सरकारी सेवेमध्ये आरक्षणाची शिफारस सुचवली परंतु सामाजिक व शैक्षणिक मापदंडाची स्पष्टपणे व्याख्या न केल्यामुळे विवाद निर्माण झाल्याने ही शिफारस कार्यान्वित होवू शकली नाही.

### (आ) दुसरा मागासवर्ग आयोग/मंडल आयोग

जनता सरकारच्या राजवटीत केंद्र सरकारने दुसऱ्यांदा मागासवर्ग आयोग बी.पी.मंडल यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी १९७९ साली नेमला. बी.पी.मंडल हे बिहारचे माजी मुख्यमंत्री होते. तर अन्य सदस्य एल.आर.नायक, दीवान मोहनलाल, न्या.आर.आर. भोला, के. सुब्रहमण्यम हे होते. सर्व सदस्य हे मागासवर्ग जातीतील होते. आयोगावर सामाजिक व शैक्षणिक स्वरुपात मागासवर्गांची व्याख्या करणे, मापदंड निर्धारित करणे, या वर्गाच्या विकासासाठी आवश्यक त्या उपायांची शिफारस करणे आणि केंद्र, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामधील सेवेमध्ये आरक्षणाची शक्यता पडताळणे, इत्यादी कार्ये सोपवली होती. आयोगाने आपला अहवाल ३१ डिसेंबर १९८० रोजी सरकारला सोपवला. तब्बल दहा वर्षानंतर पंतप्रधान व्ही.पी.सिंह यांनी ७ ऑगस्ट रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहात घोषणा केली की भारत सरकारच्या सेवेमध्ये व सार्वजनिक उपक्रमामध्ये इतर मागासवर्गांना २७ टक्के आरक्षण मिळेल. १३ ऑगस्ट १९९० रोजी यासंबंधी सरकारी सुचना काढण्यात आली. यासंबंधी तीव्र असंतोष निर्माण झाला अनेक ठिकाणी आंदोलने, मोर्चे निघाले. १५० पेक्षा जास्त लोकांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला. ६३ लोकांचा मृत्यु झाला. अनेक युवक यूवतींनी तीव्र आंदोलनाद्वारे आपला विरोध दर्शवला. यासर्व परिस्थितीमुळे तो आदेश कायदेशीरदृष्टया अडचणीत अडकला. सर्वोच्च न्यायालयाने ०१ ऑक्टोबर १९९० रोजी मंडल अहवालावर स्थगिती आदेश दिला आणि १३ ऑगस्ट १९९०च्या निर्णयावर प्रतिबंध घातला. २५ सप्टेंबर १९९१ ला नरसिंहराव सरकारने घोषणा केली की ओबीसीचे २७ टक्के आरक्षण लागू केले जाईल. याबरोबरच आर्थिक आधारावर १० टक्के आरक्षणाचीही व्यवस्था केली जाईल. परंतु या घोषणेलाही न्यायालयात आव्हान दिले गेले. मात्र १६ नोव्हेंबर १९९२ रोजी न्यायालयाने आपला निर्णय दिला. यात दोन वर्षापूर्वीचा व्ही.पी.सिंगच्या राष्ट्रीय मोर्चा सरकारच्या इतर मागास वर्ग जातींसाठी २७ टक्के आरक्षण देण्यासाठीचा आदेश वैध व लागु करण्यास योग्य आहे. मात्र राव सरकारचा १० टक्के आर्थिक आधारावरील आरक्षण लागु करता येणार नाही. तसेच इतर मागास वर्गातील संपन्न वर्गालाही (cream layer) आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही. आरक्षण नोकरीसाठी असेल पदोन्नतीसाठी नाही आणि मागासवर्गामध्ये कोणत्या जाती असाव्यात, याचा आढावा घेण्यात यावा. इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी संसदेत राष्ट्रीय इतर मागासवर्ग अधिनियम १९९३ पारीत केला. यानुसार १४ ऑगस्ट १९९३ साली आर. एन. प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय आयोगाची स्थापना केली.

### (१) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची रचना

आयोगामध्ये राष्ट्रपतीद्वारे नियुक्त केलेले अध्यक्षासह पाच सदस्य आहेत. अध्यक्ष-सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाच्या आजी किंवा माजी न्यायाधीश असणाऱ्या व्यक्तीची आयोगाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली जाते.

**● सदस्य**

(१) एक सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तीची सदस्य म्हणून नियुक्ती केली जाते.

(२) मागावर्गीयांसंबंधात विशेष ज्ञान असणारे दोन सदस्य.

(३) केंद्र शासनाच्या सचिव पातळीवरील एक आजी किंवा माजी अधिकाऱ्याची सदस्य म्हणून नियुक्ती केली जाते.

● **कार्यकाल**

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचा कार्यकाल पदभार स्वीकारल्यापासून ३ वर्षाचा असतो.

● **बडतर्फी**

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांना पुढील कारणांसाठी बडतर्फ केले जाते.

(१) दिवाळखोर सिद्ध झाल्यास.

(२) गुन्हेगार असल्याचे सिद्ध होवून शिक्षा झाल्यास.

(३) मानसिक व शारीरिकदृष्टया कार्य करण्यास असमर्थ ठरल्यास.

(४) कोणत्याही सुचनेशिवाय सलग तीन बैठकांना अनुपस्थित राहिल्यास.

**(२) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाची कार्ये**

राष्ट्रीय मागासवर्ग आयोग पुढीलप्रमाणे कार्ये करतो.

(१) मागास प्रवर्गातील लोकांच्या शैक्षणिक व सामाजिक स्थितीचे मुल्यांकन करणे.

(२) देशातील एखाद्या जातीने समाज घटकाने इतर मागास प्रवर्गात समावेश करण्याची मागणी केली असेल तर संबंधित समाज घटकाच्या परिस्थितीचे परीक्षण करुन त्या समाजघटकाचा मागास प्रवर्गात समावेश करण्याची केंद्र शासनाला शिफारस करणे.

(३) शासकीय सेवामध्ये मागास प्रवर्गांना आरक्षण देण्यासंबंधी शिफारस करणे.

(४) मागास प्रवर्गातील लोकांना शैक्षणिक व सामाजिक सवलती देण्याविषयी शासनाला शिफारस करणे.

(५) केंद्र सरकारला कार्याचा अहवाल सादर करणे.

(६) केंद्र सरकारला सल्ला देणे जो की आयोगाचा सल्ला सरकारला बंधनकारक असतो.

(७) राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला कार्य करण्यासाठी नागरी न्यायालयासारखे अधिकार प्राप्त झालेले असल्याने त्याच्या साहाय्याने आयोग आपली भुमिका बजावतो.

(८) मागास प्रवर्गाच्या हिताचे रक्षण करणे.

भारतात इतर मागास प्रवर्गातील लोकांची संख्या फार मोठया प्रमाणात आहे मात्र हा प्रवर्ग शैक्षणिक, सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित झालेला होता. परंतु मागास प्रवर्गातील जनतेचे कल्याण साधून त्यांचा शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या विकास करून त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावर इतर मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात आले. या आयोगाची स्थापना झाल्यापासून मागासप्रवर्गातील लोकांची शासकीय नोकऱ्यांमधील संख्या वाढली आणि त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावलेला दिसून येतो.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**खालील विधाने चूक कि बरोबर ते सांगा.**

(१) केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या सदस्यांचा कार्यकाळ सहा वर्षाचा असतो.

(२) राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग हे एक वैधानिक मंडळ म्हणून कार्य करते.

(३) केंद्र सरकारने दुसरा मागासवर्ग आयोग बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली नेमला.

(४) राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचा कार्यकाळ सहा वर्षाचा असतो.

(५) राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांनी नियुक्ती पंतप्रधान यांच्यामार्फत केली जाते.

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**सामाजिक न्याय :** समाजमान्य मुल्यावर आधारित असलेली न्यायाची संकल्पना यामध्ये समाजातील सर्व दुर्बल व वंचित घटकांना न्याय देण्याचे कार्य केले जाते.

**मागासवर्ग :** सामाजिक व आर्थिकदृष्टीने मागास असलेला घटक.

**घटनात्मक :** घटनेद्वारे मंजुर केलेले.

**क्रिमी लेयर :** आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम इतर मागासवर्गीय ज्यांना आरक्षणाचा लाभ घेता येत नाही.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) बरोबर
(२) चूक
(३) बरोबर
(४) चूक
(५) चूक

## ३.५ सारांश

भारतातील सनदी सेवांचा इतिहास हा ब्रिटीशकाळापासून सुरू झाला आहे. विविध समित्या, आयोग वेळोवेळी स्थापन करून बदलत्या काळाप्रमाणे यात सतत बदल करण्यात आले. स्वतंत्र भारतातही देशाच्या परिस्थिती व गरजेनुसार आवश्यक ते बदल व सुधारणा केल्या असून आजची नोकरशाहीही त्याची परिणती म्हणावी लागेल. नोकरभरतीसाठी स्वतंत्र अशा केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना करण्याचे घटनेतच ठरवण्यात आले. स्वतंत्रपणे कार्य करता यावे त्यानुसारच त्याची संरचना ठरवण्यात आली. नोकरभरती, संदर्भात सर्व अधिकार या आयोगाला देण्यात आले. काही अपवाद वगळता आयोग आपली भुमिका योग्य प्रकारे निभावतांना दिसून येते.

देशात राजकीय लोकशाही बरोबर सामाजिक लोकशाही अस्तित्त्वात आल्याशिवाय खऱ्या लोकशाही समाजाच्या स्थापनेचे ध्येय पुर्ण होणार नाही म्हणून अनुसुचित जाती व जमातीसाठी राज्यघटनेत अनेक सोयी, सवलती दिल्या आहेत. परंतु याची अंमलबजावणी योग्यरित्या होते की नाही हे ही पाहण्याचे कार्य तसेच आर्थिक, सामाजिक अन्याय होवू नये आणि विकासासाठी शासनाकडे शिफारशी करण्याचे कार्य हे आयोग करत आहेत.

दलितांच्या बरोबरच समाजातील इतर मागावर्गीयांसाठी स्थापन करण्यात आलेला इतर मागासवर्गीय आयोग आपले कार्ये योग्यरितीने पार पाडत आहे. याचाच परिणाम इतर मागासवर्गीय घटकांची प्रगती सर्वच पातळयांवर अलीकडच्या काळात झालेली दिसून येते.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) लोकसेवा आयोगाच्या कार्याचे परीक्षण करा.

(२) भारतीय लोकसेवेची ऐतिहासिक पार्श्वभुमी स्पष्ट करा.

(३) केंद्रीय लोकसेवा आयोगाची संरचना थोडक्यात सांगा.

(४) अनुसुचित जाती आयोगाविषयी माहिती लिहा.

(५) अनुसुचित जमाती आयोगाची रचना व कार्ये स्पष्ट करा.

(६) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाविषयी चर्चा करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) भांबरी, सी. पी. (१९७१). *ब्युरॉक्रसी अॅन्ड पॉलिटिक्स इन इंडिया.* मुंबई, महाराष्ट्र विकास पब्लिकेशन्स हाऊस.

(२) फडिया, बी. एल. (२००८). *भारतीय राज्यव्यवस्था एवं भारत का संविधान.* आगरा, प्रतियोगिता साहित्य सीरिज,

(३) सिंघवी, एल. (२००७). *भारत का संविधान.* नई दिल्ली, प्रभात प्रकाशन.

(४) पानसरे, जी (२०१०). *मंडल आयोग आणि राखीव जागांचा प्रश्न.* औरंगाबाद, लोकसाहित्य प्रकाशन.

# घटक ४ : वैधानिक मंडळे – भाग १

*अनुक्रमणिका*

४.0 उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय-विवेचन
४.२.१ राष्ट्रीय मानवाधिकार आयोग
४.२.२ राज्य मानवाधिकार आयोग
४.२.३ राष्ट्रीय महिला आयोग
४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.५ सारांश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.0 उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

- मानवाधिकार ही संकल्पना स्पष्ट होईल.
- मानवाधिकार व मूलभूत अधिकार यांच्यातील परस्पर संबंध समजून घेता येईल.
- भारतातील राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या स्थापनेची पार्श्वभूमी सांगता येईल.
- राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची रचना, कार्ये व अधिकार यांची माहिती मिळेल.
- राज्य मानवाधिकार आयोगाविषयी माहिती सांगता येईल.
- राष्ट्रीय महिला आयोगाच्या स्थापनेची पार्श्वभूमी, रचना व कार्याविषयी माहिती मिळेल.

## ४.१ प्रास्ताविक

मागील दोन घटकामध्ये संवैधानिक मंडळाचा अभ्यास केला या प्रकरणामध्ये वैधानिक संस्थांचा अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राज्य मानवाधिकार आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोग या तिन्ही आयोगाचा अभ्यास केला आहे.

मानवाधिकाराची पार्श्वभूमी अभ्यासण्यात येणार आहे. मानवाधिकार हे मानवाच्या कल्याणासाठी आवश्यक असून जगातील प्रत्येक नागरिकाला ते मिळाले पाहिजेत. मानवाधिकार हे भारतात कशाप्रकारे स्विकारण्यात आले आहेत. भारतीय राज्यघटनेत बहुतांश मुलभुत अधिकार हे मानवाधिकाराशी संबंधीत आहेत. मुलभुत अधिकार घटनेने दिले तरी मुलभूत

धिकारात काहींचा समावेश होत नसल्याने मानवाधिकारासाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करण्याची शिफारस राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरुन झाल्याने भारतात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग स्थापन करण्यात आला.

भारतासारख्या विशाल देशात व लोकसंख्येने प्रचंड मोठा असणाऱ्या देशात केवळ राष्ट्रीय पातळीवर एक आयोग स्थापन करुन चालणार नाही म्हणून राज्य पातळीवरही आयोग स्थापन करण्याचे कायद्याने ठरविण्यात आले. त्यानुसार राज्य मानवाधिकाराची स्थापना करण्यात आली. याचाही आढावा घेण्यात आला आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या स्थापनेची पार्श्वभूमी व आयोगाची रचना आणि कार्याचा आढावा घेतला आहे. हा आयोग महिला सबलीकरणासाठी कार्यरत असून अनेक राज्यांनी राज्य महिला आयोग स्थापन करुन याची व्याप्ती वाढली आहे. यानंतरही महिलांच्या समस्या कायम असल्याने अधिक कार्याची अपेक्षा आयोगाकडून होत आहे.

## ४.२ विषय–विवेचन

### ४.२.१ राष्ट्रीय मानवाधिकार आयोग

जगभरामध्ये मानवाधिकारासाठी होणारी मागणी व मानवी जीवन प्रतिष्ठीत बनवण्याची आकांक्षा यामुळे मानवी संस्कृती व सभ्यतेला एक निर्णायक संवेदनशील रुप प्राप्त झाले आहे. शिक्षणाचे वाढते प्रमाण, जाणीव जागृती, माहिती क्रांती, औद्योगिक विकास आणि जागतिकीकरणामुळे मानवाधिकाराला प्रोत्साहन मिळाले आहे. ''जीवन, स्वातंत्र्य, समता आणि व्यक्तिची प्रतिष्ठा याशी निगडीत अधिकार म्हणजे मानवाधिकार होय.'' मानवाधिकार एक विश्वव्यापी संकल्पना आहे जी मानवाला सुखी, संपन्न व प्रतिष्ठित जीवन देण्याची इच्छा त्यात असते. पारंपारीक विचारसरणीनुसार जे नैसर्गिक अधिकार म्हणून ओळखले जातात तेच विसाव्या शतकात मानवी अधिकार म्हणून ओळखले जातात. मानवाधिकार हे मुलभूत अधिकारापेक्षा भिन्न आहेत का?

वास्तविकपणे मानवाधिकार व मुलभूत अधिकार किंवा नागरीक अधिकार या सर्वाचा उद्देश एकच आहे. तो म्हणजे मानव कल्याण, स्वातंत्र्य व सामाजिक न्यायाची स्थापना करणे परंतु मानवाधिकार हे व्यापक व विश्वव्यापी संकल्पना आहे. जी मानवाला सुखी व सन्मानित जीवन देण्यासाठी नैसर्गिक अधिकार देते. मुलभुत अधिकार मानवाधिकाराचाच भाग आहे. जो की देशाच्या राज्यघटनेत वर्णन केलेला असतो. न्यायालय त्याचे संरक्षक असते. नागरीक अधिकाराची सीमा ही विशिष्ट देशापुरतीच असते. नागरीकांचे काही अधिकार हे देशपरत्वे विभिन्न असतात. तसेच ते त्याच देशाच्या नागरिकाला प्राप्त होतात. मात्र मानवाधिकार हे मुळ असुन ते प्रत्येक देशाच्या प्रत्येक नागरिकाला मिळाले पाहिजेत. व्यक्तिच्या स्वातंत्र्याचे रक्षक असणारे हे अधिकार आजही सर्व नागरीकांना आवश्यक आहेत. मानवाधिकाराचे क्षेत्र व्यापक असते पण मुलभूत अधिकारांना कायदेशीर संरक्षण प्राप्त असते. मुलभूत अधिकाराच्या माध्यमातून मानवाधिकाराची प्राप्ती करता येते किंवा ते साधन होवू शकतात.

#### (१) ऐतिहासिक विकास

सुसंघटीत आणि सुव्यवस्थित मनुष्य समाजाचा इतिहास हा मानवी हक्कांकरीता केल्या गेलेल्या तीव्र संघर्षाचा इतिहास समजला जातो. संवैधानिक न्यायानुसार १७व्या शतकात इंग्लंड आणि अमेरिकेत मानवी अधिकारचा खराखुरा पाया रचना गेला. इ.स.१६८९ मध्ये इंग्लंडच्या संसदेने क्रांतीनंतर ''बिल ऑफ राइटस'' पास केले. १७८९मध्ये झालेली फेंच राज्यक्रांती ही मानवी अधिकाराकरीता केलेल्या संघर्षाची एक विशेष घटना समजली जाते. १७८९मध्येच अमेरिकन राज्यघटनेने व्यक्ती स्वातंत्र्याचा जाहीरनामा स्वीकारला. १८४८मध्ये जर्मनीने आपल्या जाहीरनाम्यात या हक्कांचा उहापोह केला. १९३६ मध्ये सोव्हिएत रशियाने आपल्या राज्यघटनेत मुलभुत हक्कांचा समावेश केला.

संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकार आयोगाने विश्वातील संपूर्ण मानवाच्या नैसर्गिक अधिकाराला सुरक्षित करण्याचा प्रयत्न १९४५मध्ये सुरू केला. यानंतर ३ वर्षाच्या अथक परिश्रमातून मानवाधिकाराचे विस्तृत घोषणापत्र तयार केले. महासभेने १० डिसेंबर १९४८ रोजी ते स्वीकारले म्हणून १० डिसेंबर हा जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून पाळला जातो. या घोषणेचा उददेश जगातील समस्त व्यक्तिंना समान अधिकार देणे त्यातून सर्वजण आपले अधिकार प्राप्त करुन इतरांनाही सन्मान देतील. यामुळे प्रत्येक राष्ट्राने मानवाधिकाराला मान्यता देवून त्याचा प्रसार करावा. १९६८ हे वर्ष आंतरराष्ट्रीय मानवी हक्क म्हणून मानण्यात आले.

● **भारतातील पार्श्वभूमी**

भारतात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची निर्मिती करण्यासंबंधी घडलेला इतिहास इ.स.१९४६ मध्ये सुरू होतो. त्यावेळी आर्थिक आणि सामाजिक परिषदेत मानवी अधिकाराची चर्चा झाली. इ.स.१९६० ते १९७० या दशकात या बाबतीत विस्तृत चर्चा होत गेली. १९७८ मध्ये जिनेव्हा येथे सप्टेंबरमध्ये झालेल्या परिषदेत जे ठराव चर्चिले गेले त्याचा आधार घेवून भारतातही असे अधिकार देऊन त्यासाठी एक आयोग स्थापन करण्याचा विचार पुढे आला. १९८० मध्ये यूनोने यासंबंधी जगातील सर्व देशांना मानव अधिकार आयोग स्थापन्या संबंधीचे आवाहन केले. त्याच्या परिणामस्वरूप जगातील अनेक देशांनी मानव अधिकार आयोगाची स्थापना केली. भारतात देखील असे आयोग स्थापन करण्यासंबंधी शिफारशी अनेक संस्थांकडून केल्या गेल्या. १९८८ साली न्या. लक्ष्मीमल सिंघवी यांनीही अशी शिफारस केली होती. १९९१ मध्ये काँग्रेसने आपल्या निवडणुक जाहीरनाम्यात घोषणा केली होती. १४ सप्टेंबर १९९२ मध्ये सर्व मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये अशाच प्रकारचा ठराव संमत करण्यात आला.

आयोगाच्या स्थापनेला आंतरराष्ट्रीय संस्थांचा दबाव हा ही कारणीभूत होता. यामध्ये १९९२ साली स्थापित झालेली 'इंटरनॅशनल लीग फॉर हयुमन राइटस'. तसेच १९९२ मध्ये स्थापित 'इंटरनॅशनल कमीशन ऑफ ज्युरिस्टस' आणि 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल, रेडक्रॉस, इत्यादी मानवाधिकार संरक्षण करणाऱ्या संघटनांनी बरीच टीका केली. ज्यामुळे भारत सरकारला अशा प्रकारचे आयोग स्थापन करण्यासंबंधी विचार करणे गरजेचे वाटले. अनेक घटना जसे पंजाबमधील हिंसाचार इत्यादींची चर्चा आंतरराष्ट्रीय पातळीवर झाली होती. जातीय दंगली, हिंसाचार, कामगारांचे होणारे शोषण, वाढता दहशतवाद या बाबींचीही चर्चा होती. न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब, पोलीस कोठडीतील आरोपींची वाढती मृत्युसंख्या यामुळे देखील आयोगाची आवश्यकता वाटली. त्याच काळात कॅनडा, ऑस्ट्रेलिया, मेक्सिको, अल्जेरिया, आयर्लंड, जपान, फिलिपाईन्स, इत्यादी देशांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना केली होती. तेव्हा भारतासारख्या देशात लोकशाही व्यवस्था असतानाही आयोग नाही तो असलाच पाहिजे हा विचार पुढे आला.

## (२) राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची आवश्यकता

भारतात मुलभुत अधिकार नागरीकांना दिलेले आहेत. त्याच्या संरक्षणास न्यायालय, पोलीस यंत्रणा कार्यरत आहेत. मग तरीही मानवाधिकाराची काय गरज आहे? हा प्रश्न पडतो. तर आवश्यकता कशी आहे याच्या समर्थनार्थ खालील बाबी सांगता येतील.

(१) भारत एक खंडप्राय विशाल देश आहे. याबरोबरच देशात सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्यांची गुंतागुंत येथे अधिक आहे. त्यामुळे कायद्याचे उल्लंघन अनेकदा अनेक प्रकारे होते.

(२) सर्वोच्च न्यायालय मुलभुत अधिकारांचा संरक्षक आहे. परंतु अशा काही गोष्टी आहेत ज्या मुलभुत अधिकारांच्या श्रेणीत येत नाहीत.

(३) भारतातील जवळजवळ सर्वच न्यायालये कार्याच्या अधिक व्यापाने त्रस्त आहेत. त्यामुळे मानवाधिकारांच्या बाबींचे निवारण करण्यासाठी एका स्वतंत्र आयोगाची आवश्यकता आहे.

(४) हा आयोग स्वतंत्र व वैधानिक संस्था असल्याने शक्तिसंपन्न असल्याने त्वरीत निवाडा करु शकतो.

(५) देशातील संघटना, वर्तमानपत्रे, संचाराची इतर माध्यमे या सर्वामार्फत एका स्वतंत्र आयोगाच्या स्थापनेचा दबाव होता.

(६) पोलीसी अत्याचारापासून मुक्तता मिळवण्यासाठी तसेच तो नियंत्रित करण्यासाठी आयोगाची आवश्यकता होती.

या सर्व कारणांमुळे भारतात एका स्वतंत्र राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना करणे गरजेचे होते. १४ मे १९९२ रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगासंबंधीचे विधेयक लोकसभेत मांडले गेले. विधेयक स्थायी समितीकडे सोपविले गेले. २८ सप्टेंबर १९९३ रोजी राष्ट्रपतीद्वारे मानव अधिकार आयोगासंबंधी अध्यादेश जारी केला गेला. विधेयकात थोडेफार बदल करून संसदेच्या दोन्ही सभागृहात ते पास करण्यात आले. त्यानंतर 'मानव अधिकार सुरक्षा अधिनियम १९९३ अस्तित्वात आला. या कायद्याच्या आधारावर १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची रीतसर स्थापना झाली.

भारताचे २१ वे सरन्यायाधीश न्या. रंगनाथ मिश्र यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील पहिला राष्ट्रीय मानवाधिकार आयोग १२ ऑक्टोबर १९९३ रोजी अस्तित्वात आला.

## (३) राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची संरचना

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची रचना पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**अध्यक्ष :** आयोगाला एक अध्यक्ष असतो.

**सदस्य :** राष्ट्रीय मानवी हक्क आयोगात ४ पुर्णवेळ सदस्य असतात तर २ इतर पदसिद्ध सदस्य असतात.

**नियुक्ती :** राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारे केली जाते. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशीवरून राष्ट्रपती आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करतो.

**राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे आजपर्यंतचे अध्यक्ष**

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| (१) | न्या. रंगनाथ मिश्रा | १२.१०.१९९३ ते २४.११.१९९६ |
| (२) | एम. एन. वेंकटचलैय्या | २६.११.१९९६ ते २४.१०.१९९९ |
| (३) | जे. एस. वर्मा | ०४.११.१९९९ ते १७.०१.२००३ |
| (४) | ए. एस. आनंद | १७.०२.२००३ ते ३१.१०.२००६ |
| (५) | एस. राजेंद्र | ०२.०४.२००७ ते ३१.०५.२००९ |
| (६) | के. जी. बालकृष्णन | ०७.०६.२०१० ते ११.०५.२०१५ |
| (७) | एच. एल. दत्तू | २९.०२.२०१६ ते आजपर्यंत |

source – www.nhrc.ac.in

## ● पात्रता

(१) राष्ट्रीय मानवी अधिकार आयोगाचा अध्यक्ष हा भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचा माजी सरन्यायाधीश असावा.

(२) आयोगाचा एक सदस्य सर्वोच्च न्यायालयाचा एक आजी किंवा माजी मुख्य न्यायाधीश असावा.

(३) आयोगाचा एक सदस्य उच्च न्यायालयाचा आजी किंवा माजी मुख्य न्यायाधीश असावा.

(४) आयोगाचे दोन सदस्य मानवी हक्कांच्या बाबतीत विशेष कार्य केलेले व माहिती असलेले असावेत.

(५) अल्पसंख्यांक आयोग, मागासवर्ग आयोग, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आयोग, महिला आयोग यांचे अध्यक्ष मानवी हक्क आयोगाचे सदस्य असतील परंतु त्यांना चौकशी करण्याचा अधिकार नसेल.

## ● कार्यकाल

मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल कार्यभार स्वीकारल्यापासून पाच वर्षाचा किंवा त्यांची वयाची ७० वर्षे पुर्ण होईपर्यंत आहे. वरीलपैकी जी अट प्रथम पुर्ण होईल तो अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाल ठरेल. एकदा सदस्य म्हणून कार्य केल्यानंतर त्या व्यक्तीला पुन्हा आयोगाचा सदस्य म्हणून कार्य करता येते. परंतु केंद्र व राज्य सरकारांच्या आर्थिक लाभाचे पद स्वीकारू शकत नाहीत.

## ● बडतर्फी

अध्यक्ष व सदस्यांना राष्ट्रपती गैरवर्तन, अकार्यक्षमता, इत्यादी कारणांवरुन दोष सिद्धी सर्वोच्च न्यायालयाकडून सिद्ध झाल्यास त्यांना काढून टाकू शकतात. तसेच कार्यकाळात इतर आर्थिक लाभाचे पद स्वीकारल्यास, मानसिक व शारीरिकदृष्ट्या असमर्थ ठरल्यास गुन्हा सिद्ध होवून शिक्षा झाली असेल, इत्यादी कारणांसाठी राष्ट्रपती अध्यक्ष व सदस्यांना बडतर्फ करु शकतात.

## ● मुख्यालय

राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. केंद्राच्या संमतीनुसार मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय देशातील कोणत्याही ठिकाणी स्थापित करता येते.

## ● महासचिव

मानवी हक्क आयोगाला एक महासचिव असतो. तोच आयोगाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असतो. आयोगाला मदत करण्यासाठी महासचिवासह महानिदेशक (चौकशी), प्रबंधक (कायदा) हे अधिकारी असतात. आयोगाला भारताचे गृहमंत्रालय तांत्रिक व प्रशासकीय सहाय्यता करीत असते.

● **गुप्तचर विभाग**

आयोगाकडे आपला स्वत:चा गुप्तचर विभाग आहे. त्या विभागाकडून मानव अधिकारासंबंधीच्या तक्रारींची चौकशी केली जाते. त्यांची स्वतंत्र पोलीस यंत्रणादेखील कार्यरत आहे. एक महानिरीक्षक, तीन अधिक्षक, सहा उपअधिक्षक, २४ निरीक्षक व २४ कॉन्स्टेबल असा पोलिसी संच आयोगाकडे आहे.

● **कायदा विभाग**

या विभागाकडून आलेल्या तक्रारींचा कायद्यांच्या आधारे शोध घेऊन पुढील कायदेविषयक प्रक्रिया पार पाडली जाते. मानव अधिकारांचे झालेले हनन याच्या मुळाशी जावुन सदर विभाग संबंधितांना न्याय मिळवून देण्यास तत्पर असतो.

याशिवाय प्रशासकीय शाखा, ग्रंथालय, संगणक, सुचना व जनसंपर्क, संशोधन, इत्यादी शाखा आहेत. अशा प्रकारे मानवाधिकार आयोग हा भारतातील एक नवीन अभिकरण असून अन्याय व अत्याचारमुक्त समाज निर्माण करण्याचा त्याचा प्रयत्न आहे.

## (४) आयोगाची कार्ये आणि अधिकार क्षेत्र

मानवाधिकार कायद्याच्या कलम १२ प्रमाणे आयोगाला अत्यंत व्यापक प्रमाणावर अधिकार देण्यात आलेले आहेत. ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

● **कार्ये**

(०१) मानवी हक्कांबाबत जनतेमध्ये जागृती निर्माण करणे आणि मानवी हक्कांचा प्रसार व प्रचार करणे.

(०२) शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कायद्यांची अंमलबजावणी करतांना मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्यासंबंधी कार्यवाही करणे.

(०३) एखाद्या न्यायालयात मानवी हक्कांच्या उल्लंघनासंबंधी खटला प्रलंबित असेल राष्ट्रीय मानवी हक्क आयोग न्यायालयाच्या संमतीने त्यामध्ये हस्तक्षेप करू शकतो.

(०४) देशातील कोणत्याही कारागृहातील कैद्यांची स्थिती जाणून घेणे. त्यांना होणाऱ्या अपायकारक गोष्टींबद्दल सुधारणा सुचविणे.

(०५) मानव अधिकारासंबंधी असलेल्या कायद्यांचे पुर्नमुल्यांकन करणे व ते लागु करण्यासंबंधी शिफारस करणे.

(०६) दहशतवादी कारवायांचे परीक्षण करणे व त्यावर उपचारात्मक शिफारशी करणे.

(०७) आंतरराष्ट्रीय करारमदारांच्या अंमलबजावणीसाठी सरकारकडे आग्रह धरणे

(०८) मानव अधिकारासंबंधी कार्य करणाऱ्या गैरसरकारी संघटनांना प्रोत्साहन देणे.

(०९) मानवी हक्कांच्याबाबत सातत्याने संशोधन कार्य करणे.

(१०) मानवी हक्कांची पायमल्ली झालेली असेल व असे प्रकरण न्यायालयात जाण्यापूर्वी आयोग त्यात हस्तक्षेप करू शकते.

(११) राज्यघटनेमध्ये व कायद्यांमध्ये मानवी हक्काबाबत केलेल्या तरतुदींचे परिक्षण करुन प्रभावी अंमलबजावणी करणे.

● **अधिकार**

मानवाधिकार संरक्षण अधिनियमानुसार तक्रारीचे निवारण करण्यासंबंधी सिविल प्रक्रिया संहिता, १९०८च्या अंतर्गत काही अधिकार प्राप्त होतात त्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

(१) साक्ष देण्यासाठी समन्स (बोलवणे) पाठवून त्यांची उपस्थिती अनिवार्य करुन शपथेच्या आधारावर शोध घेणे.

(२) काही कागदपत्रांचा शोध ते समोर प्रस्तुत करण्याचा आदेश देणे.

(३) एखाद्या न्यायालय अथवा सार्वजनिक दस्तावेजाची प्रत मागवणे.

(४) साक्ष आणि कागदपत्र यांच्या तपासणीसाठी कमीशन नियूक्त करणे.

मानवाधिकाराच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी आयोगाची स्वत:ची व्यवस्था उपलब्ध आहे. आयोगाला हा ही अधिकार आहे की केंद्र सरकार किंवा राज्यसरकारच्या अधिकारी किंवा संशोधन संस्थेची सेवा घेवू शकते तसेच अनेक बाबतीत गैरसरकारी संघटनेलाही सामिल करून घेतले आहे.

या व्यतिरिक्त आयोगाला काही विषयामध्ये पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झालेले आहे.

(१) आपल्या कर्मचाऱ्यासंबंधी पूर्ण अधिकार प्राप्त आहेत.

(२) आयोगच अधिक स्वायत्त आहे.

(३) मानवाधिकाराच्या उल्लंघनाच्या तक्रारींचे निवारण करतेवेळी सरकार, प्राधिकरण यांना विशिष्ठ वेळेत माहिती मागू शकते.

(४) सैनिकाद्वारे होणाऱ्या मानवाधिकारांच्या उल्लंघनासंबंधी स्वत: किंवा केंद्र सरकारला अहवाल मागू शकते.

(५) तक्रार ही हिंदी, इंग्रजी किंवा आठवी अनुसुचीतील कोणत्याही भाषेतून घेतली जावू शकते.

मानवी हक्क आयोग वरील कार्य व अधिकारांच्या माध्यमातून नागरीकांच्या मुलभूत स्वातंत्र्यांचे रक्षण करते. देशातील सामान्य जनतेवर होणारा अन्याय, अत्याचार, शोषण व प्रशासनातील संवेदनहीनता, इत्यादीपासून जनतेला मुक्त करण्याचे कार्य हा आयोग करत आहे. मुले, दुर्बल व अनुसुचित जाती, जमाती अशा कमजोर घटकाच्या तक्रारीवर आयोग विशेष लक्ष देत आहे. असे असले तरी भारतातील मानवी हक्कांच्या बाबतीत फारशी चांगली परिस्थिती दिसून येत नाही. भारतातील निरक्षरता, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, इत्यादी समस्यांपासून समाजाला मुक्त केल्याशिवाय ही परिस्थिती सुधारणार नाही अशा परिस्थितीत आयोगाचे कार्य हे क्रांतीकारी स्वरुपाचे ठरत आहे.

## ४.२.२ राज्य मानवाधिकार आयोग

राज्यात मानवाधिकार आयोगाची स्थापना १९९३ च्या कायद्यानुसार करण्यात आली. देशातील विविध राज्यात याची स्थापना झाली पण मध्यप्रदेश या राज्यात १९९२ रोजी म्हणजे राष्ट्रीय मानवाधिकार आयोग कायदा व आयोग स्थापन होण्याच्या अगोदरच राज्य पातळीवरचा मानवाधिकार आयोग स्थापन करण्यात आला होता हे विशेष आहे. देशात २९ राज्य असून देशाचे क्षेत्रफळ व लोकसंख्या लक्षात घेता केवळ राष्ट्रीय पातळीवर एकच मानवाधिकार आयोग स्थापन करुन या क्षेत्रात व्यापक व लक्षणीय कार्य होणे अपेक्षित नव्हते. यासर्व बाबींचा विचार करून राज्यपातळीवर मानवाधिकार स्थापन करण्याची तरतुद १९९३ च्या कायद्यातच करण्यात आली.

### (१) राज्य मानवाधिकार आयोग रचना व कार्यकाल

राज्यपातळीवरील मानवाधिकार आयोग हेसुद्धा बहुसदस्यीय असतात.

**अध्यक्ष :** एक अध्यक्ष असतो तो उच्च न्यायालयाचा माजी मुख्य न्यायाधीश असावा.

**सदस्य :** इतर सदस्य हे जिल्हा न्यायाधीशामधून (निवृत्त) निवडले जातात. व्यक्तीच्या अधिकारांचे संरक्षण करणाऱ्या यंत्रणेची आणि या प्रक्रियेचा अनुभव असावा. सध्या ३ इतर सदस्य असतात. या सदस्यांची नेमणुक त्या राज्याचे राज्यपाल करीत असतात. परंतु मुख्यमंत्री, गृहमंत्री, विधानसभेतील सभापती तेथील विरोधी पक्षाचा नेता यांनी तयार झालेली समिती नेमणुक करावयाच्या सभासदांची नावे राज्यपाल यांना शिफारशी द्वारा कळवितात. या तिन्ही सभासदांचा कार्यकाल पाच वर्षाचा असून वयाच्या ७० किंवा पाच वर्ष यापैकी जे अगोदर पुर्ण होईल तोपर्यंत ते सेवेत राहू शकतात. यानंतर त्यांना इतरत्र सेवा करता येत नाही. राज्य मानवाधिकार आयोगातील सभासदांना बडतर्फ करण्याचा अधिकार राज्यपालांना नसून तो राष्ट्रपतींना असतो.

सदस्यांचे पगार, भत्ते व इतर सवलती राज्यशासन ठरवित असते. त्यांना तटस्थ निर्भयपणे काम करता यावे म्हणून सेवा संरक्षण देण्यात आले आहे.

### (२) राज्य मानवाधिकार आयोगाची कार्ये व अधिकार

राष्ट्रीय मानवाधिकाराप्रमाणेच कार्ये राज्यातील मानवाधिकार आयोगाला असतात. त्यातील प्रमुख कार्य पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(१) मानवी अधिकाराचे उल्लंघन करणारे दावे न्यायालयात चालू असतील तर राज्य आयोग त्यात हस्तक्षेप करील.

(२) दहशतवादी कारवायांमुळे सामान्य लोकांना अधिकारांपासून वंचित राहावे लागते. याबाबत आयोग लक्ष घालतो.

(३) वेगवेगळया गुन्ह्यासाठी गुन्हेगार वेगवेगळ्या तुरूंगात असतात. त्यांना अमानुष वागविले जाते अशा तक्रारी येतात त्याची दखल घेऊन राज्य मानवाधिकार आयोग तुरुंगाची पाहणी करून योग्य सुचना करू शकतात.

(४) मानवाधिकाराच्या क्षेत्रात संशोधनासारखे प्रकल्प हाती घेतात.

(५) सामान्य व्यक्तींच्या अधिकाराच्या बाबतीत जनसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करून लोकशिक्षणाला प्राधान्य दिले जाते.

(६) समाजामध्ये मानवाधिकारांचे रक्षण करणाऱ्या अनेक स्वयंसेवी संस्था, संघटना असतात. त्या संघटनांना विविध प्रकारची मदत मिळवून देण्याचे कार्य आयोग करते.

(७) व्यक्तीच्या अधिकारास बाधा झाली असेल तर त्यास नुकसान भरपाई देण्याची शिफारस करते.

(८) संबंधित व्यक्तीच्या हितासाठी आयोग उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात अपील करू शकते.

(९) आयोग आपल्या कार्याचा अहवाल राज्यपालांना सादर करतात.

अशा प्रकारची कार्ये राज्य मानवाधिकार आयोगाद्वारे केली जातात. १९९३-९४ रोजी केवळ ४९६ तक्रारी आयोगाकडे आल्या होत्या. मात्र २०१२पर्यंत ३०,००० हून अधिक तक्रारींची संख्या झाली होती. आयोगाचे कार्य शिफारशीप्रमाणे असले तरी ते प्रभावी असते. आयोगाच्या शिफारशी आणि जनमत विचारात घेऊन शासन त्यांची दखल घेत असते. मानवी हक्कांचे उल्लंघन झालेल्या व्यक्तीला किंवा बाधित व्यक्तीला नुकसान भरपाई देण्याविषयी मानवाधिकार आयोग वेळोवेळी शिफारशी करीत असतो. याहीपेक्षा संबंधित व्यक्तीच्या हितासाठी मानवाधिकार आयोग उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात अपील करु शकतात. राज्य मानवाधिकार आयोगामुळे देशभर मानवाधिकाराची जाणीव जागृती व उल्लंघनावर कारवाई करण्याची शिफारस याबाबतीत मोठ्या प्रमाणात हातभार लागल्याचा आपणास दिसून येतो. तरीही आणखी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कार्याची आवश्यकता आहे. दहशतवाद, नक्षलवाद, जातीय हिंसाचार, महिलावरील अत्याचार, इत्यादी कारणांमुळे मानवाधिकाराचे उल्लंघन मोठ्या प्रमाणावर होतांना दिसून येते ह्या आव्हानांना समर्थपणे पेलण्याचे कार्य आयोगाला करावयाचे आहे.

## ४.२.३ राष्ट्रीय महिला आयोग

देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे असे मानले जाते. तरी पुरूषांच्या तुलनेत महिलांचा विकास हा कमी प्रमाणात झालेला दिसून येतो. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अशा सर्वच क्षेत्राचा आढावा घेतल्यास आपणास हे दिसून येईल. तेव्हा संपूर्ण समाजाचा विकास करावयाचा असेल तर महिलांचा विकास करणे आवश्यक आहे. १९७० नंतर एकंदर जगभरच महिला सबलीकरण किंवा स्त्रीवाद या विषयावर प्रकर्षाने लक्ष दिले गेले. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात ताबडतोब या प्रश्नाकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. मात्र १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्षानिमित्त शासनाला प्राप्त झालेल्या अहवालावर विशेष लक्ष केंद्रीत केले. सहाव्या पंचवार्षिक योजनेत महिलांच्या समस्यांवर उपाय सुचविण्यात आले. १९८५ ते १९९०च्या दरम्यान महिलांचा सर्वागीण विकासासंदर्भात विचार केला गेला. यामध्ये रोजगार व आर्थिक स्वातंत्र्य शिक्षण, आरोग्य सेवा आणि कुटुंब नियोजन, इत्यादी संदर्भात लक्ष देण्याचे मान्य केले. सातव्या पंचवार्षिक योजनेत याकडे लक्ष देवून एक राष्ट्रीय योजना तयार केली गेली. आठव्या पंचवार्षिक योजनेने महिलांच्या रोजगार निर्मितीमध्ये वृद्धी केली. त्याचप्रमाणे या उददेशपूर्तीसाठी प्रशासकीय यंत्रणांची निर्मिती केली गेली. १९८५ पर्यंत भारत सरकारच्या समाजकल्याण मंत्रालयाकडेच महिलांच्या कल्याणाचे सर्व विषय वर्ग झालेले होते. परंतु सप्टेंबर १९८५ मध्ये महिलांच्या संदर्भातील प्रश्नांचा विचार करून त्या मंत्रालयाची पुर्नरचना करण्यात आली. महिला आणि बाल विभाग १९८५मध्ये नवनिर्मित मानव संसाधन विकास मंत्रालयाकडे सुपूर्द करण्यात आला. तेव्हापासून अनेक संघटना व कार्यालये महिला विकासाशी संबंधित आहेत. याबरोबरच राज्यघटनेत महिला व पुरूष यांना समान अधिकार देण्यात आले आहेत. तरी काही बाबतीत महिलांसाठी अधिक सवलती देण्याचा प्रयत्न केला जातो. महिलांचे सर्व क्षेत्रातील मागासपणा समाप्त करण्यावर शासनाचे प्रयत्न आहेत. यामुळे महिलांच्या अधिक सुरक्षेसाठी व विकासासाठी काही कायदे केलेले आहेत

(०१) हिंदू विवाह अधिनियम, १९५५

(०२) हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६

(०३) हिंदू दत्तक व पालन अधिनियम, १९५६

(०४) प्रसुती लाभ अधिनियम, १९५६

(०५) हुंडा प्रतिबंधक अधिनियम, १९६१

(०६) गर्भ चिकित्सा समाप्ती अधिनियम, १९७१

(०७) समान मजुरी अधिनियम, १९७१

(०८) बालविवाह बंदी दुरूस्ती अधिनियम, १९७६

(०९) अनैतिक देह व्यापार दुरुस्ती अधिनियम १९७६

(१०) महिलांचे अशोभनीय वर्तन अधिनियम, १९८६

(११) सती प्रथा बंदी कायदा, १९८७

(१२) राष्ट्रीय महिला आयोग, अधिनियम १९९२

(१३) प्रसुतीपूर्व गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायदा, १९९४

या सर्व कायद्याच्या माध्यमातून महिलांना सर्व क्षेत्रात कार्य करण्यासाठी येणारे अडथळे दुर करणे तसेच विशेष सहाय्य पुरवणे की ज्यामुळे महिलांचा विकास होईल. याबरोबरच ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीने स्थानिक स्वराज संस्थेत ३३% जागांवर महिलासाठी आरक्षण निश्चित केले आहे. महाराष्ट्रात तर ते ५०% करण्यात आले आहे. या आणि अशा अनेक कायद्याद्वारे महिलांच्या विकासासाठी सरकारने प्रयत्न केले आहेत. राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करून महिलांच्या अधिकाराचे रक्षण करण्याचा प्रयत्न भारत सरकारने केला आहे.

महिलांच्या अडचणी, तक्रारी, महिलांवर होणारे अत्याचार कमी होण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचवण्यासाठी १९७४मध्ये संसदेने एक समिती नेमली होती. या समितीने राष्ट्रीय पातळीवर एक महिला आयोग स्थापन करण्यासाठी शिफारस केली. दि. ३० ऑगस्ट १९९० रोजी तत्कालीन जनता दल सरकारने राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम पारित केले. परंतु ३१ जानेवारी १९९२ रोजी महिला आयोगाची स्थापना झाली.

## (१) राष्ट्रीय महिला आयोगाची रचना

राष्ट्रीय महिला आयोगाचा एक अध्यक्ष असतो. याशिवाय केंद्रशासनाद्वारे नियुक्त केलेले ५ सदस्य असतात. ते पाच सदस्य समाजशास्त्रज्ञ, कायदेपंडित, कामगार संघटना, औद्योगिक व्यवस्थापन, प्रशासन, सामाजिक व अर्थिक गट किंवा श्रेणीतून आयोगावर नियुक्त केले जातात. त्यातील दोन सभासद अनुसूचित जाती व जमातीमधून असावेत. सभासद सचिव प्रशासकीय सेवेतील सनदी अधिकारी असावा लागतो. अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाळ तीन वर्षाचा असतो.

आयोगाला आपले कार्य व्यवस्थित पार पाडता यावे यासाठी अनेक विशेषज्ञ समित्या स्थापन केल्या जातात. अनेक विषयांवर त्या समित्या आयोगाला सल्ला देतात. काही महत्त्वपुर्ण विषय पुढीलप्रमाणे आहेत. ज्यावर विशेषज्ञ समिती स्थापन केली जाते व त्यांचा त्या विषयांवर सल्ला घेतला जातो. त्यांचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत-

(१) सामाजिक सुरक्षा

(२) पंचायती राज

(३) महिला विकास

(४) महिला व संचार साधन

(५) आदिवासी महिला

(६) महिलांच्या न्यायिक कोठडीसंबंधी

(७) अनुसुचित जातीच्या महिलांसाठी

अशा विविध समित्या स्थापित करुन त्यांचा सल्ला घेतला जातो.

## (२) राष्ट्रीय महिला आयोगाची कार्ये

राष्ट्रीय महिला आयोगाद्वारे महिलांच्या विकासासाठी कार्ये केली जातात याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

(०१) भारतीय संविधानात महिलांसाठी असलेल्या तरतुदी आणि राष्ट्रीय इतर कायदे यांचे परीक्षण व चौकशी करून त्या तरतुदीची प्रभाविपणे अंमलबजावणी करण्यासाठी सुचना करणे.

(०२) महिलांच्या अधिकारावर अतिक्रमण होत असलेल्या तक्रारींकडे विशेष लक्ष देणे.

(०३) महिलांच्या संबंधित असलेल्या सामाजिक अर्थिक स्थितीचे अध्ययन, संशोधन, इत्यादींचे आयोजन करणे.

(०४) महिलांनी त्यांच्या विकास कार्यक्रमात व ते कार्यक्रम ठरविण्यात सहभागी व्हावे यासाठी प्रयत्न करणे त्यासाठी शासनाला सुचना करणे.

(०५) महिलांच्या संघटनांना प्रभावित करण्याच्या न्यायालयीन प्रकरणांकडे लक्ष देणे.

(०६) महिलांच्या विकाससबंधी प्रतिवर्ष सरकारकडे अहवाल पाठविणे, शिवाय आयोगाला आवश्यक वाटेल तेव्हा अहवाल पाठविता येतो.

(०७) महिलांशी संबंधित विशेष विषयावरील अहवाल सरकारकडे पाठविणे

(०८) केंद्र सरकारद्वारे आयोगाकडे आलेल्या किंवा केंद्राने निर्देशित केलेल्या विषयासंबंधी कार्य करणे.

(०९) हुंडा प्रतिबंधक कायद्यांची माहिती देणे.

(१०) कौटुंबिक न्यायालयाविषयींची जागृती महिलांमध्ये करणे.

(११) बालविवाहावर कायद्याने बंदी असली तरी काही समाजात ते अद्याप होत असतात म्हणून तेथे जागृती निर्माण करणारे कार्यक्रम घेणे आणि इतर उपायांची कार्यवाही करणे.

(१२) स्त्रियांच्या अर्थिक प्रगतीचा स्तर उंचावण्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत. त्या सुचित करणे किंवा त्या बद्दल मार्गदर्शन करणे.

(१३) आयोगाकडे आलेल्या विविध तक्रारींचे निराकरण करुन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणे.

अशा प्रकारे राष्ट्रीय महिला आयोग विविध प्रकारची कार्ये करते. हे करत असताना आयोग एका नागरी न्यायालयाप्रमाणे कार्य करते. व्यक्तीला विशिष्ट तारीख देवून बोलावले जाते. त्याची चौकशी, तपासणी, फेरतपासणी अशा न्यायालयीन प्रक्रियेतून त्या व्यक्तीला जावे लागते. आयोग कोणत्याही प्रकारची त्या प्रकरणासंबंधित कागदपत्रे मागवू शकते. आयोगाला व्यक्तीच्या साक्ष शपथपत्रावर घेता येतात. साक्षी पुरावे घेण्याचा आयोगाला पूर्ण अधिकार प्राप्त झालेला आहे.

१९९२ पासून आयोगाने आपल्या कार्याची दिशा निश्चित करून कार्य केले हे आपणास दिसून येते. तरीही आयोगाच्या कार्याला अधिकाधिक फलदायी बनवण्यासाठी सर्वांच्या सहकाऱ्याची गरज आहे. देशातील काही महिला संघटनांना आयोगाला घटनात्मक दर्जा प्राप्त व्हावा असे वाटते. यामुळे शिफारशींना स्विकारणे सरकारवर बंधनकारक राहील. तसेच काहींना राष्ट्रीय महिला आयोगाचे विकेंद्रिकरण व्हावे असे वाटते. १९९५ला सात राज्यात व एका केंद्रशासित प्रदेशात आयोग स्थापन झाले होते आणि ते आपले कार्य करत आहेत. याबरोबरच महिलांनाच अधिक सुशिक्षित करुन त्यांच्या हक्क व अधिकाराची जाणीव झाल्यास खऱ्या अर्थाने महिला सबलीकरण होऊन आयोगाच्या स्थापनेचे सार्थक होईल.

**आजपर्यंतच्या राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षांची यादी**

| अ.क्र. | नाव | कार्यकाळ |
|---|---|---|
| (१) | जयंती पटनायक | ०३-०२-१९९२ ते ३१-०१-१९९५ |
| (२) | डॉ.व्ही.मोहिनी गिरी | २१-०७-१९९५ ते २०-०७-१९९८ |
| (३) | विभा पार्थसारथी | १८-०१-१९९९ ते १७-०१-२००२ |
| (४) | पूर्णिमा आडवाणी | २५-०१-२००२ ते २४-०१-२००५ |
| (५) | गिरीजा व्यास | १६-०२-२००५ ते १५-०२-२००८ |
| (६) | गिरिजा व्यास | ०९-०४-२००८ ते ०८-०४-२०११ |
| (७) | ममता शर्मा | ०२-०८-२०११ ते ०१-०८-२०१४ |
| (८) | ललिता कुमारमंगलम | १७-०९-२०१४ ते २८-०९-२०१७ |
| (९) | रेखा शर्मा | ०७-०८-२०१८ ते आजपर्यंत |

source – http://ncw.nic.in

## *स्वंय-अध्ययनासाठी प्रश्न*

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून कोणता दिवस पाळला जातो?

(२) राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना केव्हा करण्यात आली?

(३) राज्य मानवाधिकार आयोगाच्या सदस्यांची नेमणूक कोण करतात?

(४) राष्ट्रीय महिला आयोगाच्या पहिल्या अध्यक्ष कोण होत्या?

(५) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय कोठे आहे?

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**मानवाधिकार :** प्रत्येक मानवाला असणारे निसर्गदत्त मूलभूत अधिकार, हे अधिकार मानवाला जन्मत:च मिळतात.

**रेड क्रॉस संघटना :** ही एक आंतरराष्ट्रीय मानवतावादी संघटना आहे. जगभरातील लोकांच्या आयुष्य व आरोग्याचे रक्षण करणे हे ह्या संघटनेचे ध्येय आहे.

**ॲम्नेस्टी इंटरनॅशनल :** ही एक आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था आहे. जी जगातील मानवी मूल्य, मानवी स्वातंत्र्य आणि भेदभाव निर्मूलनासाठी कार्य करते.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून १० डिसेंबर हा दिवस पाळला जातो.

(२) राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना १२ ऑक्टोबर १९९३ रोजी करण्यात आली.

(३) राज्य मानवाधिकार आयोगाच्या सदस्यांची नेमणूक राज्यपाल करतात.

(४) राष्ट्रीय महिला आयोगाच्या पहिल्या अध्यक्ष जयंती पटनायक होत्या.

(५) राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे.

## ४.४ सारांश

भारतातील वैधानिक मंडळे-१ या प्रकरणात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राज्य मानवाधिकार आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोग या तीन आयोगाचा आढावा घेतला आहे असता यावरून हे स्पष्ट होते की, मानवाधिकार हे व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक आहेत. व्यक्तीला स्वतंत्र, सन्मानाचे आणि स्वविकास करण्यासाठी सदैव आणि विश्वातील प्रत्येक नागरीकाला याची आवश्यकता आहे तसेच मानवाधिकार हे मुलभुत अधिकारापेक्षा व्यापक आहेत. मुलभुत अधिकारांना त्या देशांच्या राज्यघटनेत स्थान असले तरी ते केवळ देशातील नागरीकांनाच प्राप्त होतात मात्र मानवाधिकार हे सर्वांसाठी असतात, विशेष म्हणजे मानवाधिकाराची सुरूवात पाश्चात्य देशात झाली. इंग्लंडमधील रक्तहीन क्रांती, अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती यातून हा विचार वृद्धींगत होत गेला. भारतादेखील मानवाधिकारासंबंधी चर्चा स्वातंत्र्याच्या पूर्वीपासून झालेली दिसून येते. मात्र स्वातंत्र्यानंतर लगेच यावर ताबडतोब कार्य झाले नसले तरी १९८०-९०च्या दशकात हा विचार पुढे आला यातून राष्ट्रीय पातळीवर मानवाधिकार कायदा १९९२ मध्ये पारीत होऊन आयोग स्थापन झाला. राष्ट्रीय मानवाधिकार कायद्याद्वारे स्थापित आयोगाला मानवाधिकारासंबंधी व्यापक अधिकार देण्यात आले आहेत. या आधारावर आयोगाने व्यक्तीच्या मुलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न सतत चालवला आहे. महिला, मुले, दुर्बल घटक अशा कमजोर घटकाच्या तक्रारींवर आयोग विशेष लक्ष देत असून मानवाधिकाराच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. असे असले तरी भारतातील निरक्षरता, दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा, इत्यादी समस्यांपासून समाजाला मुक्त केल्याशिवाय परिस्थिती सुधारणार नाही हे आव्हान कायम आहे तसेच राष्ट्रीय पातळीवर केवळ १ आयोग स्थापन करून प्रचंड लोकसंख्या, क्षेत्रफळ आणि गुंतागुंतीच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय समस्या असणाऱ्या देशात मानवाधिकाराचे कार्य करणे जिकरीचे ठरेल म्हणून राज्यपातळीवरही आयोग स्थापन करून मानवाधिकाराचे कार्य करण्याची व्यवस्था राष्ट्रीय मानवाधिकार कायद्यात करण्यात आली. त्यानुसार २३ हून अधिक राज्यात राज्यपातळीवर आयोग काम करत आहेत. राज्य मानवाधिकार आयोगालाही राष्ट्रीय आयोगाप्रमाणे अधिकार देण्यात आले आहेत. १९७०च्या दशकात जगभरच महिला विषयक प्रश्नांची जाणीव जागृती वाढली होती. त्यामुळे महिलांच्या सर्वांगीण विकासासंदर्भात विचार करण्यात येऊ लागला. तसे या अगोदरही भारतात राज्यघटनेत महिला व पुरूष यांना समान अधिकार देण्यात आले आहेत. तसेच विविध कायद्याच्या माध्यमातून महिलांना सुरक्षा देण्याचा प्रयत्न झालेला होता. तरीही महिलांची सर्वच क्षेत्रात प्रगती पुरूषांच्या तुलनेत कमी होती. महिलांच्या वाढत्या अडचणी, महिलांवर होणारे

अत्याचार या सर्व गोष्टींच्या पार्श्वभूमीमुळे महिलांची स्थिती सुधारण्यासाठी महिला आयोग स्थापन करण्यात आला. राष्ट्रीय महिला आयोगाद्वारे महिलांच्या विकासासाठी अनेक कार्ये केली जात आहेत. तसेच बहुतांश राज्यांनीही राज्य महिला आयोग स्थापन करून महिला सबलीकरणाचे कार्य हाती घेतले आहे.

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मानवाधिकार म्हणजे काय?

(२) मानवाधिकार व मूलभूत अधिकार या दोन्हीमधील संबंध सांगा.

(३) भारतातील राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या स्थापनेची पार्श्वभूमी सांगा.

(४) राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची रचना व कार्ये लिहा.

(५) राज्य मानवाधिकार आयोगाविषयी माहिती लिहा.

(६) राष्ट्रीय महिला आयोगाची कार्ये सविस्तर लिहा.

## ४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) कटारिया, एस. (२००८). *भारतीय लोकप्रशासन.* नवी दिल्ली, नॅशनल पब्लिकेशन हाऊस.

(२) जाधव, टी. (२०११). *भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतीबंध.* पुणे, युनिक ॲकॅडमी प्रकाशन.

(३) जोशी, एस. (२०१२). *भारतीय शासन व राजकारण.* औरंगाबाद, विद्या बुक पब्लिकेशर्स.

(४) बंग, के. आर. (२०११). *भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया.* औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स.

(५) भोळे, भा. ल. (२०१०). *भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण.* नागपूर, पिंपळापुरे बुक्स डिस्ट्रीब्युटर्स.

(६) लक्ष्मीकांत एम. (२०१२). *भारतीय राजकारण.* इंडिया, मैकग्रा हिल.

# घटक ५ : वैधानिक मंडळे – भाग २

*अनुक्रमणिका*

५.० उद्दिष्टे
५.१ प्रास्ताविक
५.२ विषय-विवेचन
 ५.२.१ राष्ट्रीय विकास परिषद
 ५.२.२ राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोग
 ५.२.३ केंद्रीय माहिती आयोग
५.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
५.५ सारांश
५.६ सरावासाठी स्वाध्याय
५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ५.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

- राष्ट्रीय विकास परिषदेची रचना व कार्याची माहिती होईल.
- राष्ट्रीय विकास परिषदेच्या कार्याचे मूल्यांकन करता येईल.
- राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोगाच्या निर्मितीची पार्श्वभूमी समजेल.
- राज्यघटना पुनर्विलोकन आयोगाने सुचविलेल्या शिफारशींची माहिती होईल.
- केंद्रीय माहिती आयोगाची रचना व कार्ये यांची माहिती होईल.

## ५.१ प्रास्ताविक

या घटकामध्ये राष्ट्रीय विकास परिषद, राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोग व केंद्रीय माहिती आयोग या वैधानिक मंडळाचा अभ्यास करण्यात येणार आहे. या मंडळाची निर्मितीची पार्श्वभुमी रचना, कार्य व कार्याची अंमलबजावणी तसेच मुल्यांकन करण्यात येईल. भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशाचा सर्वांगीण विकास करणे हे गरजेचे होते. देशाने मिश्र अर्थव्यवस्था स्विकार केला. जगापुढे विकासाची दोन प्रारूपे समोर होती. यातुन आपण सुवर्णमध्ये काढण्याचा प्रयत्न केला. परंतु नेहरू रशियाच्या नियोजित अर्थव्यस्थेचा प्रारूपाने अत्याधिक प्रभावी होते. त्यामुळे त्यांनी देशाच्या विकासाचे नियोजन करण्यावर भर दिला. याचाच परिणाम म्हणून नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली. यानंतर केंद्रीय स्तरावरील नियोजनात राज्याचांही सहभाग असावा हा विचार पुढे आला यातुन राष्ट्रीय विकास परिषदेसारख्या मंचाची स्थापना करून राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सदस्यत्त्व देवून राज्याचा सहभाग घेण्यात आला. वास्तविकपणे नियोजन आयोगाची साहाय्यकारी संस्था म्हणून कार्य करत राहिली. वेळोवेळी १९६७मध्ये केंद्रातील सर्व मंत्रिमडळ सदस्यांना सदस्यत्त्व देण्यात आले. १९६७पर्यंत देशात

एकपक्षीय वर्चस्व राज्यात व केंद्रात राहिल्याने फारसे प्रभावी कार्य होताना दिसले नाही यातून नियोजन आयोग सदृढ झाली. परंतु १९६७ नंतर अनेक राज्यांत विरोधी पक्षाची सरकारे आल्याने परिषदेत खऱ्या अर्थाने राज्यांची भुमिका वाढली. परिषदेने केलेल्या कार्याचा आढावा ही यात घेण्यात आला व शेवटी मुल्यांकनही केले आहे. २०१५मध्ये नियोजन आयोगाची जागा नीती (NITI) आयोगाने घेतली आहे. नियोजनाची व्यवस्था ही बदलत्या राजकीय परिस्थितीनुरूप व गरजेनुरूप करण्याचे संकेत यातून पुढे आल्याचे सांगता येईल.

राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोग याचा अभ्यास करत असताना राज्यघटनेची निर्मिती त्यातील बदलांची आवश्यकता त्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा हा भाग आहे. याचा आढावा घेण्यात आला आहे. आयोगाने अनेक घटकांशी चर्चा करून आपला अहवाल सादर केला. आयोगाने आपल्याला ठरवून दिलेल्या उद्देशानुसार व्यवस्थित कार्य पार पाडले हे दिसते. परंतु आयोगाच्या स्थापनेमुळे विरोधी वातावरण निर्माण झाल्याचाही संदर्भ घेण्यात आला आहे. शेवटी आयोगाच्या महत्त्वपूर्ण शिफारशी या देशाच्या विकासासाठी लागू करणे फायदेशीरच ठरेल. असा आशावाद आपण बाळगू शकतो हे शिफारशीवरून दिसते.

प्रशासन हे प्रभावी असेल तरच शासन व्यवस्थेची उद्दिष्टे पुर्ण होऊ शकतात. प्रशासनात पारदर्शकता जबाबदारीचे तत्त्व व सामान्य व्यक्तीला प्रशासनाकडून माहिती प्राप्त करून देणे यासाठी माहिती अधिकाराची मागणी पुढे आली होती.

माहितीच्या अधिकारांच्या निर्मितीसंबंधी जगभरातील देशांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक यांनी ही ह्या विचाराचा प्रसार केला यासर्व परिस्थितीमुळे भारतातही या संदर्भात आंदोलन उभारली गेली. यातून अनेक राज्यांनी हा अधिकार पारित करण्यासाठी दबाव वाढल्याने २००५ साली तो पारित करण्यात आला. यामध्ये केंद्रीय माहिती आयोगाची स्थापना करण्याची शिफारस केली. यानुसार केंद्रीय माहिती आयोगाची रचना व कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच मूल्यांकनही करण्यात आले आहे.

## ५.२ विषय-विवेचन

### ५.२.१ राष्ट्रीय विकास परिषद

योजना आयोगाच्या निर्मितीच्या नंतर जेव्हा पंचवार्षिक योजनेची निर्मीती होवु लागली तेव्हा असा विचार पुढे आला की केंद्रीय पातळीवर योजना निर्मितीमध्ये राज्यांचीही काही भुमीका असायला पाहिजे. यानुसार केंद्रीय मंत्रिमंडळाच्या प्रस्तावावरून एका कार्यकारी आदेशान्वये ६ ऑगस्ट १९५२ रोजी राष्ट्रीय विकास परिषदेंची स्थापना करण्यात आली.

वास्तविकपणे ही परिषद श्री. के. सी. नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली १९४६मध्ये 'सल्लागार नियोजन मंडळ' स्थापन करण्यात आले होते. त्याचेच संशोधित रूप आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यातही असे स्पष्ट केले होते की, 'भारतासारख्या विशाल देशात जेथे राज्यांना आपल्या कर्तव्याची पूर्तता करण्यासाठी राज्यघटनेत स्वायत्तता दिलेली आहे. अशा स्थितीत राष्ट्रीय विकास परिषदेसारखी एखाद्या संघटनेची गरज आहे की ज्यामुळे वेळोवेळी भारताचे पंतप्रधान व राज्यांचे मुख्यमंत्री योजनेचे कार्य व त्याच्या विविध बाबींवर समीक्षा करू शकतील.

भारतातील सर्व घटक राज्यांच्या योजनेसंबंधीचे प्रश्न या परिषदेच्या माध्यमाने सोडविले जावू शकतात. अशी धारणा व अपेक्षा या प्रकारची परिषद निर्माण करण्यामागे व्यक्त करण्यात आली. प्रांतिक सरकारांचे सहकार्य मिळवून योजनेची कार्यवाही करणे आवश्यक समजले गेले त्यामुळे सर्व राज्ये व केंद्रशासन यांनी एखाद्या मंचावर एकत्र येवुन राष्ट्रीय प्रश्नांची योग्य चर्चा करून सोडविणे यामुळे शक्य होऊ शकते. असा विश्वास या परिषदेच्या निर्मितीच्या वेळी सरकारकडून व्यक्त करण्यात आला.

#### (१) राष्ट्रीय विकास परिषदेची रचना

राष्ट्रीय विकास परिषदेचे अध्यक्ष पंतप्रधान असतात. केंद्रीय मंत्रिमंडळाचे सर्व सदस्य राज्याचे मुख्यमंत्री व नियोजन आयोगाचे सदस्यही सदस्य असत.

राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना करते वेळेस भारतात अ, ब, व स अशा श्रेणीत राज्य विभागलेले होते. यामुळे परिषदेची संख्या ५० इतकी झाली होती. १९५६ साली राज्यपुर्नरचना झाल्यामुळे राज्यांची संख्या कमी झाली. प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय मंत्रिमंडाळातील सर्व कॅबिनेट मत्र्यांना पण सामिल करण्यात आले. यापूर्वी केवळ गृह, संरक्षण, अन्न व कृषी मंत्रीय परिषदेचे सदस्य असत. अनेकवेळा परिषदेच्या बैठकांना आरबीआय चे गर्व्हनर अर्थशास्त्रज्ञ

व राज्यांच्या काही मंत्र्यांना आवश्यकतेनुसार आमंत्रित करण्यात आले होते. १९५४मध्ये परिषदेच्या कार्यात सहकार्यासाठी एका स्थायी समितीची स्थापना केली होती. ऑक्टोबर १९६७ पासुन राष्ट्रीय विकास परिषदेच्या संरचेत बदल लागू करण्यात आले.

परिषदेच्या कार्याला कुशलतापुर्ण रितीने पुर्ण करण्यासाठी मंत्रिमंडळ सदस्य मुख्यमंत्री व इतर विशेषज्ञ सदस्यांच्या समित्या बनवल्या जातात. या समित्या कधीही एका विषयांवर किंवा समस्येवर सखोल चर्चा करून त्यावर उपाय सुचवण्याचा प्रयत्न करते. लोकसंख्या, अनुसुचित जाती, अत्याचार, रोजगार, आरोग्य, शिक्षण व साक्षरता यासंबंधी समित्या कार्यरत आहेत.

## (२) राष्ट्रीय विकास परिषदेच्या समित्या

राष्ट्रीय विकास परिषदेच्या रचनेवरून असे सहज लक्षात येऊ शकते की परिषद सर्व विषय किंवा समस्यांवर सविस्तर चर्चा करीत असली, तरी ती विषयाची व्याप्ती व सखोलपणे त्यावर सुचवयाचे उपाय यांचे विस्तृत व योग्य निष्कर्ष काढू शकत नसल्यामुळे काही समित्या स्थापन करून अंतिम स्वरूपाचे निर्णय घेण्यासाठी त्याच्या सुचना मागविल्या जातात. काही वेळा तात्पुरत्या स्वरूपाच्या समित्या तर काही स्थायी स्वरूपाच्या समित्या स्थापन केल्या जातात. इ. स. १९५५मध्ये श्री. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली 'ग्राम व लघु उद्योग. समितीची स्थापना करून प्रत्येक लघु उद्योगाची राज्यवार पाहणी करून शिफारशी करण्यासंबंधी सांगण्यात आले. वेगवेगळ्या लघू उद्योगाची स्वतंत्रपणे माहिती घेऊन प्रत्येक लघुउद्योगाची परिणामकारकता वाढविण्यासाठी उपाय सुचविण्यास सांगण्यात आले. त्याचप्रमाणे प्रत्येक राज्याची लघुउद्योगाची स्वतंत्र यादी करण्याचे सुचविले. या समितीच्या सर्व शिफारशी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा अविभाज्य भाग म्हणुन राबविण्याचे ठरविले.

दुसरी एक स्थायी समिती स्थापन करण्यात आली. त्या समितीने राष्ट्रीय योजनेतील जे विविध कार्यक्रम आहेत त्यांचे मुल्यांकन करून त्यासाठी सतत लागणारे आर्थिक साहाय्य व त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचे कार्य या समितीवर सोपविण्यात आले.

मार्च १९६०मध्ये वस्तुंच्या किंमती नियंत्रीत करण्याच्या उद्देशाने एक समिती स्थापन केली. त्याचाप्रमाणे जानेवारी १९६१मध्ये 'बचत' वाढविण्यासाठी समिती स्थापना केली आणि त्याचा उपयोग तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीने करण्याचे ठरविले. सर्व मुख्यमंत्र्यांनी देखील बचतीसंबधीचे प्रकल्प जास्तीत जास्त राबविले जावेत अशी उपयुक्त सुचना केली होती.

अशा प्रकारे राष्ट्रीय विकास परिषद काही तात्पुरत्या स्वरूपाच्या तर काही स्थायी स्वरुपाच्या समित्या स्थापन करून कार्य करण्याचे ठरविते.

## (३) राष्ट्रीय विकास परिषदेचे उद्देश व कार्य

राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना योजना आयोगाच्या व राज्यामध्ये समन्वय स्थापित करण्याच्या उद्देशाने केली होती. याबरोबरच काही उद्देश ठरवले होते ते खालीलप्रमाणे आहेत.

(१) राष्ट्रीय योजनेच्या समर्थनार्थ राष्ट्रातील संसाधने व प्रयत्नांना अधिक गतिशील व शक्तीशाली बनवणे

(२) सर्व महत्त्वपूर्ण क्षेत्राला निवडून सामान्य आर्थिक धोरणांना प्रस्तावित करणे.

(३) देशातील सर्व प्रदेशांचा विकास करणे आणि त्यात संतुलन राहिल अशा प्रकारचे धोरण निश्चित करणे.

राष्ट्रीय विकास परिषदेची कार्ये १९६७ मध्ये प्रशासकीय सुधारणा आयोगाची शिफारस स्विकारल्यानंतर काही कार्य ठरवली ती खालीलप्रमाणे आहेत.

(१) राष्ट्रीय योजनेच्या निर्मितीसाठी दिशा निर्देश तयार करणे.

(२) योजना आयोगाच्याद्वारे प्रस्तुत केलेल्या योजनेवर विचार - विमर्श करणे.

(३) राष्ट्रीय विकासासाठी साधनांचा अनुमान लावणे व त्यामध्ये वाढ करण्यासाठी उपाय सुचवणे.

(४) राष्ट्रीय नियोजन यशस्वी करण्याच्या दृष्टीने जनतेचे सहकार्य आणि सहभाग वाढविण्याचे उपाय सुचविणे व त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करून विकास कार्ये सिद्धीस नेण्याचे प्रयत्न करणे.

(५) अविकसित प्रदेश, अविकसित सामाजिक घटक आणि अशाच प्रकारे ज्याबाबींचा विकास करणे आवश्यक आहे. अशा सर्व बाबींचा विकास करणे आवश्यक आहे, अशा सर्व बाबींना विकास कार्यात प्राधान्य देणे व त्यांचा विकास घडवून आणणे.

(६) योजनेला अंतिम रूप देणे व त्याचा स्वीकार करणे.

(७) राष्ट्रीय योजनेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेणे व त्यांचे मुल्यांकन करणे.

## (४) राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठका

परिषदेच्या बैठका आवश्यकतेनुसार बोलविण्यात याव्यात असे ठरावात नमुद केले होते. परिषदेत योजनांवर चर्चा, समस्यावर चर्चा करून उपाय सुचवणे, योजनेच्या प्रगतीचे मुल्यांकन करणे यासाठी वर्षातून दोनदा बैठका होतात. परंतु १९५२ ते १९६० पर्यंत १६ वेळा बैठका केल्या. तर जुन २००५ पर्यंत एकुण ५१ बैठका झाल्या यावरून हे स्पष्ट होते की साधारणत वर्षाला १ बैठक झाली आहे. साठच्या दशकात वर्षातुन दोनदा बैठका झाल्या. परंतु नंतर हे प्रमाण कमी झाल्याचे दिसते.

बैठकीसाठी एक कार्यक्रमपत्रिका तयार केली जाते. परिषदेचे सचिव आपली निवदेन पत्रिका किंवा टाचण जोडतात. यासर्व विषयांची संबंधित कागदपत्रे सर्व सभासदांना बैठकीपुर्वीच वितरित करतात. बैठकीची सुरूवात पंतप्रधानाच्या भाषणाने होत असते. कारण तेच परिषदेचे अध्यक्ष असतात व बैठकीचे अध्यक्षस्थान तेच भुषवितात.

## (५) कार्यक्रमांची अंमलबजावणी

१९५२ पासून राष्ट्रीय विकास परिषदेसमोर महत्त्वाचे असे अनेक विषय चर्चेसाठी आले. त्यावर व्यवस्थित चर्चा घडवून आणली गेली व त्यांची अंमलबजावणी करण्याच्या सुचना संबंधित शासकीय घटकांना देण्यात आल्या. परिषदेची जी कार्ये निश्चित केली गेली आहेत. त्यादृष्टीने परिषद नेहमी प्रयत्नशील राहिलेली दिसते. या परिषदेने योजनेच्या संपूर्ण आराखडयासंबधी आपल्या शिफारशी व सुचना केलेल्या दिसतात. योजनेच्या विविध कार्यक्रमांत समन्वय स्थापित करण्यासाठी प्रयत्न केलेला दिसतो. विकास कार्यावर परिणाम घडविणाऱ्या आर्थिक आणि सामाजिक बाजुंचा सर्वांगीण विचार करून योजनेचे कार्य यशस्वी करण्यासाठी उपयुक्त मार्ग सुचविले आहेत. यामध्ये परिषदेला भरपुर यश मिळाले आहे. राष्ट्रीय साधन सामग्रीचा पुरेपुर उपयोग करून घेण्यासाठी परिषदेने मार्ग सुचविले. औद्योगिक उत्पादनांचे विकेंद्रीकरण करण्यासाठी उपाय सुचविले व त्यांची अंमलबजावणी देखील यशस्वीपणे केली आहे.

जलसिंचन व्यवस्थेसंबंधीचे अनेक प्रकल्प प्रत्यक्षात साकार करण्यामध्ये परिषद यशस्वी ठरली आहे. ज्या शेतीला पाणी देण्यात येते अशा शेतीवर कर लावण्याचा विचार आज परिषदेच्या शिफारशीमुळे सर्वत्र मान्य करण्यात आलेला दिसतो. पाण्याखालील जमीनीची सुधारीत कर पद्धती रूजविण्यात परिषदेला यश मिळाले आहे. दारूबंदी करण्यासाठी टप्प्या–टप्प्याने अंमलात आणावयाची उपाय योजना अनेक राज्यांनी स्वीकारली असून काही राज्यांतून पूर्णत: दारूबंदी करण्यात आली आहे. दारूबंदी विषयक अनेक कार्यक्रम राबविण्यातील परिषदेचे यश उल्लेख करण्यासारखे आहे. परिषदेने पंचायत राज योजना राबविण्याचा आग्रह धरला बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींना मंजुरी दिली. सर्व घटकराज्यांना त्या दृष्टीने प्रोत्साहन दिले व सर्व राज्यांनी जिल्हा तालुका आणि ग्रामपातळीवर 'पंचायत' राजची स्थापना करावी अशी शिफारस केली. त्या शिफारशीना मुर्तरूप प्राप्त झाल्याचे दिसते. भारतात स्थानिक शासनामध्ये सारखेपणा आणण्यासाठी व त्यांची कार्ये अधिक परिणामकारक होण्यासाठी परिषदेने सुचविलेले मार्ग बरेच उपयुक्त ठरले आहेत सहकार तत्त्वांचा शेती क्षेत्रासाठी स्विकार करावा व शेतीसंबधी किंवा शेतीला जोडुन असलेल्या अनेक व्यवहारात सहकारी तत्त्वावर संघटितरित्या कार्ये केली जावीत याबाबतीत केलेल्या सुचना सर्वच राज्य सरकारांनी स्वीकारल्या आहेत. आणि अनेक कार्ये सहकारी तत्त्वावर केली जात आहेत. महाराष्ट्रात सहकार चळवळीचे जाळे सर्वत्र दिसून येते. सहकार तत्त्वाचा स्वीकार करून एक प्रकारे सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था निर्माण करण्यासाठी परिषदेच्या शिफारशी उपयुक्त ठरल्या आहेत. पूर्व पाकिस्तानातून येणाऱ्या निर्वासितांच्या प्रश्नांसारखे अनेक राष्ट्रीय प्रश्न राष्ट्रीय विकास परिषदेसमोर मांडले गेले परिषदेने त्या समस्यांतून मार्ग काढण्यासाठी सुचविलेल्या उपाययोजनांचा त्या त्या सरकारांनी स्वीकार केला आणि आपल्या समस्या सोडवून घेण्यात यश मिळविले.

अशा प्रकारे राष्ट्रीय विकास परिषदेसमोर आलेल्या सर्व प्रश्नांचे गांभीर्य समजून घेऊन राष्ट्रीय हितांच्या दृष्टीने त्यावर उपाय सुचविण्यात परिषदेने चांगल्या प्रकारे कार्ये केले असे म्हणता येईल.

## (६) राष्ट्रीय विकास परिषदेच्या कार्याचे मूल्यांकन

राष्ट्रीय विकास परिषद ही केंद्र, राज्य सरकार आणि नियोजन आयोगामध्ये नियोजनाबाबतची धोरणे आणि कार्यक्रम यात समन्वय साधण्याचे कार्य करत होती. याबाबत परिषदेने बहुतांश प्रमाणात यश मिळविलेले आहे. याशिवाय राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर केंद्र–राज्य यांच्यामध्ये संवाद साधण्याचे व्यासपीठ म्हणुनही परिषदेने भुमिका पार पाडली आहे. संघराज्यीय व्यवस्थेमध्ये केंद्र आणि राज्य यांच्यातील जबाबदारीत समन्वय करणारी ती एक यंत्रणा आहे.

परिषदेच्या कार्यपध्दतीवर दोन विरोधात्मक दृष्टीकोन व्यक्त केले जातात. एका बाजूने या परिषदेचे वर्णन सुपर कॅबिनेट असेही केले जाते. ही परिषद केवळ सल्लागार संस्थेप्रमाणे कार्य करीत असली तरी तिची रचना ही विस्तृत आणि शक्तीशाली स्वरूपाची आहे. या परिषदेमध्ये राष्ट्रीय जनाधार व्यक्त होत असल्याने तिच्या शिफारशीकडे दुर्लक्ष केले जात नाही दुसऱ्या

दृष्टीकोनात केंद्र सरकारने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांना मान्यता देणारे तिचे कार्य 'रबरी शिक्क्या' प्रमाणे मानले जाते. असा दृष्टीकोन दृढ होण्याचे कारण म्हणजे दीर्घकाळ केंद्र आणि राज्यांमध्ये कॉंग्रेस पक्ष सत्ताधारी पक्ष होता. तथापि अनेक प्रादेशिक पक्षांच्या यशामुळे परिषदेचे स्वरूप संघराज्यात्मक बनत असुन राष्ट्रीय नियोजनाच्या निर्मितीमध्ये घटक राज्यांच्या सहभाग वाढत आहे. १९६७ नंतर एकपक्षीय वर्चस्व कमी झाले आणि राज्यातही विरोधी पक्षांची सरकारे आस्तित्त्वात आली.१९८९ नंतर केंद्रातही एकपक्षीय सरकारांची जागा आघाडी आणि अल्पमत सरकारांनी घेतली त्यामुळे प्रादेशिक पक्ष आणि राज्यांच्या भुमिकेत बदल झाला.

काही मान्यवरांनी परिषदेच्या कार्याबाबत भाष्य केलेली आहेत ती पुढीलप्रमाणे एम. Ma (Brecher) आपला "Nehru - Political Biograhy. या ग्रंथात लिहितात की, राष्ट्रीय विकास परिषद प्रशासकीय व सल्लात्मक अशी सर्वोच्च संस्था नियोजन आयोगासाठी म्हणून स्थापन केली आहे, ती धोरणासंबंधी निर्देशन करते ज्या धोरणावर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केलेला असतो. अशाप्रकारे ही संस्था आपल्यापेक्षा कमी दर्जाच्या नियोजन आयोगावर निर्णय घेण्याचे सोपवते. ज्या नियोजन आयोगाचा दर्जा हा परिषरदेचे संशोधनात्मक  अंग असा असतो.

एच. एम. पटेल –नियोजन आयोगाच्या सल्लागार संस्थांमध्ये राष्ट्रीय विकास परिषदेचा समावेश करण्यात आलेला आहे. परंतु तिच्या रचनेचा विचार केल्यास ही बाब नक्कीच अयोग्य वाटते. राष्ट्रीय विकास परिषद ही नियोजन आयोगापेक्षा श्रेष्ठ दर्जाची आहे. म्हणून परिषदेने दिलेला सल्ला स्विकारून नियोजन आयोगाने निर्णय घेण्यापेक्षा  नियोजन आयोगाने  सल्ला देऊन राष्ट्रीय विकास परिषदेने निर्णय घ्यावयास पाहिजे. अशी रचना असावी, असे प्रतिपादन करतात.

के संथानम – दुसऱ्या वित्त आयोगाचे अध्यक्ष "Union State Relation in India. या ग्रंथात लिहतात की, राष्ट्रीय विकास परिषदेला भारतीय संघराज्याने उच्च कॅबिनेट म्हणून दर्जा देण्यात आला आहे. हे कॅबिनेट केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे कॅबिनेट बनले आहे. दोन्ही शासनाच्या वतीने कार्ये करणाऱ्या मत्रिमंडळाचे स्वरूप परिषदेला प्राप्त झाले आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

परिषदेच्या स्वरूप व कार्यासंबधी अशा प्रकारची मते व्यक्त केली जातात. परिषदेच्या कार्याचे मुल्यमापन करणे अवघड कार्य आहे, देशातील शिखरावर असलेली निर्णय घेणारी संस्था म्हणून परिषदेचे स्थान निश्चित करता येईल. नियोजन आयोगाचे कार्य सतत चालणारे कार्य आहे, तर परिषदेचे कार्य वर्षभरात फार तर चार-पाच दिवस चालणारे कार्य आहे. त्यामुळे नियोजन आयोगाला सल्ला किती व कसा दिला जातो.आयोग त्या सल्ल्याचा पुर्ण स्वीकार करते का? अशा अनेक बाबी आहेत, त्यांची उत्तरे मिळणे कठीण आहे. परिषदेकडून साधारण स्वरूपात नियोजन आखून दिले जात असते. ज्यावर सविस्तर असे धोरणासंबधीचे नियोजन करण्याचे कार्य नियोजन आयोगाकडून पार पाडले जात होते. पण आता नियोजन आयोगाचे आस्तित्त्व संपुष्टात आले आहे. कारण नियोजन आयोगाचे स्वरूप व्यवहारात सर्वोच्च  मंत्रिमंडळ असे बनले होते तसेच पक्षपातीपणा केला जात होता. यामुळे २०१४ रोजी केंद्रात भाजपा प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार बनले. यानंतर १ जानेवारी २०१५ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने प्रस्ताव पारित केला आणि योजना आयोगाचे आस्तित्त्व समाप्त करून त्या ऐवजी एक नवीन संस्था नीती आयोग (NITI National Institution for Transforming India) ची स्थापना केली आणि ५ जानेवारी २०१५ रोजी त्याची नियुक्ती केली. राष्ट्रीय विकास परिषदेचा अभ्यास करावयाचा तर मागील नियोजन आयोगाचा उल्लेख करणे पर्याप्त ठरते, परंतु यापुढे त्या ऐवजी नीती आयोगाच्या भुमिका व कार्याच्या प्रभावावरच परिषदेच्या कार्याची दिशा ठरवली जाईल. मागील १९५० पासुनची ही व्यवस्था बदलण्यात आल्याने नव्याने निर्माण केलेली व्यवस्था भारताच्या नियोजनात काय भुमिका बजावते हे आपणांस दिसून येईल.

## ५.२.२ राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोग

राज्यघटना ही प्रत्येक देशाच्या आत्म्याप्रमाणे असून यात राष्ट्राचा इतिहास, लोकांच्या इच्छा आकांक्षा व तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव असतो. भारताची राज्यघटना २६ जानेवारी १९५० पासुन राबविण्यात आली. राज्यघटनेच्या निर्मितीसाठी घटना समितीची स्थापना करण्यात आली होती. देशातील सर्व भागातील भाषांचे राजकीय पक्षांचे वर्गाचे आणि धर्माचे प्रतिनिधी समाविष्ठ होते. घटना निर्मितीसाठी इतर देशातील राज्यघटनाचा अभ्यास करून चांगले वाईट याचा विचार करून आवश्यक त्या गोष्टी आपण घेतल्या, या सर्व परिस्थितीत भारताची घटना कशी संतुलित व उपयुक्त होईल हा प्रयत्न केल्याचे दिसते. या संबधी घटना परिषदेत आंबेडकरांनी म्हटले होते की, 'घटनेला आम्ही जितके स्थायी बनवता येते तेवढे बनवण्याचा प्रयत्न केला आहे' परंतु राज्यघटनेत स्थायित्त्व असु शकत नाही. यामध्ये काही मर्यादेपर्यंत परिवर्तनाला वाव असतोच. जर आपण अगदीच अपरिवर्तनीय व स्थायी बनवण्याचा प्रयत्न केला तर त्यामुळे राष्ट्राची प्रगती रोखण्याची शक्यता असेल. यावरून हे स्पष्ट होते की, बदलत्या परिस्थितीप्रमाणे राज्यघटनेतही बदल करणे अपेक्षित असते ही गोष्टी घटनाकारांना मान्य होती.

स्वातंत्र्याच्या साठ वर्षाच्या या प्रवासानंतरही भारतीय समाज अशा एका वळणावर पोहचला आहे की, जिथे आत्मविश्लेषण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मार्गदर्शनाची गरज आहे. भारताचे प्रथम राष्ट्रपती व घटनापरिषदेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी असे म्हटले होते की, राज्यघटना कितीही चांगली असली तरी ती लागू करणारे लोक जर खराब असतील तर राज्यघटना ही खराब आहे हे सिद्ध होऊ शकते. मागील ६० वर्षाच्या अनुभावावरून असे म्हणता येईल की आमच्या घटनेत काहीतरी कमतरता राहून गेली आहे किंवा आमची मानवीय क्षमता व मानसिकता त्या योग्य नाही की ज्यामुळे आम्ही राज्यघटनेतील गोष्टींचे पालन यशस्वीपणे करून शासन चालवू शकत नाहीत. त्रिशंकू संसद व विधानसभा, मूलभूत अधिकार विरूद्ध कर्तव्य, केंद्र राज्य सबंध, योजनेच्या संदर्भातील प्रश्न, नदी पाणी वाटप, लोकसेवा, कार्यपालिका, न्यायपालिका यामध्ये काहीना काही वाद विवाद समोर येत आहे. यामुळे असे म्हटले जाते की राज्यघटनेची समीक्षा करावी किंवा काही भागात तत्त्वात दुरूस्ती करण्यात यावी, काही विचारवंत संपूर्ण राज्यघटनेवर पुन्हा चर्चा केली जावी असे मानतात. या पार्श्वभूमीवरच राज्यघटना या पार्श्वभूमीवरच राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली होती.

या अगोदरही राज्यघटना दुरूस्ती संदर्भात मागणी करण्यात येत होती. पण या मागणीला १९९९ ला गती मिळाली. १३ व्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाप्रणीत रालोआ यांनी जाहीरनाम्यात याला स्थान दिले होते. यानंतर श्री. अटलबिहारी यांच्या नेतृत्त्वात केंद्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार बनल्यानंतर २२ फेब्रुवारी २००० रोजी माजी मुख्य न्यायधीश एम. एन. वैंकटचलैया यांच्या अधक्षतेखाली राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोग स्थापन केला. न्याय व कायदा विभागाद्वारे प्राप्त अधिसुचनेनुसार आयोगाची रचना अशी होती.

न्यायमुर्ती एम. एन. वैंकटचलैया हे अध्यक्ष तर इतर सदस्य न्या. बी. पी. जीवनरेड्डी, न्या. आर. एस. सरकारिया, न्या कोण्डापल्ली पुनैया, पी.ए.संगमा, सोली सोराबजी, सी. आर. ईरानी, सुभाष कश्यप, आबिद हुसैन, श्रीमती सुमित्रा कुलकर्णी, के. पारासरन हे होते. केंद्रिय कायदा मंत्रालयाचे सचिव रघुवीरसिंह यांना सचिव नियुक्त केले होते.

आयोगाच्या स्थापनेच्या वेळी असे उद्देश निश्चित केले की सध्याची राज्यघटना बदलून ती नव्याने लिहिणे किंवा तयार करणे हा उद्देश मुळीच नव्हता किंवा नाही हे स्पष्ट करण्यात आले तर आयोग मागील ५० वर्षातील अनुभवानुसार राज्यघटनेत झालेल्या दुरूस्त्या या काळात वाढलेल्या जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यघटनेने दिलेला प्रतिसाद यांचा विचार करता येवू शकतो. राज्यघटनेला संसदीय लोकशाहीच्या स्वरूपाच्या अंतर्गत दक्ष , प्रभावी आणि आधुनिक भारताच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या आवश्यकतेच्या अनुकुल कसे बनवता येईल. तसेच हे करत असताना मुलभुत आधारात कोणतीही छेडछाड न करताा घटनेत जे बदल करणे अपेक्षित आहे तेवढीच शिफारस करावी.

आयोगाने राज्यघटनेच्या समीक्षेकरिता सद्यकालीन महत्त्वाच्या अनेक क्षेत्राची निवड करून त्याचे विविध मापदंड ही निश्चित केले. यामध्ये इतर गोष्टीबरोबरच अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक, इत्यादीशी संबंधित घटनेतील तरतुदीना मजबुत करणे ही समाविष्ठ होते.

आयोगाच्या पहिल्या २३ मार्च २०००च्या बैठकीत आयोगाने काही महत्त्वाच्या क्षेत्राची निश्चीती केली. यामध्ये पक्षांतराची प्रवृत्ती, गरीबी निमुर्लनासाठी घटनेतील उपाय, कलम ३५६ चा वापर व राज्यपालांची नियुक्ती व बरखास्ती, सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी पंचायत राज संस्थाना सदृढ बनवणे, मूलभूत अधिकारांचा विस्तार करणे, मार्गदर्शक तत्त्वांची प्रभावी कार्यवाही मुलभुत कर्तव्ये आणि आर्थिक मौद्रिक धोरणाशी संबंधित विविध मुद्दे, इत्यादी.

आयोगाने आपल्या कार्यात सुविधा सुसुत्रता येण्यासाठी काही समित्या स्थापन केल्या होत्या त्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

| अनु क्र. | विषय | सह – अध्यक्ष |
|---|---|---|
| (०१) | निवडणूक सुधारणा | सुभाष कश्यप |
| (०२) | संसदीय लोकशाही व त्याची जबाबदारी | न्या. बी. पी.जीवन रेडडी |
| (०३) | सामाजिक आर्थिक परिवर्तन विकास आणि गरीबी निमूर्लन | न्या. के. पूनैया |
| (०४) | केंद्र – राज्य संबंध | न्या. आर. एस. सरकारिया |
| (०५) | मूलभूत अधिकाराचा विस्तार | सोली सोराबाजी |
| (०६) | पंचायत राज संस्थेचे दृढीकरण | पी. ए. संगमा |
| (०७) | मूलभूत कर्तव्यांची वृद्धी | सी. आई. ईराणी |

| | | |
|---|---|---|
| (०८) | मार्गदर्शक तत्त्वांना प्रभावी बनवणे | के. पारासरन |
| (०९) | मौद्रीक व राजकोषीय धोरणावर वैधानिक नियंत्रण | आबिद हुसैन |
| (१०) | साक्षरता, रोजगार, सामाजिक सुरक्षितता. | सुमित्रा कुलकर्णी |

**प्रत्येक समितीचे अध्यक्ष न्या. एम. एन. वैंकटचलैया हे होते.**

आयोगाने सामान्य नागरिक गैरसरकारी संघटना, संस्था आणि इतर घटकांकडून अभिप्राय, सुचना मागवल्या होत्या. या सर्वांचा विचार करून ३१ मार्च २००२ रोजी १९७६ पानाचा अहवाल तत्कालीन कायदा मंत्री अरूण जेटली यांना सोपवला.

**शिफारशी**

आयोगाने केलेल्या प्रमुख शिफारशी खालीलप्रमाणे सांगता येतील.

**(१) मुलभुत अधिकार**

(१) कलम १५,१६ यामध्ये जाती, सामजीक उत्पत्ती, संपत्ती, राजकीय व इतर आधारावर भेद केला जाऊ नये हे जोडावे.
(२) कलम १९(१)मध्ये अभिव्यक्ति स्वातंत्र्यात प्रेसचे स्वातंत्र्य व माहितीचा अधिकार यांना समाविष्ट करावे.
(३) न्यायालयाचा अपमान या संबधीत खटल्यात प्रभावीत व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जावी.
(४) प्रत्येक व्यक्तीला लवकरात लवकर न्याय मिळवण्याचा अधिकार असावा.
(५) १४ वर्षाखालील सर्व बालकांना निशुल्क व अनिवार्य शिक्षण प्राप्त करण्याचा अधिकार असावा.
(६) कलम ३०(ख) जोडून स्वच्छ पिण्याचे पाणी, प्रदुषण नियंत्रण, पर्यावरण संरक्षण याचाही अधिकार असायला हवा.
(७) कलम २१(ग) व्यक्तीला कौटुंबिक प्रतिष्ठा प्राप्त ग्रामीण भागात वर्षभरात किमान ८० दिवसाचा रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा.

**(२) मार्गदर्शक तत्त्वे**

(१) राज्याने अधिक अधिक व्यक्तींना रोजगारांच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.
(२) राज्यांनी आपल्या धोरणात कृषी उत्पन्नात सुधारणा, पशुधनाची सुरक्षा, भुमी व जल संरक्षण, लोकसंख्या नियंत्रण व धार्मिक सौदाई, इत्यादी संबंधी योजनेला स्थान द्यावे.
(३) दर पाच वर्षानी एक स्वतंत्र राष्ट्रीय शिक्षण आयोग स्थापित करावा.

**(३) मुलभुत कर्तव्य**

(१) निवडणुकीत मतदान करणे, कर चुकवेगिरी न करणे, मुलांच्या शारीरिक व नैतिक विकास तसेच कारखानदारांनी कर्मचाऱ्यांच्या मुलांना शिक्षण देणे, इत्यादी समाविष्ठ करावे.
(२) मुलभुत कर्तव्यांना प्रभावी बनवण्यासाठी जनतेत त्याप्रती जागरूकता व संवेदन शीलता उत्पन्न करावी अल्पसंख्यांकांच्या अधिकारांचा सन्मान करणे, इत्यादी गोष्टींचा समावेश करण्याची शिफ ारस केली.

**(४) कायदा व न्यायविषयक**

(१) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती करण्यासाठी एक राष्ट्रीय न्यायिक आयोगाची स्थापना करण्यात यावी.
(२) केंद्र व राज्य स्तरावर न्यायिक परिषदेची स्थापना व्हायला हवी.
(३) सरकारने सर्व न्यायालयांच्या मुलभूत संरचने संबंधीची पूर्तता करावी.
(४) सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या मधील सामान्य खटलांच्या अंतिम सुनावणी नंतर ९० दिवसांच्या आत निर्णय व्हायला हवा.
(५) न्यायालयांमधील अधिक काळ पडून असलेले खटले त्वरीत सोडवण्यासाठी उपाययोजना आखावी.
(६) मानवधिकार संरक्षण अधिनियम १९९३ मध्ये उपयुक्त संशोधन करून मानवधिकार न्यायालयांना अधिक शक्तिसंपन्न बनवले पाहिजे.

(७) जिल्हा पोलीस प्रशासनाची समीक्षा करून एकूण बंदिस्तांचे आकडे ठेवावेत.

(८) देशात डिजीटल कायदेविषयक सुचना व्यवस्था स्थापित करण्यात यावी.

## (५) कायदेमंडळाविषयी

(१) कायदेविषक बाबीत समन्वय साधण्यासाठी केंद्रीय कायदेविषयक समितीची स्थापना करण्यात यावी.

(२) आंतरराष्ट्रीय संघटना, संस्था संबंधी कंद्र सरकारद्वारे कलम २५३ ने करण्यात येणाऱ्या कराराच्या शक्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य कायदा बनवला जावा.

(३) संसद सदस्यत्त्व हे प्रतिष्ठेसाठीचा व्यवसाय नसून जनसेवेचे स्वरूप बनावे यानुसार सदस्यांचे वेतन भत्ते, इत्यादी सुविधा योग्य स्वरूपात बनवाव्यात.

(४) कलम १०५(२)मध्ये दुरूस्ती करून संसद सदस्यांना दिल्या जाणाऱ्या विशेषाधिकारांमध्ये सदस्यांनी केलेल्या भ्रष्ट व्यवहाराला स्थान असू नये.

(५) कायदेमंडळाने सदस्यांची पूर्ण उपस्थितीसाठी व्हिप लागू करावा.

(६) अविश्वास प्रस्ताव मांडण्यासाठी सभागृहातील कमीत कमी २० टक्के सदस्यांनी सुचना देण्याची अट असावी. या बरोबरच वैकल्पिक नेता ही निवडलेला असावा अशी तरतुद करावी.

(७) नियंत्रक व महालेखापरिक्षकांच्या कामकाजाचे परिक्षण बाहय संस्थेद्वारे करावे.

(८) केंद्र सरकार व राज्य सरकारांच्या मंत्रिमंडळातील सदस्यांची संख्या निश्चित करावी ही संख्या लोकसभा, विधानसभा यांच्या एकुण सदस्यांच्या १० टक्के असावी.

(९) पंतप्रधान व मुख्यमंत्री यांची निवड सभागृहातच करण्यात यावी.

## (६) राजकीय पक्षाबद्दल

(१) राजकीय पक्ष व पक्षांच्या आघाडी यांची नोंदणी व कार्यान्वयन यावर नियंत्रणासाठी एक व्यापक कायदा बनवण्याची आवश्यकता आहे.

(२) राजकीय पक्षाला भारताची राज्यघटना, सार्वभौमत्त्व या प्रती निष्ठा असायला हवी. तसेच पक्षासाठी आचारसंहिता असावी.

(३) दर तीन वर्षांनी पक्षात संघटनात्मक निवडणुका व्हाव्यात. संघटनात्मक व निवडणुकीसाठी महिलांना ३० टक्के स्थान देण्यात यावे अन्यथा पक्षाची मान्यता रद्द करण्यात यावी.

(४) कोणत्याही राजकीय पक्षांनी गुन्हेगारी पार्श्वभुमी असणाऱ्या व्यक्तीला समर्थन किंवा तिकीट देऊ नये. याचे उल्लघंन करणाऱ्या पक्षाची मान्यता रद्द करावी.

(५) छोटया व प्रादेशिक पक्षांच्या विस्ताराला रोखले पाहिजे.

(६) राजकीय पक्षाला मिळणारा निधी व निवडणुक खर्चाच्या नियंत्रणासाठी व्यापक कायद्याची आवश्यकता आहे. राजकीय पक्षाचे लेखापरिक्षण खाजगी कंपनी प्रमाणे करण्यात यावे.

## (७) निवडणुक व्यवस्था

(०१) संपूर्ण भारतात त्त्वरीत इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनचा प्रयोग करण्यात यावा.

(०२) एका व्यक्तीला एकाच वेळी एकापेक्षा जास्त मतदार संघातून निवडणुक लढवण्यास प्रतिबंध करण्यात यावा.

(०३) निवडणुक प्रचाराचा कालावधी कमी करण्यात यावा.

(०४) निवडणुक आचार संहितेला कायद्याचे रुप देण्यात यावे.

(०५) जनप्रतिनिधित्त्व अधिनियम, १९५१ नुसार निवडणुक आयोगाला निवडणुक अधिकारी, पर्यवेक्षक, नागरिक संस्था यांच्या तक्रारीवरून मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या संबधी निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात यावा.

(०६) जाती धर्माच्या नावावरून करण्यात येणारा निवडणुक प्रचारावरून शिक्षा करण्यात यावी.

(०७) गून्हेगारी पार्श्वभुमी असणाऱ्या व्यक्तीला निवडणुक लढवण्यास अयोग्य घोषित करण्यात यावे.

(०८) निवडणुकीतील गून्हेगारी मामले त्वरीत सोडवणुकीसाठी विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात यावी.

(०९) अपक्ष उमेदवारांना निवडणुक लढवण्यास अंकुश ठेवावा त्यासाठी अनामत रक्कम दुप्पट करावी.

(१०) सर्व निवडणुक लढवण्याऱ्या उमेदवारांनी सर्व प्रकारची शासकीय देणे पूर्ण केलेले असावे.

### (८) केंद्र – राज्य संबध

(१) आंतरराष्ट्रीय वाणिज्य व व्यापाराची आवश्यकता लक्षात घेवुन त्यास प्रोत्साहन देण्यासाठी संसदेद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापार व वाणिज्य आयोगाची स्थापना करण्यात यावी.

(२) नदी पाणी वाटप विवाद सोडवण्यासाठी १९५६ मधील नदीपाणी अधिनियम बदलून नवीन व्यापक कायदा बनवला जावा.

(३) राज्यपालाद्वारे एखाद्या विधेयकाला राष्ट्रपतीच्या संमतीसाठी पाठवण्यासाठी जास्तीत जास्त ६ महिने कालावधी असावा. राष्ट्रपतीला हे विधेयक मिळाल्यानंतर त्यावर स्वीकृती देण्यासाठी अधिकतम ३ महिने कालावधी ठरवण्यात यावा.

(४) ३५६ कलम कायम ठेवावे पण त्याचा उपयोग योग्य वेळी आणि कमीत कमी करावा.

### (९) स्थानिक स्वराज्य संस्था

(१) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसंबधी एक व्यापक कायदा करण्यात यावा.

(२) भारत निवडणुक आयोगाला राज्य निवडणुक आयोगाला मार्गदर्शन करण्यासंबधी अधिकार देण्यात यावा. तसेच राज्यनिवडणुक आयोगाने आपला वार्षिक अहवाल भारत निवडणुक आयोगाला सादर केला पाहिजे.

(३) नागरी स्थानिक संस्थांना योग्य अधिकार देण्यासंबंधी कलम २४३ मध्ये संशोधन करावे.

(४) सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाना राज्य सरकार व इतर आर्थिक संस्थाकडून उधार घेण्याची परवानगी पाहिजे.

(५) मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली एक राज्य पंचायत परिषदेची स्थापना करावी.

(६) पंचायतराज संस्थांना पूर्ण प्रशासकीय कर्मचारी यांच्यावर नियंत्रण, लेखापरिक्षणाचा अधिकार देण्यात यावा.

### (१०) लोकसेवा

(१) संयुक्त सचिव पातळीवरच्या सर्व पदावरील अधिकाऱ्यांची खुल्यापणे चौकशी करावी.

(२) कलम ३११ अशा प्रकारे दुरूस्त करण्यात यावे की यामुळे इमानदार लोकसेवकाला संरक्षण मिळावे पण भ्रष्ट अधिकाऱ्याला दंड पण व्हावा.

(३) विकास कार्यक्रमांची आर्थिक साधने, कृत्य व कर्मचारी प्रत्यक्ष लोकप्रतिनिधीच्या नियंत्रणात ठेवावेत.

(४) विकास कार्ये व योजनांना गतिशील बनवण्यासाठी राज्य व इतर गैरसरकारी संघटनात समन्वय स्थापित करावा.

(५) सरकारी कार्यात पारदर्शकता यावी यासाठी माहितीचा अधिकार देण्यात यावा.

(६) गोपनीयतेच्या शपथऐवजी पारदर्शकतेची शपथ देण्यात यावी.

(७) केंद्रीय पातळीवर लोकपाल राज्यस्तरावर लोकायूक्ताची नियुक्ती करण्यात यावी यात पंतप्रधानाला लोकपालाच्या कक्षेच्या बाहेर ठेवण्यात यावे.

(८) प्रत्येक सेवा देणाऱ्या विभाग किंवा प्राधिकरणाने नागरिक अधिकार पत्राचे प्रकाशन करावे.

### (११) समाजकल्याण

(१) अनुसुचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९ ला प्रभावीपणे लागु करावे.

(२) अल्पसंख्याक समुदायाच्या शिक्षणाचा स्तर सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

(३) पोलीस, अर्थ सैनिक बल, सेना इत्यादी मध्ये योग्य प्रतिनिधीत्त्व देण्यासाठी विशेष भरती अभियान चालवावे.

(४) श्रमिकांच्या हित व पुर्नवसनासाठी एका राष्ट्रीय प्रधिकरणांची स्थापना करावी.

वरील विविध क्षेत्रासंबधी आयोगाने अनेक महत्त्वपुर्ण शिफारसी केल्या आहेत. या व्यतिरिक्त आयोगाने पुर्वोत्तर राज्यांच्या समस्या संदर्भात विस्तृतपणे अहवालात मांडणी केली. आयोगाने १९७८–८० मध्ये मांडलेल्या श्रम विधेयकासंबंधी, केंद्रीय सतर्कता आयोग व राजकोषीय जवाबदेयता विधेयक हे पारित करण्याची शिफारस केली. राज्यघटना पुर्नर्विलोकन

राष्ट्रीय आयोगाने केलेल्या २४९ शिफारशी १९ केंद्रीय मंत्रालये, निवडणुक आयोग, राज्य सरकारे व विभिन्न अभिकरणाशी संबंधित आहेत. यांना कार्यान्वित करण्यासाठी ५८ घटनादुरूस्ता, ८६ अधिनियमाची आवश्यकता आहे. बाकी १०५ विषयांवर कार्यकारी मंडळाने निर्णय घ्यावेत आणि अंमलबजावणी करावी लागेल. यानुसार भारत सरकारने काही शिफारशीचा विचार करून घटनादुरूस्ती करून १४ वर्षाखालील मुलांना शिक्षणाचा अधिकार बनवला. तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार गारंटी अधिनियम बनवला आहे. ९९ व्या घटनादुरूस्ती ने राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. ९१ व्या घटनादुरूस्तीने २००३ मध्ये मंत्रिमंडळाची सदस्य संख्या सभागृहाच्या १५ टक्के असावी हे निश्चित केले. २००५ साली माहितीचा अधिकार देण्यात आला आहे. अशा प्रकारे आतापर्यंत आयोगाच्या शिफारशींच्या विचार करून सरकारने त्या आंमलात आणण्याचा प्रयत्न केला आहे.

## ५.२.३ केंद्रीय माहिती आयोग

केंद्रीय माहिती आयोगासंबंधी अध्ययन करावयाचे असल्यास भारत सरकारने बनवलेल्या माहितीचा अधिकार २००५ आणि त्यामागील पार्श्वभुमीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. अन्यथा आयोगाचा केवळ संरचानात्मक अभ्यासच होईल. कारण आयोगाच्या निर्मितीची पार्श्वभुमी ही या अधिकारात आहे. आज प्रशासनामध्ये पारदर्शकता आणणे, सामान्य नागरिकाला प्रशासनाकडून माहिती प्राप्त करून देणे यासाठी माहितीच्या अधिकाराची मागणी अनेक दिवसांपासून पुढे आली होती. लोकशाहीमध्ये सरकारची सुरक्षितता, प्रतिष्ठा ही बहुतांशपणे स्वच्छ व पारदर्शक प्रशासनावर अवलंबून असते. भारतीय राज्य घटनेमध्ये नागरीकांना विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. परंतु माहितीचा अधिकार यात सामिल होत नव्हता. तसे पाहिले तर माहिती शिवाय अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य काय कामाचे? आजचे युगतर माहिती तंत्रज्ञानाचे आहे. माहितीच्या अधिकाराचे वुड्रो विल्सन, जेम्स मेडिसन, लार्ड एक्टन हे विचारवंत प्रमुख समर्थक राहिलेले आहेत.

### (१) जागतिक पार्श्वभूमी

आज जगभरात ५० हुन अधिक देशात माहितीचा अधिकार देण्यात आलेला आहे. स्वीडन हा पहिला देश ज्यांनी प्रथमत: हा अधिकार १७६६मध्ये दिला. तशा प्रकारची तरतुद घटनेत करण्यात आली होती १९१९ला स्वीडनमधुन फिनलॅड हा देश वेगळा झाल्यास त्यांनी आपला स्वतंत्र कायदा बनवला.

खऱ्या अर्थाने संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासुन या संदर्भात गती मिळाली. आमसभेमध्ये ५९(१) प्रस्तावामध्ये माहितीच्या अधिकाराला मानवधिकार मानले होते. १९४८च्या आपल्या मानवधिकार घोषणापत्रात कलम १९ मध्ये विचार व अभिव्यक्तीचा अधिकारात माहितीच्या अधिकारास समाविष्ठ करण्यात आले. यावरून हे दिसते की कलम १९ माहितीच्या अधिकाराला प्राधान्य देते. या व्यतिरिक्त राष्ट्रमंडळ देशांच्या कायदा मंत्र्यांच्या संमेलनात बारबादोस (१९८०) येथे, १९९१ ला हरारे येथे या संदर्भात सहकार्य व्यक्त केले होते. अमेरिकी राज्यांचे संघटन, युरोपीयन युनियन, आफ्रिका, इत्यादींनीही सहकार्य व्यक्त केले. सन १९९४ मध्ये जागतिक बॅकद्वारे बनवण्यात आलेल्या 'Policy on the Disclosure of Information'. ने ही लोकशाही सरकारांवर दबाव आणला होता. अमेरिकेमध्ये या संदर्भात व्यापक व स्पष्ट कायदा १९६६ मध्ये बनवण्यात आला. स्वीडन ने जरी या संदर्भात प्रथम प्रयत्न केले असावे तरी स्पष्ट व व्यापक कायद्या बनवण्याचे श्रेय अमेरिकेला द्यावे लागेल. यानंतर फ्रांन्स ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्युझीलंड, इत्यादी देशात कायदे बनवण्यात आले.

### (२) भारतातील पार्श्वभूमी

भारतात १९७० च्या दशकापासुन या संदर्भात चर्चा सुरू झाली. यानंतर १९८२मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एस. पी. गुप्ता विरूद्ध भारत सरकार यांच्या केस संदर्भात म्हटले की, एखाद्या समाजाने लोकशाही व्यवस्था स्विकारली असेल तर त्यामधील लोकांना आपल्या सरकारच्याविषयी माहिती जाणून घेण्याचा अधिकार प्राप्त होतो. यापुढे जावून न्यायालयाचे असे म्हणणे होते की, राज्यघटनेतील कलम १९(१) मधील अभिव्यक्ती स्वातंत्र्यात माहिती जाणुन घेणे, प्राप्त करणे ही समाविष्ट आहे. अशाच प्रकारे काही निर्णय उच्च न्यायालयांनाही दिले. द्वितीय प्रेस आयोग १९७८-१९८२ नी ही शासकीय गुप्तता अधिनियमामधील ५ व्या कलमामध्ये बदल करुन त्यात माहितीचे स्वातंत्र्य देण्याची शिफारस केली होती. १९८९ मध्ये तत्कालीन पंतप्रधान वी. पी. सिंह यांनी स्वच्छ व पारदर्शक प्रशासनासाठी माहितीच्या अधिकाराला कायदेशीर स्वरूप देण्यास समर्थन दर्शविले होते.भारतात सामान्य व्यक्तीला प्रशासकीय कार्याची माहिती दिली जात नव्हती याचे कारण शासकीय गुप्तता अधिनियम, १९२३ (The Official Secrets Act) हे होते.

यानुसार देशाची एकता, अखंडता व सार्वभौमत्त्व यांच्या रक्षणासाठी प्रशासकीय धोरण व प्रक्रिया याची माहिती सामान्य नागरिकाला दिली नव्हती. परंतु व्यवहारात सामान्य नागरीकाला आवश्यक असणाऱ्या साधारण गोष्टी ज्या त्याच्या वैयक्तीक बाबींशी निगडीत आहेत. उदा. राशन कार्ड, जमिनीचे रेकार्ड, इत्यादी. यांची माहितीही लवकर दिली जात नाही ती देण्याने काय फरक पडणार आहे एकता अखंडतेला अशी स्थिती होती. अशा कोणत्या ना कोणता कायदा व नियमाचा आधार घेवून भारतीय नोकरशाही संकुचित प्रवृत्ती ठेवून कार्य करत राहिली. परंतु १९९१च्या आर्थिक सुधारणाने केवळ आर्थिकच नव्हे तर लोकप्रशासनावर ही याचा परिणाम होऊन पूर्णपणे कार्यप्रणालीवर प्रभाव पडला. प्रशासनात स्वायत्तता, उत्तरदायित्त्व, पारदर्शकता, इमानदारी व सुशासन या गाष्टीची मागणी होवू लागली. जुलै १९९० मध्ये न्या. आर. एस. सरकारीया यांच्या अध्यक्षतेखाली बनलेल्या प्रेस परिषदेने माहितीचा अधिकाराची शिफारस केली. मॅगसेसे पुरस्कार विजेती अरूणा रॉय व त्यांची संघटना मजुर शेतकरी शक्ति संघटना यांनी या संदर्भात १९९४ साली जनआंदोलन निर्माण केले.

काळाची मागणी ओळखुन १९९६च्या लोकसभा निवडणुकीत जवळजवळ सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या निवडणुक जाहिरनाम्यात माहितीच्या अधिकाराला स्थान देण्यात आले. या दरम्यान १७ एप्रिल १९९६ला राज्यपातळीवर माहितीचा अधिकार कायदा तामिळनाडु सरकारने बनवला. अण्णा हजारे यांनी महाराष्ट्रात या संदर्भात आंदोलन सुरू केले होते. सन १९९६ साली या अधिकाराची मागणी करणाऱ्या सर्व आंदोलक कार्यकत्यांनी माहिति अधिकारासाठी राष्ट्रीय अभियानाची स्थापना करून न्या. पी. बी. सावंत यांच्या अध्यक्षतेखाली माहितीचा अधिकार विधेयकाचा प्रस्तावित मसुदा तयार करून भारत सरकारकडे पाठविला. यावर सुधारणा सुचवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ता एच. डी. शौरी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी गटाची स्थापना केली. या गटाने आपला अहवाल तसेच प्रस्तावित विधेयकाचा मसुदा मे १९९७ रोजी सरकारला दिला. यामध्ये  देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाच्या ११ क्षेत्रा व्यतिरिक्त इतर सर्व विषयावर प्रशासनांकडून जनतेला माहिती देण्याची शिफारस केली. १९९७ला गोव्याच्या प्रतापसिंह राणे सरकारने हा अधिकार दिला. ३० जानेवारी १९९७ ला पाचव्या वेतन आयोगानेही हा अधिकार लागु करण्यात यावा अशी शिफारस केली होती. १९९८ मध्ये मध्यप्रदेश सरकारने पारित केलेल्या माहितीच्या अधिकारावर राष्ट्रपतीची मंजुरी मिळाली नाही.

भारतात कर्नाटक हे एकमेव असे राज्य होते की जेथे स्वातंत्र्य अधिनियम, १९८३च्या माध्यमातुन अनेक प्रकारची माहिती देण्याची व्यवस्था यात समाविष्ट होती. कर्नाटक सरकारने माहितीच्या अधिकार आंदोलनाच्या पार्श्वभुमीच्या दरम्यान १९९८ ला सिंचन विभागातील निविदा पद्धतीची माहिती जनतेला देण्यास सुरुवात केली. सन २००० मध्ये राजस्थान, कर्नाटक व महाराष्ट्रात तर २००१ मध्ये दिल्लीत माहितीचा अधिकार लागु करण्यात आला. यानंतर आसाम, केरळ, जम्मु कश्मीर, आंधप्रदेश येथे ही कायदा लागु केला गेला.

राष्ट्रीय पातळीवर वाजपेयीच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने एच. डी. शौरी यांच्या नेतृत्त्वातील गटाने दिलेल्या अहवालावर २५ जुलाई २००० रोजी माहितीच्या स्वातंत्र्याचे विधेयक , २००० प्रस्तुत करून गृहमंत्रालयाच्या स्थायी समितीकडे पाठविले. समितीने अभ्यासाअंती संसदेमध्ये प्रस्तुत केले तोच माहितीच्या स्वातंत्र्याचा अधिनियम, २००२ होय. परंतु या अधिनियमानुसार सामान्य जनता प्रशासनाकडे माहिती मागवू शकत होती. परंतु प्रशासनाला माहिती देणे बंधनकारक नव्हते. यामुळे देशभर या कायद्यावर टीका झाली, तीव्र नाराजी जनतेत निर्माण झाली. २००४ रोजी सत्तेत आलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने २३ डिसेंबर २००४ रोजी नवीन माहिती अधिकार विधेयक संसदेत प्रस्तुत केले. व्यापक प्रमाणात चर्चा घडून आल्यानंतर १४६ दुरूस्त्या करून ११ मे २००५ रोजी लोकसभेने स्विकृत केले. राज्यसभेने दुसऱ्याच दिवशी आपली स्वीकृती दिली. राष्ट्रपतीची संमती १५ जुन २००५ रोजी मिळाल्यानंतर त्याच दिवशी काही गोष्टी लागु केल्या तर बाकी १२० दिवसानंतर लागू होणार होत्या. अशाप्रकारे १२ ऑक्टोबर, २००५ रोजी हा कायदा संपूर्ण भारतभर जम्मु कश्मीर राज्य सोडून सर्वत्र लागू झाला.

माहितीचा अधिकार लागू करण्यामागे लोकसेवांची कार्यप्रणालीत पारदर्शकता व जबाबदारीचे तत्त्व आणणे, प्रशासनातील माहिती नागरिकांपर्यत पोहचवणे. यासाठी एका केंद्रीय माहिती आयोगाची स्थापन करुन त्यांच्याशी संबंधित विषयांची निश्चिती करण्याच्या उद्देशाने करण्यात आला होता.

## (३) केंद्रिय माहिती आयोगाची रचना

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या अध्याय तीनमध्ये एका केंद्रीय माहिती आयोगाची स्थापना करण्याचे नमुद केले आहे. केंद्रीय माहिती आयोगामध्ये एक मुख्य माहिती आयुक्त व जास्तीत जास्त १० केंद्रीय माहिती आयुक्ताची तरतुद करण्यात आली आहे. यांची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारे केली जाते. त्यासाठी  पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखालील समितीच्या सल्ल्याने होत असते. या समितीत लोकसभेचे विरोधी पक्षनेते, पंतप्रधानाद्वारे नियुक्त एक केंद्रीय कॅबिनेट मंत्री असतात. विरोधी पक्ष नेत्याची निवड झालेली नसेल तर विरोधी पक्षातील सर्वात मोठया पक्षाचा नेता समितीत सदस्य म्हणुन नेमला जातो.

मुख्य माहिती आयुक्त व इतर माहिती आयुक्त म्हणून सार्वजनिक क्षेत्रातील उत्कृष्ठ व्यक्तीची निवड केली जाते. ज्यांना कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान, समाजसेवा, पत्रकारिता, शासन व प्रशासन, इत्यादी क्षेत्रातील व्यापक ज्ञान व अनुभव आहे अशा व्यक्तीची निवड केली जाते. या पदावर निवड करण्यात येणाऱ्या व्यक्तीने इतरत्र कोणतेही लाभाचे पद धारण केलेले नसावे. या बरोबरच कोणत्याही राजकीय पक्षाचे सदस्यत्त्व असु नये.

आयोगाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे असेल परंतु आयोग केंद्र सरकारच्या पुर्व परवानगीने भारतात इतरत्र आपले कार्यालय स्थापन करू शकेल.

## (४) केंद्रिय माहिती आयोगाचा कार्यकाल व सेवाशर्ती

आयोगामध्ये कार्यरत मुख्य माहिती आयुक्त व इतर माहिती आयुक्त यांचा कालावधी ६५ वर्ष किंवा ५ वर्ष जी अगोदर पूर्ण होईल तोपर्यंत असतो. या पदावर दुसऱ्या वेळेस नियुक्ती केली जावु शकत नाही परंतु इतर माहिती आयुक्ताला मुख्य माहिती आयुक्त बनता येवू शकते. तरीही दोन्ही पदाचा एकुण कार्यकाल ५ वर्षापक्षा जास्त काळ तो व्यक्ती पदावर असु शकणार नाही.

मुख्य माहिती आयुक्त व इतर आयुक्तांना पद ग्रहण करण्याच्या अगोदर राष्ट्रपती किंवा त्यांच्याद्वारे नियुक्त व्यक्तीच्या समक्ष शपथ घ्यावी लागते व त्यावर आपली स्वाक्षरी करावी लागते. मुख्य माहिती आयुक्ताला देण्यात येणारे वेतन व भत्ते व सेवाशर्ती या मुख्य निवडणुक आयोगाला देण्यात येतात त्या प्रमाणेच असतात. तर इतर माहिती आयुक्ताला निवडणुक आयुक्ताप्रमाणे असतात.

त्यांच्या वेतन, भत्ते व सेवाशर्तीमध्ये नियुक्तीनंतर अहितकारी असे परिवर्तन करता येत नाही. आयुक्त राष्ट्रपतींना आपल्या पदाचा राजीनामा स्वइच्छेने कधीही देवू शकतो. राष्ट्रपती मुख्य माहिती आयुक्त इतर आयुक्तांना दुराचर व असमर्थता या आधारावर तेव्हाच हटवू शकतो. जेव्हा राष्ट्रपतीनी दिलेल्या आदेशानुसार सर्वोच्च न्यायालयाने पडताळणी करून दोषी सिद्ध झाल्यास आयुक्ताला हटवण्याचा अहवाल दिला असेल. या व्यतिरिक्त राष्ट्रपती आयुक्तांना खालील आधारावर पदावरून हटवू शकतो.

(१) तो दिवाळखोर आहे हे सिद्ध झाल्यास.

(२) कार्यकाळात इतर लाभाचे पद धारण केल्यास.

(३) राष्ट्रपतींच्या मते तो मानसिक व शारीरिक अक्षमतेच्या कारणामुळे पदावर राहण्यास अयोग्य आहे.

(४) या पदावर असताना पदावर प्रतिकुल प्रभाव पडेल अशी आर्थिक व इतर हितावह गोष्ट प्राप्त केली असेल.

## (५) केंद्रिय माहिती आयोगाचे कार्य व अधिकार

खालील कार्य आयोगाद्वारे केली जातात.

(१) माहिती अधिनियमांच्या अधीन राहून खालीलपैकी अशा व्यक्तीच्याद्वारे तक्रारी प्राप्त करून त्याची तपास करणे.

  (अ) माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती झालेली नसेल आणि सहाय्यक माहिती अधिकाऱ्याने अर्ज किंवा अपील घेण्यास नकार दिला असल्यास.

  (ब) मागवलेली माहिती देण्यास नकार दिला असेल. परंतु कायद्यानुसार ती देणे योग्य असेल.

  (क) अधिनियमानुसार निर्धारित वेळेत माहिती दिली नसल्यास.

  (ड) ज्याकडुन अशा प्रकारे शुल्काची मागणी केली असेल की ती अयोग्य असेल.

  (इ) अधिनियमानुसार एखाद्याला अपूर्ण, संभ्रम निर्माण करणारी व चुकीची माहिती दिली असेल.

(२) आयोगाला अशी खात्री पटली असेल की, एखाद्या प्रकरणाचा तपास करण्याची आवश्यकता आहे तर त्या संदर्भात आयोग तपास सुरू करू शकते.

(३) आयोगाला एखाद्या विवादासंबंधी विचारणा करण्यासाठी दिवाणी प्रकिख्या संहिता, १९०८ यांच्या अंतर्गत दिवाणी न्यायालयाप्रमाणे अधिकार प्राप्त असेल. यामध्ये

  (अ) एखाद्या व्यक्तीला बोलावून लिखीत, मौखीक साक्ष घेणे.

  (ब) शपथपत्रावर साक्ष देणे.

  (क) न्यायालय, कार्यालयातील सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मिळवणे.

(ड) एखाद्या कागदपत्रांची पडताळणी किंवा ते सादर करायला लावणे.

(४) या अधिनियमाच्या अधीन एखाद्या तक्रारीचा तपास करताना आयोग अशा अभिलेखाचे परीक्षण करू शकेल की ज्यांना हा अधिनियम लागू असेल आणि माहिती अधिकाऱ्याच्या नियत्रंणात असेल संसद विधानमंडळ किंवा एखादा कायदा आयोगाला असे करण्यापासून रोखू शकत नाही.

(५) आयोगाचे निर्णय हे बंधनकारक असतील.

(६) एखाद्या व्यक्तीला माहिती देण्यास विलंब केल्यास किंवा दिलेली माहिती बाबत तो असंतुष्ट असल्यास त्या सार्वजनिक कार्यालयातील अपीलीय अधिकाऱ्याकडे तो अपील करू शकतो. यानंतरही ९० दिवसाच्या आत दुसरी अपील आयोगाकडे करू शकतो. आयोग त्यावर निर्णय देते.

(७) आयोग माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास नकार दिल्यास शिस्तभंगाची कारवायी करू शकते. तसेच २५,००० पर्यत दंडही लावु शकते.

(८) निर्णया संदर्भात आयोगाला काही अधिकार प्राप्त आहेत.

अशा प्रकारे आयोगाला अधिकार देण्यात आली आहे. या माध्यमातून आयोग आपल्यावर सोपवलेली जबाबदारी स्वतंत्रपणे पार पाडू शकते. आयोगाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यात आल्याने आयोग निपक्षपातीपणे कार्य करू शकते. प्रशासनावर सर्वसामान्य व्यक्तींचा विश्वास वाढवण्याचे कार्य यामधुन होत आहे. नोकरशाही मधील भ्रष्टाचारी, शोषण, अत्याचार, भेदभाव, अन्याय करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर यामुळे दबाव राहणार आहे. यातून प्रशासनात लोकसहभाग वाढणार आहे. प्रशासकीय व्यवस्थेत होणारा सत्तेचा दुरूपयोग कमी होऊन प्रशासन उत्तरदायी, पारदर्शक बनवण्यासाठी हे अधिकरण महत्त्वाची भुमिका बजावेल.

या आयोगापुढे काही आव्हाने ही असतील माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याचे एक प्रमुख साधन म्हणून काम करावे लागणार आहे. आपल्या देशात कायदे अनेक होतात पण योग्य वापर होत नाही. हा कायदा तर सर्वांच्या सहकार्याने सहभागाने वापरात येणारा आहे. देशातील निरक्षर लोकसंख्या, राष्ट्रभक्तीचा अभाव, कायद्याचा गैरवापर करण्याची प्रवृत्ती यामुळे आयोगाला यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे. तर निर्भिडपणे लोकसहभाग वाढेल.

### *स्वंय-अध्ययनासाठी प्रश्न*

**रिकाम्या जागा भरा.**

(१) ........................ रोजी राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना करण्यात आली.

(२) केंद्रिय माहिती आयोगाचे मुख्य माहिती आयुक्त आपल्या पदाचा राजीनामा............कडे सादर करतात.

(३) २२ फेब्रुवारी २००० रोजी....................यांच्या अध्यक्षतेखाली राज्यघटना पुनर्विलोकन आयोग स्थापन करण्यात आला.

(४) निती आयोगाचे अध्यक्ष..............असतात.

(५) केंद्रिय माहिती आयोगाचे मुख्य माहिती आयुक्त व इतर माहिती आयुक्त यांच्या पदाचा कालावधी........ वर्ष इतका असतो.

## ५.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**नीती आयोग :** भारत सरकारच्या धोरणाबाबत विचारमंथन करणारी प्रमूख संस्था.

**पुनर्विलोकन :** समिक्षा करणे.

**आमसभा :** संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यक्षेत्रातील विषयावर चर्चा करण्यासाठी सदस्य राष्ट्राची बोलावलेली सभा.

## ५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) ६ ऑगस्ट १९५२

(२) राष्ट्रपती

(३) न्या. एम. एन. वैंकटचलैया

(४) पंतप्रधान

(५) पाच

## ५.५ सारांश

भारतात नियोजित विकासासाठी योजना आयोगाची निर्मिती केली होती. यावेळी असा विचार पुढे आला की केंद्रीय पातळीवर योजना निर्मिती राज्यांचीही भुमिका असावी. यानुसार केंद्रीय स्तरावर राष्ट्रीय विकास परिषदेची निर्मिती करण्यात आली. पंतप्रधान हे अध्यक्ष तर राज्याचे मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्रिमंडळातील कॅबिनेटमंत्री यांना सदस्यत्त्व दिले. राष्ट्रीय योजना निर्मितीसाठी राष्ट्रातील संसाधनाचा योग्य वापर करून विकासाला गती देण्याचा प्रयत्न या माध्यमातून व्हावा हे उद्देश समोर ठेवुन परिषदेने कार्य केले आहे. योजना आयोगाची सहायकारी संस्था म्हणून कार्य करण्यात आले. परंतु भारतातील एकपक्षीय वर्चस्वामुळे १९६७ पर्यंत फारसे कार्य होवू शकते नाही. बदलत्या राजकीय समीकरणामुळे यांच्या कार्यावरही परिणाम झाला. २०१४ साली नव्या सरकारने २०१५ साली योजना आयोगाच्या ऐवजी नीती (NITI) आयोगाची स्थापना केली असल्याने यापुढे योजना आयोगाची जागा नीती आयोगाने घेतली आहे.

भारतीय राज्यघटना निमिर्तीसाठी घटना समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीत सर्व प्रांत, भाषा, धर्माचे व पक्षाचे लोक सहभागी झाले होते. भारताच्या परिस्थितीनुरूप व सद्यकालीन परिस्थितीच्या अनुकुल घटना बनवण्यात आली. इतर देशांच्या घटनेकडून ही काही गोष्टी स्वीकारल्या तर काहीत आपल्या परिस्थितीनुरूप बदल केले. यासर्व प्रकारे राज्यघटना ही संतुलित, उपयुक्त बनवण्याचा प्रयत्न केला. तरीही राज्यघटना ही बदलत्या काळानुरूप असायला हवी. २६ जानेवारी १९५० पासून २०००पर्यंत म्हणजे मागील ५० वर्ष या घटनेनुसार देशाचा कारभार चालवला गेला. या ५० वर्षात घटनेतील काही त्रुटी किंवा उणिवा असतील किंवा बदलत्या काळानुरूप तिच्यात बदल करावेत हा विचार पुढे आला. काहींना पुर्ण राज्यघटनेचेच पुनर्विलोकन करावे असे वाटु लागले. यातुन वाजपेयी यांच्या नेतृत्त्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने या विचाराला गती दिली. यावर अनेक पक्ष संस्था, संघटना यांच्याद्वारे तीव्र विरोध झाला. तसे पाहिले तर या अगोदरही अनेक घटनादुरूस्त्या झाल्या होत्या तसेच स्वर्ण सिंह समिती स्थापन करण्यात आली होती तेव्हा फारसा विरोध झाला नाही. मात्र भाजपच्या विचाराला हा विरोध होता अविश्वास होता तसेच काहींच्या राजकीय हिताचा भाग होता असे दिसुन येते. कारण आयोगाने घटनेच्या चौकटीला तडा जावू न देता संसदीय लोकशाहीच्या अंतर्गत आवश्यक त्या महत्त्वपुर्ण शिफारशी १९ मंत्रालयाशी, निवडणुक आयोग, राज्य सरकारे व विविध अभिकरणाशी संबंधित शिफारशी सुचवल्या या लागु करण्यासाठी ५८ घटनादुरूस्त्या, ८६ अधिनियमाची, १०५ विषयांवर कार्यकारी मंडळाने निर्णय घ्यावेत आणि अंमलबजावणी करावी लागेल. यानुसार सरकारने काही शिफारशींची अंमलबजावणी केली. परंतु पूर्णत: आयोगाच्या शिफारशी स्वीकारणे अशक्य आहे यासाठी खूप कालावधी लागेल तसेच अनेक प्रयत्न करावे लागतील. या समिती सारख्या सरकारी या आयोग वगैर समित्यांच्या शिफारशीच धुळखात पडल्या आहेत. तेव्हा यांच्या शिफारशीचे काय होणार ही शंका आहे. परंतु आयोग स्थापनेवर जेवढी टीका आणि विरोध झाला होता हे पाहता आयोगाने चांगल्या शिफारशी केल्या होत्या हे मात्र नाकारता येत नाही.

भारतातील केंद्र स्तरावरचा केंद्रीय माहिती आयोग हे एक अलीकडच्या काळातील नवीन अभिकरण होय. जागतिकीकरणानंतर सुशासनासाठी जो दबाव वाढला त्याचा हा परिणाम म्हणावा लागेल. त्याचा अभ्यास करावयाचा तर ज्या माहितीच्या अधिकार कायदा, २००५च्यामुळे ही संस्था निर्माण झाली त्याचा अभ्यास करावा लागतो. जगभरामध्ये अशा प्रकारचे कायदे प्रशासनाच्या पारदर्शकतेसाठी जबाबदारीसाठी आणि जनतेच्या हक्कासाठी निर्माण झाले. याचा परिणाम भारतातही झाला. जागतिकीकरणाचा परिणाम तसेच जागतिक बँक, विश्व व्यापार संघटना, इत्यादींचा वाढता दबाव आणि विविध प्रदेशात या संदर्भात देशात सुरू झालेली आंदोलने या परिस्थितीमुळे सुरूवातीला विविध राज्यांनी राज्य पातळीवर हा कायदा लागु केला. पुढे केंद्रातही याची

मागणी वाढल्याने सुरूवातीला २००२ मध्ये वाजपेयी सरकारने कायदा पारित केला परंतु माहिती देणे प्रशासनावर बंधनकारक नव्हते केवळ जनता माहिती विचारू शकत होती. यामुळे यावर खुप टीका झाली आणि २००४ साली सत्तेवर आलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडी (युपीए) सरकारने २००५ साली नव्याने कायदा पारित केला. यामध्ये केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोगाची स्थापना करण्याची तरतुद केली. आयोगाचे स्वातंत्र्यठेवण्याचे प्रयत्न त्यामध्ये केला आहे तसेच भ'ष्टाचार रोखणे जनतेला आवश्यक ती माहिती पुरवणे हे लोकशाहीचे मुल्य आहे या हेतुने आयोग काम करत आहे. काही प्रमाणात आयोगाच्या कार्यात किंवा एकुणच माहिती अधिकार कायद्याचा दुरूपयोग होताना दिसतो प्रशासनातही निर्णय घेण्यावर मर्यादा येतायत पण काही काळानंतर परिस्थिती बदलेल अशी आशा आपण बाळगू शकतो.

## ५.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) राष्ट्रीय विकास परिषदेची रचना सांगा.

(२) राष्ट्रीय विकास परिषदेचे उद्देश व कार्ये स्पष्ट करा.

(३) राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोगाच्या निर्मितीविषयी माहिती लिहा.

(४) राज्यघटना पुनर्विलोकन राष्ट्रीय आयोगाने सुचविलेल्या विविध शिफारशी सांगा.

(५) माहिती अधिकार कायद्याच्या निर्मितीची पार्श्वभुमी सांगा.

(६) केंद्रीय माहिती आयोगाची रचना व कार्ये लिहा.

## ५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) Basu, D., (2002). Introduction to the constitution of India, 23 Edition.

(२) कटारिया, एस. (२००८). *भारतीय लोकप्रशासन.* नवी दिल्ली, नॅशनल पब्लिकेशन हाऊस.

(३) भोळे, भा. ल. (२०१०). *भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण.* नागपूर, पिंपळापुरे बुक्स डिस्ट्रीब्युटर्स.

(४) जोशी, एस. (२०१२). *भारतीय शासन व राजकारण.* औरंगाबाद, विद्या बुक पब्लिकेशर्स.

(५) सिंघवी, एल. (२००७). *भारत का संविधान.* नई दिल्ली २००७, प्रभात प्रकाशन.

(६) फडिया, बी. एल. (२०१२). *भारतीय शासन एवं राजनीती.* आगरा, साहित्य भवन पब्लीकेशन.

# घटक ६ : संवैधानिक व वैधानिक मंडळाची उपयोगिता आणि मर्यादा

*अनुक्रमणिका*

६.0 उद्दिष्टे
६.१ प्रास्ताविक
६.२ विषय-विवेचन
 ६.२.१ संवैधानिक मंडळाची उपयोगिता
 ६.२.२ संवैधानिक मंडळाच्या मर्यादा
 ६.२.३ वैधानिक मंडळांची उपयुक्तता
 ६.२.४ वैधानिक मंडळांची मर्यादा
६.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
६.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
६.५ सारांश
६.६ सरावासाठी स्वाध्याय
६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ६.0 उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यास आपल्याला-

- संवैधानिक मंडळांची उपयुक्तता कशाप्रकारे आहे याची माहिति मिळेल.
- संवैधानिक मंडळांच्या मर्यादा स्पष्ट करता येईल.
- वैधानिक मंडळांची उपयुक्तता सांगता येईल.
- वैधानिक मंडळांच्या मर्यादा सांगता येतील.

## ६.१ प्रास्ताविक

या घटकामध्ये संवैधानिक मंडळ आणि वैधानिक मंडळांच्या उपयुक्तता व मर्यादा यांच्यासंबंधी अध्ययन करण्यात आले आहे.

संवैधानिक मंडळामध्ये भारताचा महान्यायवादी, नियंत्रक व महालेखापरीक्षक, केंद्रिय लोकसेवा आयोग, भारत निवडणुक आयोग, राष्ट्रीय अनुसुचित जाती व जमाती आयोग, इतर मागासवर्गीय आयोग, वित्त आयोग यांच्या उपयुक्ततेचा आढावा घेतला तसेच या संस्था यशस्वीपणे कार्य करत असल्यातरी त्यांच्या काही उणीवा, मर्यादा आहेत त्यांचाही आढावा घेण्यात आला आहे. घटक २, ३ मध्ये या मंडळाची सखोल माहिती आपण घेतली आहेच पण या घटकात केवळ उपयुक्तता व मर्यादा संदर्भातच चर्चा केली आहे.

वैधानिक मंडळात राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राज्य मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय महिला आयोग, राष्ट्रीय विकास परिषद, केंद्रिय माहिती आयोग, राज्यघटना पुनर्विलोकन आयोग यांच्या उपयुक्तता व मर्यादा यावर चर्चा केली आहे. या

मंडळांचा सविस्तर अभ्यास घटक ४, ५ यामध्ये केलेला आहे. या घटकात केवळ उपयुक्तता व मर्यादा यावरचर्चा केली आहे. याबरोबरच राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग, राष्ट्रीय बालक हक्क आयोग यांचाही उल्लेख यामध्ये करण्यात आला आहे.

## ६.२ विषय–विवेचन

### ६.२.१ संवैधानिक मंडळाची उपयोगिता

भारतीय राज्यव्यवस्था ही संसदीय लोकशाही स्वरुपाची आहे. दीर्घकाळ ब्रिटींशांची वसाहत राहिल्याने त्यांच्या राज्यव्यवस्थेचा परिणाम भारतीय राज्यव्यवस्थेवर झालेला आहे. वसाहतिक काळात इंग्रजांनी या व्यवस्थेचे बीजारोपन केले आहे असे म्हणता येईल. काही संवैधानिक संस्था या देशाच्या स्वातंत्र्याच्या पुर्वीही ब्रिटीश काळात कार्यरत होत्या. त्यातच काही बदल बदलत्या परिस्थितीनुरूप करून राज्यघटनेत त्यांना स्थान देण्यात आल्याचे दिसते. तसेच अनेक नवीन संस्थांचा समावेश करण्यात आला. शासनव्यवस्थेचे कल्याणकारी स्वरुप आणि जनतेच्या शासनाकडून वाढत्या अपेक्षा. यामुळे केवळ केंद्र व राज्य सरकार या व्यतिरिक्त विकासाला सहाय्यक संस्थांची निर्मिती करण्यात आली. देशात स्वीकारलेली संसदीय लोकशाही, संघराज्य, समाजाचे बहुसांस्कृतीक स्वरुप या कारणाने संवैधानिक मंडळाची उपयुक्तता वाढली.

देशात अस्तित्वात असणारी विविध संवैधानिक मंडळे ही कशी उपयुक्त आहेत याचा आढावा आपणास खालीलप्रमाणे घेता येईल.

(अ) भारताचा महान्यायवादी हा भारत सरकारचा प्रथम कायदेविषयक अधिकारी आहे. केंद्र सरकारला आपले कार्य हे कायदेशीर चौकटीत राहुनच पूर्ण करावे लागते. मात्र शासनात निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना कायदयाचे संपूर्ण ज्ञान असेलच असे नाही. तेव्हा सरकारला विविध कायदेविषयक बाबीत सल्ला देण्याचे कार्य करण्यासाठी या पदाची निर्मिती केलेली आहे. महान्यायवादी हा केंद्र सरकारच्या वतीने न्यायालयात खटले चालवतो. सरकारचा वकील या नात्याने भारत सरकारचा संबंध असलेल्या खटल्या संदर्भात सरकारची बाजू मांडण्याचे कार्य उच्च व सर्वोच्च न्यायालयात तो करत असतो.

संसदेच्या दोन्ही सभागृहाला कायदेविषयक माहिती देण्याचे कार्य केले जाते. तसेच संसदेच्या बाजूने न्यायालयात कायदेविषयक बाबी मांडण्याचे कार्यही केले जाते. संसदेचे सदस्यत्व नसतांना म्हणूनच तर कामकाजात सहभाग घेण्याचा अधिकार महान्यायवादीला असतो. संसदेच्या कामकाजाची माहिती त्यांना दिली जाते. कायदा मंत्र्यांना कायदेविषयक माहितीसाठी यांची मदत होते. कायदा निर्मितीसाठी या माहितीचा लाभ होतो. राष्ट्रपती वेळोवेळी कायदेविषयक सल्ला महान्यायवादीला मागतात तो देण्याचेही कार्य केले जाते. वरील सर्व कार्य करण्यास महान्यायवादीला दोन सॉलिसिटर व ४ अतिरिक्त सॉलिसिटर जनरलची मदत असते.

वरील कायदेविषयक कार्य महान्यायवादीकडून पार पाडली जातात म्हणूनच प्रथम कायदेविषयक अधिकारी म्हटले जाते. सरकारला महत्त्वपूर्ण कायदा देण्याचे कार्य करणारे हे पद गरजेचे आहे काय यावर खूप चर्चा झाली. कायदामंत्री असतांना हे पद कशासाठी हवे मात्र कायदामंत्री राजकीय व्यक्ती असतात. त्यामुळे घटनेचे स्वातंत्र्य, मुलभूत अधिकारांचे संरक्षण, निपक्षणतीपणे व निर्भीडपणे करतांना त्यांना अडचणी येवु शकतात. मात्र महान्यायवादी हे निपक्ष, निर्भीडपणे कायदेविषयक सल्ला देवु शकतात. म्हणून ही दोन्ही पदे कायम ठेवण्यात आली आहेत. महान्यायवादी हा कायदेविषयक बाबीसाठी उपयुक्त पद आहे हे आपणास यावरुन दिसून येते.

(ब) नियंत्रक व महालेखापरिक्षक या महत्त्वाच्या घटनात्मक संस्थेद्वारे संपूर्ण देशाच्या जमा खर्चाचा तपशील तपासला जातो. केंद्र व राज्यांच्याही आर्थिक व्यवहारावर तो नियंत्रण ठेवतो. कलम १४९ मध्ये त्याची कार्य, जबाबदारी नमुद करण्यात आली आहे. तसेच १९७१ मध्ये नियंत्रक व महालेखापरीक्षकाच्या कर्तव्यासंबंधी अधिनियम पारित करून तो १९७६ साली संशोधित केला त्यानुसार तो आपले कार्य पार पाडतो. सार्वजनिक खर्चाचे लेखापरिक्षण करणे, केंद्राने राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना एकत्रित निधीतून जो पैसा दिला जातो त्याचा खर्च तपासून पाहणे, केंद्र व राज्याच्या अखत्यारीतील संस्थांनी केलेले उत्पादन, वितरण, त्यातील नफा–तोटा, शिल्लक तपासणे, केंद्राने राज्याने काढलेले कर्ज, जमा, घेतलेले अनुदान, खर्च या सर्वांचे लेखापरिक्षण केले जाते. काही सरकारी कंपन्या आहेत त्यांचे ही लेखापरिक्षण केले जाते. या सर्वांचा अहवाल राष्ट्रपतीकडे सादर केला जातो. राष्ट्रपती तो अहवाल चर्चा करण्यासाठी संसदेपुढे सादर करतात. लोकलेखा समितीशी समन्वय साधून आर्थिक बाबी संदर्भात मार्गदर्शन केले जाते.

या बरोबरच आर्थिक अनियमिततेवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य केले जाते. यामुळेच तर अनेक संस्था विभाग खर्च नियमानुसार करतात. कॅगने आपल्या अहवालामधून अनेक आर्थिक गैरव्यवहाराची प्रकरणे पुढे आणलेली आहेत. माजी कॅग विनोद रॉय यांनी याबाबतीत खुप महत्त्वाचे कार्य अलीकडच्या काळात केल्याचे आपणास सांगता येईल. यापुर्वीही या संस्थेद्वारे मौलिक कार्य झालेले आहे म्हणूनच तर घटनाकारांनी वित्तीय व्यवस्था व अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या उददेशानेच हे पद निर्माण केलेले आहे. विना प्रक्रिया खर्च करता येवू नये व कोणीही पैशाचा अपव्यय करु नये हे पाहण्याची जबाबदारी यांच्यावर सोपवलेली आहे. थोडक्यात अर्थ व्यवस्थेचे संरक्षण करण्याची जबाबदारीच यांच्यावर सोपवलेली आहे. यावरुन या पदाची उपयुक्तता आपणास स्पष्ट करता येते.

(क) निवडणुक आयोग या घटनात्मक संस्थेची उपयुक्तता आपणाला पुढीलप्रमाणे सांगता येईल. सार्वजनिक निवडणुका काटेकोरपणे आणि कार्यक्षमतेने पार पडल्या नाहीत तर नुसत्या सार्वजनिक यंत्रणाच कुचकामी ठरत नाहीत तर संपुर्ण लोकशाही व्यवस्थाच संकटात सापडते. यावरुन लोकशाहीसाठी निवडणुकांचे असलेले महत्त्व स्पष्ट होते. नागरिकांमध्ये सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची भावना आणि राज्यव्यवस्थेबद्दलची आत्मीयता निर्माण करण्याचे एक प्रभावी माध्यम निवडणुका हे असते. निवडणुकांमधून लोक सरकारांची निर्मिती करतात तसेच शांततामय मार्गांनी व सुव्यवस्थितपणे सत्तांतर घडवून आणले जाते. त्यामुळे निवडणुका या प्रतिनिधीक सरकारची आधारशिळा असते. म्हणून निवडणुका प्रत्यक्षात कशा क्रियान्वित होतात, किती कार्यक्षमपणे व निपक्षपातीपणे काम केले जाते. यातील प्रमुख किती प्रामाणिक व राजकीय पुर्वग्रहापासून आणि दडपणापासून मुक्त राहतात यावरच देशाच्या लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते. आपल्या निवडणुक व्यवस्थेवर लोकांचा विश्वास नसेल तर तो निकालांवरही असणार नाही, म्हणजेच संपुर्ण लोकशाही प्रक्रियांकडेच लोकांचा समज चुकीचा होईल. यासाठी निष्पक्ष व कार्यक्षम निवडणुक यंत्रणेची गरज असते. हे सर्व करावयाचे असेल तर निवडणुक यंत्रणा सरकारच्या हस्तक्षेपापासून व नियंत्रणापासून मुक्त असली पाहिजे. भारतीय घटनाकारांना याची जाणीव होती. म्हणूनच निवडणुकांसाठी स्वतंत्र आयोगाची निर्मिती केली. जगातील सर्वाधिक मोठया लोकशाहीतील निवडणुका घेण्याचे कार्य हे किती जटील आहे. त्यात भारताची लोकसंख्या, क्षेत्रफळ, निरक्षरता आणि सर्वच प्रकारची विविधता यामुळे ती किती गुंतागुंतीची आहे. हे कार्य पार पाडण्याचे कार्य आयोग गेल्या ६० वर्षाहून अधिक काळ करत आले आहे. ७० कोटीहून अधिक मतदार, संसद व राज्य विधानसभांचे मिळून पाच हजार प्रतिनिधी प्रत्येक निवडणुकीत निवडले जातात. हा कार्याचा व्याप बघितला तर आयोगाची उपयुक्तता व महत्त्व किती आहे याची कल्पना आपणास येईल. मतदार नोंदणी पासून ते निवडणुक निकालापर्यंत अनेक प्रकारची कार्ये आयोग करत असते. आयोगाने गेल्या साठ वर्षाच्या अनुभवावरुन आपल्या कार्यात, भुमिकेत बदलत्या काळाप्रमाणे सुधारणा करून ज्या उणीवा आहेत त्या कमी करण्याचा प्रयत्न केला आहे आणि प्रभावी कार्य केले आहे. यावरून आपणास निवडणुक आयोगाची उपयुक्तता स्पष्ट होते.

(ड) केंद्रिय लोकसेवा आयोग ही एक घटनात्मक संस्था आहे. भारताच्या घटनाकारांना नोकरशाहीच्या महत्त्वाची जाणीव होती. वासाहतिक राजवटीचा अंत होउन त्याजागी लोकशाही, धर्मनिरपेक्ष, सामाजिक न्यायावर आधारीत कल्याणकारी राज्याचा आदर्श पुढे ठेवणारे संविधान तयार करतांना त्यामुळेच घटनेत त्यांनी आवर्जून स्वतंत्र, निष्पक्ष, कार्यक्षम लोकसेवा आयोगाचा अंतर्भाव केला. देशाचा विकास करण्याची राज्यकर्त्यांची कितीही इच्छा असली तरीही कार्यक्षम नोकरशाहीचा अभाव असेल तर शासन कधीच प्रगती करु शकणार नाही. यासाठी ही जबाबदारी पार पाडायची असेल तर कार्यक्षम, प्रशिक्षित व कुशल अशा सनदी नोकरांची आवश्यकता असते. अशा नोकरांची भरती करण्यासाठी त्यांची निवड करणारी यंत्रणा ही निपक्ष असली पाहिजे. बहुतांश सर्वच लोकशाही राष्ट्रांमध्ये लोकसेवा आयोगाची योजना केली जात असते. त्याप्रमाणे भारतातही केंद्रिय लोकसेवा आयोगाची व्यवस्था करण्यात आली. आयोग नोकर भरतीचे कार्ये कार्यक्षमपणे पूर्ण करतांना दिसत आहे. यावरुन आपणास स्पष्ट करता येते की, केंद्रिय लोकसेवा आयोग हा नोकरभरतीसाठीची एक आवश्यक यंत्रणा असून ती खूप महत्त्वाची आहे.

(इ) राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, राष्ट्रीय इतर मागासवर्गीय आयोग हे तिन्ही आयोग घटनात्मक आहेत. देशात लोकशाहीची स्थापना करण्यात आली. परंतु राजकीय लोकशाही प्रभावी बनवण्यासाठी सामाजिक लोकशाही आवश्यक असते. म्हणून देशातील सामाजिक क्षेत्रातील विषमता, अन्याय दूर करून समाजातील पीडित घटकाची प्रगती करण्याच्या उददेशाने घटनेत मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे व भाग १६ मध्ये विशेष तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या विशेष सेवा, सुविधा व सवलतींची अंमलबजावणी कशाप्रकारे होते तसेच या जातीच्या, वर्गाच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठीच या आयोगांच्या स्थापनेची तरतुद घटनेतच करण्यात आलेली आहे. त्यानुसार १९९० साली राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग व १९९३ सोली इतर मागासवर्गीय आयोग व २००३ साली स्वतंत्र राष्ट्रीय

अनुसुचित जमाती आयोगांची स्थापना करण्यात आली. घटनेतील तरतुदींचे पालनाबरोबरच, हक्कांचे संरक्षण सामाजिक, आर्थिक विकासासाठी नियोजन याबाबी संदर्भात शासनाला शिफारशी करणे. तसेच या जातींच्या सुरक्षेसंदर्भात नागरी न्यायालयाचे जे अधिकार प्राप्त आहेत त्यानुसार हिंसक घटना, इत्यादी पासून संरक्षण देण्याचे कार्य केले जाते.

अशाप्रकारे देशातील सामाजिक सलोखा राखून सामाजिक न्याय निर्माण करण्याचे कार्य आयोगामार्फत केले जात आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या प्रगतीतून समानता प्रस्थापित करण्यासाठी यांची भुमिका महत्त्वाची ठरत आहे हे आपणास दिसून येते.

संवैधानिक मंडळे या घटकात ठराविक संस्था व आयोगाचाच आढावा आपण घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या उपयुक्ततेसंबंधी विवेचन केले. परंतु या व्यतिरिक्त ही काही संस्था आहेत यांचा उल्लेखही आपणास करता येईल. वित्त आयोग, आंतरराज्यीय परिषद, राजभाषा आयोग इत्यादी.

सरकारिया आयोगाने केलेल्या शिफारशीच्या आधारे घटनेच्या कलम २६३ मधील तरतुदीनुसार राष्ट्रपतींनी १९९० मध्ये आंतराज्यीय परिषदेची स्थापना केली. या परिषदेद्वारे केंद्र-राज्य यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे, देशाच्या व्यापक हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या धोरणात्मक बाबींवर चर्चा करून धोरण ठरवण्यास मदत होत आहे. राज्य-राज्य, केंद्र-राज्य यांच्यातील संघर्ष निवारण आणि देशहितासाठी सर्व राज्ये व केंद्र यांच्यासाठी एक मंच म्हणून परिषद भुमिका बजावत आहे.

वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीमुळे राज्याची स्वायत्तता नष्ट न होता केंद्र राज्य यांचे संबंध सुधारण्यातच झाला आहे. तसेच राज्यांना आपली अर्थव्यवस्था सुधारण्यासाठीही झाला आहे. केंद्राचे राज्यावर नियंत्रण येते. परंतु ते वेगळया प्रकारचे आहे. पंचवार्षिक योजनांतर्गत दिलेले अनुदान, सार्वजनिक कर्ज, इत्यादी बाबतीत केंद्राचे राज्यांवर नियंत्रण असते. राष्ट्रीय विकास कार्यासाठी लागणारी अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने आयोगाने फार मोठा हातभार लावला आहे. समाजातील सर्व घटकांचा आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी आयोगाच्या शिफारशी पुरक ठरल्या आहेत. घटक राज्यातील आर्थिक असमानता दूर करण्याचा बराच प्रयत्न झाला आहे.

देशात विविध भाषांचे अस्तित्व असल्याने कोणती भाषा राज्यकारभारात वापरायची तसेच आंतरराष्ट्रीय संपर्कासाठीची भाषा म्हणून इंग्रजीचा वापर करणे गरजेचे आहे. ब्रिटीश राजवटीत पुर्ण प्रशासनाची भाषा इंग्रजी होती. हिंदीला राजभाषेचा दिलेला दर्जा यामुळे होणारा विरोध, अनेक प्रादेशिक भाषांचे अस्तित्व व त्या भाषिक गटाच्या मागण्या या सर्व पार्श्वभुमीवर भाषेच्या प्रश्नासंबंधी आयोग असावा याची जाणिव घटनाकारांना होती. केंद्राची भाषा, केंद्र राज्य यांच्यामधील संवाद, राज्या राज्यातील संपर्काची भाषा, सर्वोच्च व उच्च न्यायालयातील कार्यवाही या संदर्भात आयोग काम करते. १९६१ ला स्थापन केलेला आयोग १९६७ साली विसर्जित केला असला तरी वैज्ञानिक व तांत्रिक शब्दावली आयोग मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत आहे.

वरील सर्व विवेचनावरून भारतातील विविध सवैधानिक मंडळाची उपयुक्तता कशा प्रकारे आहे हे स्पष्ट होते.

## ६.२.२ संवैधानिक मंडळाच्या मर्यादा

भारतात अनेक सवैधानिक संस्था विविध विषयाच्या अनुषंगाने निर्माण करण्यात आल्या. त्या आपल्या क्षेत्रात महत्त्वाची भुमिका बजावत आहेत तरीही संस्था म्हटले की तिच्या कार्याचे यश-अपयश किंवा गुण दोष पुढे येत असतात. या संस्थांची उपयुक्तता आपण पाहिली तसेच यांच्या काही उणीवा किंवा मर्यादा ही इतके वर्ष काम करत असताना दिसून आल्या आहेत. याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

(अ) भारताचा महान्यायवादी या केंद्र सरकारच्या प्रथम कायदेविषयक अधिकाऱ्याची उपयूक्तता आपण पाहिली. या बरोबरच या पदाच्या मर्यादा आपणाला सांगता येतील. महान्यायवादी या पदाची नियुक्तीच मुळात राजकीय नियुक्ती असते. कार्यकाळ हा राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत असतो. वेतन, भत्ते, इत्यादी सेवा, सवलती या राष्ट्रपती ठरवेल त्या असतात. यावरून पदाचे स्वातंत्र्य व सुरक्षितता नाही हे दिसते. यामुळे साहजिकच या पदाचा वापर सरकारकडून आपल्या हितसंबंधाच्या अनुकुल केला जातो. सैद्धांतिक पातळीवर काहीही असो मात्र व्यवहारात सरकारच्या मर्जीप्रमाणे आणि हिताचे कार्य कले जाते. इंदिरा गांधीच्या काळात नीरेन डे यांनी बजावलेली भुमिका असो किंवा युपीएच्या काळात मिलन बॅनर्जी यांनी ताज कॅरीडोर मधून मायावतींना व बोफोर्समधून क्वात्रोचिला निर्दोष मुक्त करण्याची शिफारस असो. यावरुन यापदाचा गैरवापर कशाप्रकारे होतो हे दिसून येते.

(ब) नियंत्रक व महालेखापरिक्षक हे एक देशाच्या आर्थिक क्षेत्रातील महत्त्वपुर्ण संस्था आहे. याद्वारे प्रभावी कार्य करण्यात आले असले तरी काही मर्यादा आहेत. या पदाची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारे होते. या पदाचा दर्जा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाप्रमाणे असल्यामुळे स्वातंत्र्य व पदाचे संरक्षण आहे. मात्र सैद्धांतिकदृष्ट्या या बाबी बरोबर असल्यातरी प्रत्यक्ष

व्यवहारात सरकार कॅगला आपल्या बाजूने काम करायला भाग पाडू शकते. प्रशासकीय यंत्रणेचा सरकारच्या बाजूने वापर करून घेण्याची चुकीची पद्धत इथेही असु शकते ही शक्यता नाकारता येत नाही. या बाबींचा प्रत्यक्ष पुरावा फार कमी वेळा समोर येतो. दुसरी मर्यादा अशी सांगता येते की जितक्या प्रभावीपणे कॅग शिफारशी करते तितक्या प्रभावी विधानसभा व लोकसभा त्यावर कारवायी करत नाहीत. ही चिंता शकधर समितीचे व्यक्त केलेली आहे. तिसरी मर्यादा ही सांगता येते की, इतर देशात कॅगच्या परवानगी शिवाय कोणत्याच प्रकारचा खर्च संचित निधीमधून करता येत नाही. परंतु भारतात ही व्यवस्था दिसत नाही. कॅगच्या परवानगी शिवाय पैसे संचित निधीतुन काढले जातात. म्हणून कॅग फक्त महालेखापरिक्षणाचेच कार्य करते नियंत्रणाचे नाही अशी टिका केली जाते.

(क) भारत निवडणूक आयोगाने आजपर्यंत लोकशाहीच्या दृढीकरणात महत्त्वपुर्ण भुमिका बजावली आहे. तरीही आयोगाच्या काही मर्यादा आपणास सांगता येतील. निवडणुक आयुक्तांच्या आवश्यक पात्रते संबंधी घटनेत उल्लेख नाही. राष्ट्रपतींची खात्री पटलेल्या व्यक्तींची नियुक्ती होत असते. आजपर्यंत फारसा प्रश्न यामुळे उपस्थित झालेला नाही. परंतु भविष्यात राजकियदृष्टिने विचार केला जावू शकतो. देशाची लोकसंख्या, क्षेत्रफळ, प्रतिनीधींची संख्या या सर्वांचा विचार करता एवढी व्यवस्था ठेवायची तर आयोगाकडे स्वत:चे कर्मचारी  फार कमी आहेत. दुसऱ्याच्या कर्मचाऱ्यांवर आयोगाला अवलंबुन राहावे लागते. निवडणुक आचार संहितेच्या उल्लंघनाच्या अनेक घटनांवर आयोग प्रभावी कारवायी करत नाही. नव्हेतर उल्लंघनाच्या अनेक घटना घडतात तिथपर्यंत आयोग पोहचू शकत नाही. माहिती झाली, नोटीस पाठवली तर फारशी कठोर कारवायी होत नाही. अनेक सुधारणा करून प्रभावी कार्य करण्याचा प्रयत्न आयोगाने केला तरी बोगस मतदान, मतदारयाद्यांमधील त्रुटी, उमेदवारांद्वारे खर्चाच्या हिशोबाची केवळ औपचारिकता, आदर्श आचारसंहितेचे प्रभावी पालन करून घेण्यात अपयश, निवडणूकांतील गैरप्रकार, गुन्हेगारीकरणाला पुर्ण आळा बसू शकले नाही, इत्यादी गोष्टींतून आपणाला आयोगाच्या कार्याच्या मर्यादा स्पष्ट करता येवू शकतात.

(ड) केंद्रीय लोकसेवा आयोगाने नोकरभरती संदर्भात महत्त्वाची भुमिका बजावली परंतु आयोगाच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रशासनात नोकरभरती ही कणा असते. त्यात चुक झाली तर पूर्ण प्रशासकीय यंत्रणा कुचकामी ठरते. आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती वास्तविकपणे राजकीय स्वरूपाची असते. आयोगातील सदस्यांनी पैसे घेऊन भरती प्रक्रियेत गैरप्रकार करून अनेकांना पद मिळवून दिल्याचे उघड झाले आहे. आयोगात मुल्यांकन, मॉडरेशन यामध्ये घोटाळा करण्याची प्रकरणे समोर आली आहेत. आयोग केवळ मॉडरेशनचे मार्क्स दाखवते मुळ मार्क्स दाखवत नाही. हे पारदर्शकतेचे लक्षण नाही. माहिती अधिकार कायद्याला ही आयोग दुर्लक्षित करत आले आहे.

तांत्रिक बिघाडामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याची प्रकरणे अनेकवेळा घडली आहेत. १९८५मध्ये एका हुशार मुलाची उत्तरपत्रिका आपल्या नावावर बदलून पद मिळवले होते तर काहिनी खोटे जात प्रमाणपत्र देवून आय. पी. एस. पद मिळवले अशा अनेक तक्रारीमध्ये आयोग न्यायालयात खटला हारले आहे. परिक्षेतील गैरव्यवहारबरोबरच परीक्षा पद्धतीतील बदल करण्यासंदर्भातही आयोगाच्या धोरणावर टीका झाली आहे. सी सॅट प्रणालीवरुन देशभरात विरोधी आंदोलनझाले होते. आयोगाची आणखी मर्यादा अशी आहे की, आयोगाने केलेल्या शिफारशी सरकारवर बंधनकारक नाहीत. केवळ आयोग उत्तीर्ण उमेदवारांची यादी देते मग पदभरती करण्याचे अधिकार संबधित विभागाकडे आहेत. अनेकवेळा रिक्त पदांची आकडेवारी लवकर दिली जात नाही दिली तर काही त्रुटी असतात. आयोगाने आपल्या अहवालात यासंबंधी उल्लेख करूनही सरकार यावर गंभीर नाही. यावरुन आयोगाच्या कामकाजावर सरकारच्या या उदासीनतेचा प्रभाव नक्कीच पडतो हे दिसते.

राष्ट्रीय अनुसुचित जाती आयोग, अनुसुचित जमाती आयोग, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग हे त्यांचे कार्य प्रभावीपणे करत आहेत. परंतु त्यांच्यासमोर अनेक आव्हाने आहेत. राज्यघटनेमध्ये यांची तरतुद करूनही हे आयोग स्थापन करण्यासाठी खूप उशीरा निर्णय घेण्यात आला आहे. आयोगाला कार्यकरण्यासाठी स्वातंत्र्य व अधिकार दिले असले तरी देशाचे क्षेत्रफळ, लोकसंख्या यांचा व्याप बघितला तर आयोगावर मर्यादा आहेत हे दिसते. आयोगांना हक्कांच्या सुरक्षेसंबंधी नागरी न्यायालयाचे अधिकार दिले असले तरी किती केसेस आयोगाकडे दाखल होतात हा प्रश्नच आहे. आयोगाने सामाजिक, आर्थिक विकासासंबंधी सुचवलेल्या शिफारशी सरकार किती गांभीर्याने घेते यावरही अवलंबून आहे.

वित्त आयोग या घटनात्मक संस्थेने अर्थिक बाबतीत प्रभावी कार्य केले आहे. परंतु नियोजन आयोगाच्या स्थापनेमुळे याच्या कार्यावर काहीसा परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. यामुळे घटनेतील आयोगाच्या स्थापनेच्या उददेशावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विकासाभिमुख साधनांच्या वितरणात योजना आयोगाची भुमिका वाढल्याने वित्त कार्य अर्थशुन्य बनले. वित्त आयोगाच्या कार्यक्षेत्रात बिगर योजनागत अर्थसंकल्पापुरते राहिल्याने योजना आयोगापेक्षा प्रभावी भुमिका बजावू शकले नाही. एका राजकीय संस्थेने घटनात्मक संस्थेला निष्प्रभावी बनवले. यामुळे दोन्ही आयोगात योग्य

समन्वय निर्माण केल्याशिवाय प्रभावी व सुव्यवस्थित कार्य होणार नाही. यावरुन हे स्पष्ट होते की वित्त आयोगाला योजना आयोगाने निष्प्रभावी बनवल्याने त्यावर मर्यादा आल्या होत्या. आता नीती आयोगाची स्थापना झाल्याने यात काय फरक पडतो का हे भविष्यात आपणास पहावयास मिळेल.

## ६.२.३ वैधानिक मंडळांची उपयुक्तता

देशात विविध वैधानिक मंडळाची स्थापना करण्यात आली. ही मंडळे वेगवेगळ्या क्षेत्रात किंवा विषयावर, प्रश्नावर काम करत आहेत. ही कितपत उपयुक्त आहेत या संदर्भात आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात येईल.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग ही संस्था मागील दोन दशकापासून मानवाधिकारा संदर्भात कार्य करत आहे. या काळात आयोगाने बऱ्याच प्रमाणात उपलब्धी प्राप्त केली आहे. क्रूर, अमानवीय व्यवहाराच्या बाबतीतील करारावर केंद्र सरकारला संयुक्त राष्ट्राबरोबर करार करण्यास आयोगाने भाग पाडले. शैक्षणिक व प्रशिक्षण संस्थेत मानवाधिकाराचा प्रचार, प्रसार करण्यास बरेच यश मिळवले आहे. देशभरातील तुरूंग व्यवस्थेतील सुधारणा संदर्भात शिफारशी सुचवल्याने बऱ्याच सुधारणा करण्यात आल्या आहेत. देशात वाढलेल्या दहशतवादी कारवायीत मृत्यू पावलेल्या व जखमी झालेल्या व्यक्तींच्या संदर्भात कार्य करण्यात आले आहे. मानवाधिकारासंबंधी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना मदत करण्यात आली. हिंसाचाराच्या घटनेत मानवाधिकारांचे उल्लंघन झाले असल्यास प्रत्यक्ष भेट देवून हस्तक्षेप करून कारवायी करण्यात आली आहे. नुकताच हरियाणामध्ये जाट आरक्षणावरुन झालेल्या हिंसाचाराच्या घटनेचा आढावा आयोगाने घेतला होता. अशा विविध प्रकारे आयोग सरकारला मानवाधिकारा संदर्भात कायदयाचे पालन, दुरुस्ती या बरोबरच स्वत: घटनास्थळी जावून कार्य करत आले आहे.

राज्य मानवाधिकार आयोग ही राज्यपातळीवर मानवाधिकारा संदर्भात कार्य करत आहेत. देशाची लोकसंख्या, क्षेत्रफळ, सामाजिक स्थिती या कारणामुळे केवळ केंद्रपातळीवर एकच आयोग स्थापन करून प्रभावी व व्यापक कार्य करता आले नसते म्हणून राज्यपातळीवरही आयोग स्थापन करण्यात आले. हे आयोग ही आपापल्या राज्यात प्रभावी कार्य करतांना दिसतात. मानवाधिकाराचा प्रचार प्रसार वाढवण्यात मोठी मदत झाली आहे. तसेच मानवाधिकाराचे उल्लंघन झाल्यास संरक्षण देण्याचे कार्य केले जात आहे. पीडित व्यक्तीला मोबदला देणे किंवा उच्च व सर्वोच्च न्यायालयात अपील केली जाते. वाढत्या दहशतवादी कारवाया बरोबरच नक्षलवाद, हिंसाचार यातील पीडितांना संरक्षण देण्यात येत आहे.

महिलांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोग एक प्रभावी संस्था म्हणून कार्य करत आहे. महिलांचा सहभाग निर्णयप्रक्रियेत वाढावा यासाठी महिलांना शासन व प्रशासन यामध्ये सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न केला. म्हणूनच पंचायतराज मध्ये ५० टक्के आरक्षण महिलांना देण्यात आले आहे. महिलांवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी प्रभावी कायदयाची आवश्यकता आहे याचा पाठपुरावा सरकारकडे केल्याने विविध कायदे महिलांच्या संरक्षणासाठी करण्यात आले आहेत. महिलांचे आरोग्य, आर्थिक प्रगती या संदर्भात महिलांमध्ये जाणीव जागृती करण्यात येत आहे. एकंदर महिला, शासन व समाजात महिलांच्या प्रश्नावर जाणीव जागृती करण्यासाठी व त्या सोडवण्यासाठी पुढाकार घेण्यास आयोगाची भुमिका ठरत आहे.

राष्ट्रीय विकास परिषदेने देशाच्या विकासाच्या नियोजनासाठी आर्थिक व सामाजिक प्रश्नांवर सर्वांगिण विचारपुर्वक अशा शिफारशी सुचवल्या आहेत. देशातील साधनासामग्रीचा योग्य उपयोग करून घेण्यासाठी परिषदेने मार्गदर्शन केले. औद्योगिकरण, पंचायतराज, सहकार, जलसिंचन, व्यसनमुक्ती निर्वासितांचे प्रश्न या आणि अशा अनेक समस्यांवर मार्ग काढण्यासाठी परिषदेने मोलाची भुमिका बजावली असून त्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीतही महत्त्वाची भुमिका बजावली आहे. अनेक घटकराज्ये आणि केंद्र सरकारात विकास योजना बनवण्यासाठी एका मंचाची समन्वयासाठी गरज होती. परिषदेच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आली आहे म्हणून परिषद उपयूक्त आहे असे म्हणता येईल.

राज्यघटना पुनर्विलोकन आयोगाने केलेल्या अभ्यासपुर्ण शिफारशींचा विचार करून शासनाने त्याची अंमलबजावणी केली. यामध्ये मंत्रिमंडळाची संख्या निश्चिती, शिक्षणाचा अधिकार, निवडणुक विषयक सुधारणा, माहितीचा अधिकार, रोजगार हमी अधिनियम, इत्यादी आयोगाने सुचवलेल्या आणखी शिफारशींचा आपण अंगीकार करून राज्यव्यवस्थेत सुधारणा व प्रभावी अंमलबजावणी करता येईल. आयोगाने आपल्या शिफारशी घटनेच्या चौकटीला कोणतीही बाधा येवू न देता जनतेच्या वाढत्या आकांक्षा व देशाच्या सामाजिक, आर्थिक विकासाला अनुकूल अशाच शिफारशी सुचवल्याने आपणाला आयोगाचे महत्त्व नाकारता येत नाही.

केंद्रिय माहिती आयोग हे प्रशासनातील एक नवीन अभिकरण आहे. यामाध्यमातून प्रशासन पारदर्शी, जबाबदार बनण्यास मदत होत आहे. नोकरशाहीमधील भ्रष्टाचारी, शोषण, अन्याय, अत्याचार, भेदभाव करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर यामुळे दबाव वाढला असून ते दक्षपणे कार्य करू लागलेत. प्रशासनावर सर्वसामान्य व्यक्तीचा विश्वास वाढण्यास यामुळे मदत झाली.

तसेच प्रशासनात लोकसहभाग वाढण्यासाठी सुरुवात झाली आहे. अशाप्रकारे केंद्रिय माहिती आयोग ही संस्था प्रशासनात प्रभावी भुमिका बजावत आहे.

वरील वैधानिक मंडळाव्यतिरिक्त अनेक संस्था, आयोग निर्माण करण्यात आलेले आहेत ते आपआपल्या क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करत आहेत. यापैकी राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग, राष्ट्रीय बालक हक्क संरक्षण आयोग, केंद्रिय दक्षता आयोग या काही मंडळाचा उल्लेख करता येईल. हे त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहेत म्हणून त्यांची उपयुक्तता आहे असे आपणास सांगता येईल.

## ६.२.४ वैधानिक मंडळांची मर्यादा

देशातील विविध वैधानिक मंडळे आपआपल्या क्षेत्रात कार्यरत आहेत. या मंडळांना आपल्या कार्यात काय समस्या आहेत तसेच त्यांच्या काय मर्यादा आहेत याचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात येईल.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग मानवाधिकार संरक्षण संदर्भात कार्य करत असले तरी जोपर्यंत निरक्षरता, गरीबी, अज्ञान, इत्यादी सामाजिक समस्या कमी होत नाहीत तोपर्यंत मानवाधिकाराचे कार्य प्रभावी बनणार नाही. देशाची लोकसंख्या, क्षेत्रफळ आणि वाढत्या मानवाधिकार उल्लंघनाच्या घटना या पार्श्वभुमीवर आयोगाला कार्य करण्यास मर्यादा पडतात. मानवाधिकार अधिनियमामध्येही काही दुरूस्त्या करण्याची गरज आहे. यामध्ये आयोगाने केलेल्या शिफारशी योग्य वेळेत लागू कराव्या. सरकारच्या परवानगीशिवाय कारागृहाचे निरीक्षण करण्याची शक्ती असावी. इत्यादी दुरुस्त्या आवश्यक वाटतात. राज्य मानवाधिकाराच्या बाबतीतही याच मर्यादा लागू पडतात.

महिलांच्या प्रश्नावर कार्य करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने बरेच यश प्राप्त केले. तसेच महिलांची स्थिती बऱ्यापैकी सुधारली असली तरी, देशातील सर्वच महिला सक्षम झाल्या असे म्हणता येत नाही. महिलांना दुय्यम वागणुक व दर्जा देणारी समाजव्यवस्था जोपर्यंत कायम असेल तोपर्यंत महिलांचे सबलीकरण अपूर्णच राहील असे वाटते. आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक स्त्रियांवरील अत्याचार हे प्रश्न सुटले नाहीत. राज्य पातळीवरही महिला आयोगाची स्थापना केली असली तरी, केवळ संस्थात्मक व कायदेशीर उपाययोजना करून प्रश्न सुटणार नाहीत तर समाजाची व स्वत: स्त्रियांचीही मानसिकता बदलणे गरजेचे आहे. यासाठी प्रभावी शिक्षण व आर्थिक प्रगती याद्वारे प्रश्न सुटतील अशी अपेक्षा आहे. आयोग केवळ सुचना व शिफारशी करु शकते. परंतु हा प्रश्न समाजव्यवस्थेच्या मुळाशी निगडीत असा आहे. तेव्हा तो सोडवणे आयोगाला आव्हान आहे. ही खरी मर्यादा आहे असे आपणास म्हणता येईल.

राष्ट्रीय विकास परिषदेच्या कार्याचा आढावा घेतल्यास आयोगाने बऱ्यापैकी यश मिळवले आहे. परंतु आयोगाच्या काही मर्यादाही सांगता येतात. आयोगाचे स्वरुप खूप विस्तारीत झाले त्यामानाने कार्य नियमित केले जात नाही. केवळ ठराविक बैठकातून होते मात्र नियोजन आयोगाचे कार्य सतत सुरू असल्याने नियोजन आयोगाला दिला जाणारा सल्ला फार प्रभावी राहत नाही. परिषदेचे सदस्य विकासापेक्षा राजकीय गोष्टींना जास्त महत्त्व देतात हे अनेकवेळा दिसून आले. परिषदेचे कार्य केवळ औपचारिकता राहत आली. वास्तविक निर्णय केंद्रिय मंत्रिमंडळ व नियोजन आयोग घेत आले आहे. एकंदर राजकीय परिस्थिती व नियोजन आयोगाचे वर्चस्व यामुळे परिषदेवर मर्यादा पडल्या असे म्हणता येईल. म्हणूनच आता २०१५मध्ये नियोजन आयोगाऐवजी नीती आयोगाची स्थापना केली यापुढे कसे कामकाज होते ते पुढील काळात दिसून येईल.

केंद्रिय माहिती आयोगाला संपुर्ण देशातील प्रशासनामध्ये माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असेल ती राबवणे हे फार मोठे आव्हान आहे. देशात कायदा पालनात असणारी उदासीनता, निरक्षर जनता, उदासीन नोकरशाही या परिस्थितीत कार्य करणे ही एक मर्यादा आहे. माहितीच्या अधिकाराचा गैरवापर होणार नाही हे टाळणे कठीण आहे. तसेच यामुळे नोकशाहीच्या कार्याची गती थांबणार नाही हे ही बघावे लागेल. माहिती अधिकाराचा वापर करणाऱ्याच्या संरक्षणाची हमी नसल्याने तो वापरला जाईल का ही पण शंका आहे, परंतू आयोग यासाठी काही करू शकणार नाही. या सर्व बाबींचा विचार करता केंद्रिय माहिती आयोगाच्या मर्यादा आपणास दिसून येतात.

राज्यघटना पुनर्विलोकन आयोगाने सुयोग्य शिफारशी सुचवल्या असल्यातरी यातील मोजक्याच शिफारशी अंमलात आल्या आहेत. पुर्ण शिफारशीचा स्वीकार करणे ही बाब व्यवहारात शक्य नाही. तसेच आयोगाची स्थापना हा भाजपा सरकारचा कार्यक्रम होता ही विरोधी पक्षांची धारणा असल्याने याला सर्व स्तरातून विरोध दर्शविला होता. यामुळे या शिफारशींचा गांभीर्याने विचार केला नाही. आजवर अनेक आयोग, समित्यांनी शिफारशी सुचवल्या त्या तशाच धूळ खात पडल्या आहेत तीच अवस्था याबाबतीतही झाली असे म्हणता येईल.

वरीलप्रमाणे वैधानिक मंडळे हे काही ना काही समस्यांना सामोरे जातात किंवा त्यांच्यावर अधिकार, संरचना, कार्यपद्धती, देशातील परिस्थिती यांच्यामुळे काही मर्यादा येतांना दिसून येतात.

### *स्वंय-अध्ययनासाठी प्रश्न*

**खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

(१) केंद्रिय निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे.

(२) केंद्रिय माहिती आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे.

(३) भारताचा महान्यायवादी हा भारत सरकारचा प्रथम कायदेविषयक अधिकारी आहे.

(४) केंद्रिय महिला आयोग ही एक गैरघटनात्मक संस्था आहे.

(५) नियोजन आयोग या संस्थेऐवजी २०१५मध्ये निती आयोगाची स्थापना करण्यात आली आहे.

## ६.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**अनुसूचित जाती व जमाती :** भारतीय राज्यघटनेने मान्य केलेल्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक यादृष्टीने मागास असलेला जातीचा समुह.

**महिला सबलीकरण :** स्त्री-पुरूष असमानता नष्ट करून महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय दर्जा प्रदान करणे म्हणजे महिला सबलीकरण होय.

**संरचना :** एखाद्या व्यवस्थेत घटकांचे परस्परांशी येणारे संबंध व्यवस्थितपणे मांडणाऱ्या रचनेस संरचना म्हणतात.

## ६.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) बरोबर

(२) चूक

(३) बरोबर

(४) बरोबर

(५) बरोबर

## ६.५ सारांश

या घटकात संवैधानिक आणि वैधानिक मंडळे यांचा आढावा घेण्यात आला आहे. संवैधानिक मंडळामध्ये भारताचा महान्यायवादी, नियंत्रक व महालेखापरिक्षक, केंद्रिय लोकसेवा आयोग, भारतीय निवडणूक आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग, इतर मागासवर्गीय आयोग, वित्त आयोग यांच्या उपयुक्तता याबद्दल माहिती घेतली आहे. वैधानिक मंडळामध्ये राष्ट्रीय विकास परिषद, केंद्रिय माहिती आयोग, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय महिला आयोग, राज्यघटना पुनर्विलोकन आयोग यांच्या कार्याबद्दलही माहिती घेतली आहे. संवैधानिक व वैधानिक ही दोन्ही प्रकारची मंडळे आपापल्या क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करतांना दिसून येते. परंतु असे असले तरी कार्य करतांना या मंडळांना काही मर्यादाही आहे, याचा प्रत्यय येतो. यामध्ये मंडळाचा अध्यक्ष व सदस्यांची निवड, रचना, व्याप्ती, अधिकार व कार्ये याबाबतीत मर्यादा आहेत. यासर्व मर्यादा असतांनाही ही मंडळे त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडतांना दिसून येतात. म्हणून त्यांची उपयुक्तता आहे असे आपणास सांगता येईल.

## ६.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) संवैधानिक मंडळांची उपयुक्तता स्पष्ट करा.

(२) केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या मर्यादा सांगा.

(३) भारत निवडणूक आयोगाची मर्यादा सांगा.

(४) संवैधानिक मंडळांच्या मर्यादा स्पष्ट करा.

(५) वैधानिक मंडळाची उपयुक्तता सांगा

(६) वैधानिक मंडळाची मर्यादा लिहा.

## ६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) फडिया, बी. एल., जैन पी. (२०१०). *भारतीय शासन एवं राजनीती.* आगरा, साहित्य भवन पब्लिकेशन्स.

(२) जोशी, एस. (२०१२). *भारतीय शासन व राजकारण.* औरंगाबाद, विद्या बुक पब्लिकेशन्स.

(३) Kashap, S. C. (2011). *Our Constitution*. New Delhi, National Book Trust

(४) *लोकराज्य* (२०१४).

(५) *लोकपंचायत*, (२००९). क्या भ्रष्टाचार की गंगोत्री है लोकसेवा आयोग.


ज्ञानगंगा घरोघरी

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२

दूरध्वनी क्र. (०२५३ ) २२३१४७५, २२३१७१४

**Website:** https://ycmou.digitaluniversity.ac **Email:** dir_shu@ycmou.digitaluniversity.ac

**मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**

## प्रत्याभरण

या पुस्तकाबाबत आपल्याला अभ्यासक्रमाची रचना, काठिण्य पातळी, भाषाशैली, विषय-विवेचन, स्वयं-अध्ययन प्रश्न या संदर्भात तसेच तुमचा संबंधित क्षेत्रातील अनुभव, प्रशासनातील अनुभव, प्रशासकीय सुधारणेविषयी नवीन दृष्टीकोन, लोकप्रशासनातील नवप्रवाह इत्यादींबाबत काही सूचना असल्यास पुढील पत्त्यावर किंवा खाली दिलेल्या ई-मेलवरून कळवाव्यात.

**आपल्या सूचना पाठवण्याचा पत्ता**

**संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२

dir_shu@ycmou.digitaluniversity.ac, pubadmycmou@gmail.com या ई-मेलवर पाठवू शकता.

**तुमच्याविषयी :**

(१ ) संपूर्ण नाव : ______________________________

(२) संपूर्ण पत्ता : ______________________________

______________________________

(३) मोबाईल क्र. : ______________ ईमेल : ______________________________

(४) शिक्षण : ______________________ हुद्दा : ______________________

(५) तुमचा प्रतिसाद/सूचना : ______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

*सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित*

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

( महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले )

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७
फॅक्स : (०९१) (०२५३) २२३१७१६
वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac ● http://ycmou.ac.in